म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. १५६४
१९५९

REFBK-0010283

स्मृति-लहरी

वा. के. जोशी

किंमत दीड रुपया

४६५७८
तिरोम—
७-६-९८
१७९४

४९५५९ निबंध
४७६४ ७।९।६८



स्मृति-लहरी

REFBK-0010283

संपादक

वा. म. जोशी

किंमत दीड रुपया

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९ बुधवार, पुणें २
●
पहिली आवृत्ति १९४२
दुसरी आवृत्ति १९५०
तिसरी आवृत्ति १९५३
चौथी आवृत्ति १९५९
●
सर्व प्रकारचे हक्क
देशमुख आणि कंपनीकडे
आहेत
●
मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.
३८३ नारायण, पुणें २
●



प्रास्ताविक

'स्मृतिलहरी' हें वामन मल्हार जोश्यांच्या वाङ्मयांतलें एक अनुपम पुस्तक आहे. एखाद्या कुटुंबांत प्रेमळ पण प्रौढ अशीं वडीलधारीं माणसें असावींत, 'जे सदनीं फुलबागा रचिती' हें बोरकरांचें वर्णन सार्थ करणारीं कर्तृत्ववान आणि कर्तव्यतत्पर मातापितरें असावींत, नाना प्रकारचे लहानथोर नातेवाईक असावेत, पण आपल्या स्वैर आणि गोड बाललीलांनीं या कुटुंबाचें रंजन आणि उन्नयन करणारें गोजिरवाणें बालक मात्र असूं नये! 'स्मृतिलहरी' प्रकाशित होईपर्यंत वामनरावांच्या वाङ्मयसंसाराची स्थिति अशीच होती. 'नीतिशास्त्रप्रवेश', 'विचारविलास', 'विचार सौंदर्य' या त्यांच्या ग्रंथांचें चिंतनशील वाचकांनीं मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. पण सर्वसामान्य वाचकाला त्यांचा रस घेणें फारसें शक्य नव्हतें. 'रागिणी,' 'आश्रमहरिणी', 'सुशीलेचा देव', 'इंदु काळे व सरला भोळे' या त्यांच्या चार कादंबऱ्या आपआपल्या परीनें लोकप्रिय झाल्या हें खरें. पण ती लोकप्रियतासुद्धां एका विशिष्ट वर्गापुरतीच मर्यादित होती. 'पुढें काय?', 'मग काय बरं झालं असावं?' असे प्रश्न स्वतःलाच विचारीत कथेंतील प्रसंगांच्या अथवा गुंता-गुंतीच्या ओढीनें कादंबरी वाचणारा वाचक त्यांच्यावर कधींच लुब्ध झाला नाहीं. सुशिक्षित वर्गानें – त्यांतहि किंचित् अंतर्मुख होऊन सामाजिक प्रश्नांचा आणि बदलत जाणाऱ्या जीवनमूल्यांचा प्रामाणिकपणें विचार करणाऱ्या माणसांनीं – त्यांच्या कादंबऱ्यांचें कौतुक केलें. 'विचार–लहरी' सारख्या त्यांच्या पुस्तकांत लालित्य आणि चिंतनशीलता यांची चांगली सांगड पडली आहे. पण 'स्मृतिलहरी' हें त्यापेक्षांही सर्वसामान्य वाचकाला केवळ अधिक जवळचेंच नव्हे तर जिव्हाळ्याचेंही वाटेल असें पुस्तक आहे. काळाच्या चाळणींतून गळत गळत वामनरावांचीं जीं पांच पुस्तकें पुढल्या पिढीच्या वाचनांत राहतील त्यांत

'स्मृतिलहरी' निःसंशय असेल असें मला वाटतें. वामनरावांच्या वाङ्मयीन कुटुंबांतील ही चिमुरडी पोरटी मोठी चतुर आहे. 'The child is the father of the man' ही वर्ड्स्वर्थची उक्ति या पुस्तकाला पूर्णपणें लागूं पडते. या छोट्या पुस्तकांत व्यक्तित्व व साहित्य या दोन्ही दृष्टींनीं मोठ्या असलेल्या वामनरावांचें पूर्ण प्रतिबिंब पडलें आहे.

या पुस्तकाची जन्मकथा मोठी मनोरंजक आहे. आयुष्याच्या शेवटच्या सातआठ वर्षांत (१९३५–१९४३) वामनरावांचें लेखन मंदावलें. एक तर त्यांची पन्नाशी उलटून गेली होती. प्रकृति द्यावी तशी साथ देत नव्हती. महर्षि कर्व्यांच्या महिला विद्यालयाचे ते प्राचार्य होते. या विद्यालयाला त्या काळांत अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. अशा स्थितींत लेखनाला लागणारें मनःस्वास्थ्य वामनरावांना दुर्मिळ व्हावें यांत अस्वाभाविक असें काय होतें ? शिवाय कलावंताच्या ठिकाणीं आवश्यक असलेला आत्मविश्वास – अनेकांत त्याचें चटकन् अहंकारांत रूपांतर होतें ही गोष्ट निराळी – त्यांच्या ठिकाणीं मुळांतच थोडा कमी होता. म्हणून एकीकडे प्रतिकूल परिस्थितीमुळें वामनरावांचें लेखन मंदावत गेलें व दुसरीकडे त्याचें समर्थन करण्याकरितां 'आतां सांगण्यासारखं माझ्यापाशीं कांहीं राहिलं नाहीं' असें ते म्हणत राहिले. विनयानें विद्या शोभते असें एक जुनें वचन आहे. पण विनयानें विद्या गुप्त राहते हें मीं स्वतः वामनरावांच्या बाबतींत अनुभवलें आहे. साधें संभाषण असो, चारचौघांची अनौपचारिक चर्चा असो अथवा पांच मिनिटांत करावयाचा अध्यक्षीय समारोप असो, त्यांनीं एखादा मार्मिक विचार बोलून दाखविला नाहीं असें सहसा घडलें नाहीं. त्या विचारांत सुंदर निबंधाचें अथवा कथेचें बीज आहे याची जाणीव माझ्यासारख्या श्रोत्याला तत्काळ होई. पण वामनराव मात्र तो विचार वाऱ्यावर सोडून देत. कस्तूरीमृगासारखी त्यांची स्थिति झाली होती. जन्मजात सौजन्य, अखंड विद्याव्यासंग, चिंतनशील जीवनक्रम, आणि निरहंकार वृत्ति यांच्या संगमामुळें वामनरावांची परिणत झालेली प्रज्ञा साध्या संभाषणांतसुद्धां जे उद्गार काढी ते नेहमींच अर्थपूर्ण असत. वाङ्मयीन बीजें त्यांत लपलेलीं दिसत. पुण्याला गेल्यावर त्यांच्याशीं चार घटका गप्पागोष्टी करून मी बिऱ्हाडीं परतूं लागलों कीं,

मला नेहमीं उत्तररामचरितांतल्या एका चरणाची आठवण होई – 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनु धावति।'

या शेवट शेवटच्या वर्षांत वामनरावांचें भाषण ही क्वचित् वेधक, क्वचित् भेदक, पण बहुधा मार्मिक अशा विचारांची खाण असे. मात्र या खाणींतली माती काढून तिच्यांतले सुवर्णकण टिपण्याचा त्यांना कंटाळा आला होता. 'माझ्यापाशीं सांगण्यासारखं कांहीं राहिलं नाहीं' असें ते तोंडानें म्हणत असले तरी त्यांनीं कांहीं ना कांहीं लिहावें अशी सर्वांची इच्छा असे. त्यांच्या परिणत प्रज्ञेविषयीं सर्वांना आदर वाटे. म्हणून निरनिराळे संपादक नेहमीं त्यांचा पाठपुरावा करीत. आणि मग भिडेनें दिलेला शब्द पाळण्याकरितां मनांत घोळत असलेला अथवा त्याला चाटून गेलेला एखादा छोटा प्रसंग व त्याविषयींचें स्वतःचें चिंतन यांना वामनराव शब्दरूप देत.

"स्मृतिलहरी' हा अशा प्रकारें लिहिल्या गेलेल्या पंधरा ललित लेखांचा संग्रह आहे. या लेखांचे विषय विविध आहेत. साध्या सांसारिक गोष्टींपासून गहन वादांपर्यंत सर्वांचा परामर्ष या पुस्तकांत प्रतिबिंबित झाला आहे. चार रुपये सहा आण्यांच्या तांब्यापासून जगांत क्रांति करूं इच्छिणाऱ्या साम्यवादापर्यंत सर्वांचा सात्त्विक समाचार वामनरावांनीं इथें घेतला आहे. मात्र या विविध विषयांना गुंफणारी एक एक सांखळी या पुस्तकांत आहे. ती म्हणजे धोंडोपंत बर्वे. धोंडोपंतांच्या आठवणी लिहिण्याची कल्पना वामनरावांना ज्या क्षणीं सुचली तो मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें मोलाचा होता यांत शंका नाहीं. आठवणी व त्याही धोंडोपंत बर्वे या काल्पनिक व्यक्तीच्या असें या लेखांचें स्वरूप आहे. त्यामुळें वामनरावांनीं स्वतःच्या आठवणी म्हणून अशा प्रकारचें पुस्तक लिहिलें असतें तर संकोचानें ज्या गोष्टी सांगण्याचें त्यांनीं टाळलें असतें त्या या लेखांत ते सहज लिहून गेले आहेत. या मनमोकळेपणामुळें 'स्मृतिलहरीं'तला रस निःसंशय वाढला आहे. इतकेंच नव्हे तर त्याला कांहीं वेगळीच गोडी आली आहे. पिकलेलीं बोरें असतात ना? तशा या आठवणी आहेत. आंबट, पण गोड!

उदाहरणार्थ 'हें प्रेम वेडं का शहाणं?' हा शेवटचा लेख (पृ. ८८-९८) पाहावा. प्रोफेसर धोंडोपंत व त्यांची पत्नी यांच्या संसाराचें मोठें हृदयंगम

चित्र लेखकानें इथें रेखाटलें आहे. पराक्रम ही पुरुषाच्या आयुष्याची प्रेरक शक्ति असल्यामुळें असो अथवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें असो, पुरुषांना व्यवहार कळत नाहीं असें बायकांना नेहमींच वाटतें. हा समज अगदींच खोटा आहे असेंही नाहीं. पुरुष उदार होऊं शकतो, उधळ्या होऊं शकतो, कद्रू होऊं शकतो ; पण व्यवहारी मात्र होऊं शकत नाहीं ! दोन पैशांसाठीं भाजी-वालीशीं भांडणें त्याला जमणार नाहीं. प्रोफेसर धोंडोपंत तरी या नियमाला कसे अपवाद होणार ? ते कांहीं कामाकरितां मुंबईला जायला निघतात. तिथें फिरकीचे पितळी तांबे स्वस्त मिळतात असें ऐकल्यामुळें त्यांची पत्नी त्यांना तसला एक तांब्या घेऊन यायला सांगते. धोंडोपंतांच्या स्नेह्यांनीं तो चार रुपये सहा आण्यांना आणला आहे हेंही ती त्यांना बजावते. बायकोनें तांब्या महाग लागला असें म्हणूं नये म्हणून त्या स्नेह्यांनीं चार रुपये बारा आण्यांना तांब्या घेऊन तो चार रुपये सहा आण्यांना मिळाला असें आपल्या बायकोला खोटेंच सांगितलेलें असतें ! पण हें धोंडोपंतांच्या बायकोला कसें कळावें ? अमुक दिवशीं दुपारीं बाराच्या गाडीला येतों असें मुंबईला जातांना पंत तिला सांगून गेलेले असतात. पण त्या गाडीनें ते कांहीं येत नाहींत ! साहजिकच तिला थोडी काळजी वाटूं लागते. या काळजींतच ते बहुधा तो फिरकीचा तांब्या आणणार नाहींत आणि चुकून त्यांनीं आणलाच तर चार आणे जास्त देऊन तो ते आणतील या विवंचनेची भर पडते. मनुष्याचें मन मोठें विचित्र आहे ! प्रिय मनुष्याविषयींच तें अधिक तक्रारी करीत बसतें. मग धोंडोपंतांच्या पत्नीच्या मनांत असल्या अनेक गोष्टी आल्या म्हणून तिला तरी कां बोल लावावा ?

शेवटीं एकदांचे धोंडोपंत मुंबईहून परत येतात. हात हालवीत नाहीं, तर हातांत ऐटीनें फिरकीचा पितळी तांब्या घेऊन ! तो पाहून त्यांच्या बायकोचा जीव अक्षरशः भांड्यांत पडतो. पण लगेच तिला वाटतें, नवऱ्यानें तांब्या आणला खरा ! पण अव्वाच्या सव्वा पैसे देऊन तर तो त्यांनीं आणला नसेल ना ? विद्वान् माणसांचा काय नेम सांगावा ? ती घाईघाईनें नवऱ्याला तांब्याची किंमत विचारते. धोंडोपंत विजयी मुद्रेनें 'चार रुपये पांच आणे' एवढेच शब्द उच्चारतात. त्यांच्या बायकोच्या मुद्रेवर समाधानाचें स्मित विलसूं लागतें. केवळ एका आण्यामुळें घरांत आनंदी आनंद होतो !

अनुक्रम ४९५७९ निवेदन
दिनांक ७।९।९८

पण खरोखर धोंडोपंतांनीं तो एक आणा वांचविला होता काय ? त्यांनीं तो तांब्या चार रुपये पांच आण्यांना घेतला होता म्हणतां ? छे ! मुळींच नाहीं ! मात्र तसें बायकोला सांगायचें त्यांनीं मुंबईला जातांनाच ठरविलें होतें ! ते आपल्या स्नेह्यापाशीं चक्क म्हणतातच, 'या बायकांना असं फसविल्याशिवाय गत्यंतर नाहीं.' (पृ. २)

संसारांतील सर्वांच्या अनुभवाची ही एवढीशी साधी गोष्ट ! पण वामनरावांनीं ती कशी खुलवून, काव्य आणि तत्त्वज्ञान यांची जोड तिला देऊन सांगितली आहे हें पाहण्याजोगें आहे. (पृ. ८८-९४). माणसाला संसारांत अनेकदां लपंडाव खेळावा लागतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतों त्याच्या सुखासाठींच तो खेळायचा असतो. यांत एक प्रकारची फसवणूक असते. पण ती भावनेच्या पोटीं जन्माला आली असल्यामुळें गोड असते, प्रसंगीं कटु सत्यापेक्षांही उपकारक ठरते. तिचा हेतु दुसऱ्याला सुखी करणें हाच असतो. म्हणूनच ती आपल्याला आवडते, आनंदायक वाटते. ओ. हेन्रीच्या 'Gift of Magi' (नाताळची भेट) या गोष्टींत अशाच प्रकारचें पतिपत्नींचें प्रेम आहे. त्या कथेंतही नवराबायको एकमेकांची फसवणूक करतात. नवऱ्याच्या घड्याळाला छडा हवा म्हणून बायको आपले सुंदर केंस त्याला न सांगतां विकून टाकते. आणि बायकोला आपले सुंदर केंस विंचरायला छानदार फणी हवी म्हणून तो तिला पत्ता न लागूं देतां आपलें घड्याळ विकून टाकतो. घरांत घड्याळाचा छडा येतो; पण घड्याळच जागेवर नसतें ! घरांत फणी येते; पण तिनें कुणाचे केंस विंचरायचे असा प्रश्न दत्त म्हणून दोघांच्यापुढें उभा राहतो ! या अनुभूतींत मोठें मधुर कारुण्य आहे. या पतिपत्नींपैकीं प्रत्येकाला ज्या गोष्टीची उणीव असते ती मिळते; पण ती मिळविण्यासाठीं दुसरी गोष्ट गमवावी लागते. त्यामुळें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत मूळची उणीव कायमच राहते. पण असें असूनही तीं दोघें अतिशय आनंदित होतात. कारण या साऱ्या गोड गोंधळांत त्यांना परस्परांच्या प्रेमाची खूण पटते. ही खूण पटणें हीच संसारांत सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. माणसाला डोळ्यांत उभ्या राहणाऱ्या अश्रूंचें दुःख वाटत नाहीं; पण ते पुसायला कुणी नाहीं याचें मात्र दुःख होतें, अशा अर्थाचें गडकऱ्यांचें एक भावपूर्ण वचन आहे. त्याचें मर्म तरी दुसरें काय आहे ? संसार ही

अन्तीं देवघेव आहे, तडजोड आहे. पण तो व्यवहार नव्हे, व्यापार नव्हे. तें काव्य आहे, नाटच आहे.

मनुष्य स्वभावतः आत्मनिष्ठ असतो. तो आपल्या पायापुरतेंच पाहतो. आपलें सुख आणि आपल्या इच्छा यांच्यापुढें तो सारें जग तृणवत् मानतो. आपल्या तालावर इतरांनीं नाचायला पाहिजे असें त्याला सतत वाटतें. या नैसर्गिक विशाल जगांत तो आपलें एकटचाचें खोटें कृत्रिम जग निर्माण करतो आणि त्यांत स्वतःच्या आत्म्याला कोंडून ठेवतो. प्रतिबिंबावर प्रेम करणाऱ्या नारसिससारखी त्याची मनःस्थिति असते. त्याच्या आत्म्याला कोंडणाऱ्या त्या विचित्र तुरुंगाच्या प्रचंड भिंती प्रेमामुळें जमीनदोस्त होतात. दुसऱ्यावर प्रेम करणें म्हणजे स्वतःला विसरणें आणि स्वतःला विसरणें म्हणजे आपला विकास करून घेणें. प्रेम आपल्याला त्यागाचे धडे देतें, तें तडजोडीची वृत्ति निर्माण करतें. जग जरी आपल्या मनासारखें नसलें तरी त्याच्यावर प्रेम करूनच आपण तें सुधारूं शकूं हें तें आपल्याला पटवितें. त्यामुळें प्रेमानें सद्धेतूनें केलेली फसवणूकसुद्धां आपल्याला मोठी रोचक वाटते. चार्ली चॅप्लीनच्या चित्रपटांत हास्याच्या मागें असलेल्या सूक्ष्म कारुण्यामुळें अवीट गोडी निर्माण होते ना? दुसऱ्याचे सारे दोष जमेला धरून आणि सर्वसामान्य मनुष्य आदर्श होणें अशक्य आहे या गोष्टीची जाणीव ठेवून, एकमेकांशीं जुळवून घेण्याकरितां आणि परस्परांना सुखी करण्याकरितां माणसें संसारांत जी जी धडपड करतात तीही अशीच हृदयंगम असते. म्हणूनच 'स्मृतिलहरीं' तलें धोंडोपंतांचें हें फिरकी तांब्याचें प्रकरण इतकें रंगलें आहे,मोठें रुचिर आणि रुचकर झालें आहे.

'स्मृतिलहरी' हें वैशिष्टचपूर्ण पुस्तक असूनही तें केवळ प्रकाशकाच्या आग्रहामुळें अस्तित्वांत आलें असें सांगितलें तर त्यावर सहसा कुणाचा विश्वास बसणार नाहीं. प्रण ही गोष्ट खरी आहे. १९३५ नंतर संपादकांच्या आग्रहाखातर वामनराव अधूनमधून स्फुट लेख लिहीत असत हें मीं वर सांगितलेंच आहे. असला एखादा लेख लिहून झाला कीं त्या संपादकांच्या लकडचांतून आपण सुटलों म्हणून वामनराव समाधानाचा सुस्कारा सोडीत आणि तो लेख लिहिल्याचें विसरून जात. अशा स्थितींत प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशक श्री. देशमुख यांनीं त्यांच्यापाशीं कादंबरीची मागणी केली. त्या वेळीं असे अनेक

फुटकळ लेख वामनरावांच्या संग्रहीं पडले होते. पण त्यांत कांहीं विशिष्ट गुण आहेत, त्यांचा संग्रह लोकांना आवडेल, वगैरे गोष्टी त्यांच्या गांवींही नव्हत्या. कादंबरी नाहीं तर निदान स्फुट लेखांचा संग्रह द्या, असा प्रकाशकांनीं हट्ट धरला तेव्हां वामनरावांनीं कुठेंतरी पडलेलीं लेखांचीं कात्रणें एकत्रित करून तीं छापायला दिलीं.

अशा प्रकारच्या पुस्तकांत लेखकाचीं सर्व सुंदर वैशिष्ट्यें प्रतिबिंबित व्हावींत ही गोष्ट प्रथमदर्शनीं आश्चर्यकारक वाटते. पण थोडा वेळ विचार केला कीं या आश्चर्यावर प्रकाश पडतो. 'स्मृतिलहरी' लिहिण्यापूर्वी वामनरावांनीं कादंबऱ्या लिहिल्या व त्यांतील कांहीं लोकप्रिय झाल्या होत्या हें खरें. पण कादंबरी म्हटलें कीं कथानकाची एक बंदिस्त चौकट तयार करावी लागते. त्या कथानकांत नाना प्रकारच्या प्रसंगांचे रंगीबेरंगी आडवेउभे धागे गुंफिले जावेत आणि त्या सर्वांचें मिळून एक सुंदर चित्र तयार व्हावें अशी दक्षताही घेणें जरूर असतें. वामनराव अत्यंत सहृदय असले तरी त्यांच्या मनाची बैठक मूलतः कथाकाराची नाहीं. ती विचारवंताची आहे. कथेची गुंफण करण्यापेक्षां विचारांची गुंतागुंत उकलणें त्यांना अधिक आवडतें. त्यामुळें आपल्या निरनिराळ्या प्रसंगांतला रस त्यांना जाणवत असला आणि अशा कांहीं प्रसंगांचा त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांत उपयोग केला असला तरी कथानकाच्या सासुरवासामुळें त्यांची अनेकदां कुचंबणा होत असे, हें 'रागिणी' किंवा 'सुशीलेचा देव' यांच्या मांडणीवरून उघड होईल. 'स्मृतिलहरीं'-तल्या ललित लेखांत हें कथेच्या गुंफणीचें बंधन नाहींसें झालें. आपल्या अनुभवाला एखादा प्रेरक प्रसंग घेऊन त्याच्या अनुरोधानें विचारांचें गुंजन करण्याचें स्वातंत्र्य वामनरावांना या पुस्तकांत मिळालें. त्यामुळेंच तें इतकें सुरस झालें आहे.

गुंजन हा शब्द मीं मुद्दामच वापरला. 'ज्ञान हें विष कीं अमृत?' अशासारख्या प्रदीर्घ विद्वत्तापूर्ण लेखांत वामनराव विचारांचें मंथन करतात. तें करतांना त्यांची जी सत्यसंशोधकाची भूमिका आहे, तीच 'स्मृतिलहरीं'-तल्या ललित लेखनांतही आहे. पण तुमच्याआमच्या जीवनांतल्या साध्यासुध्या पण खऱ्याखुऱ्या प्रसंगांच्या अनुषंगानें हें सत्यसंशोधन झाल्यामुळें असो, तें करतांना आदर्शाची पूजा हा मानवी मनाचा धर्म असला तरी तें मन इतक्या

उंचीवर गुदमरून गेल्याशिवाय राहत नाहीं ही जाणीव लेखकाच्या मनांत जागृत झाल्यामुळें असो, अथवा त्यांत कळत न कळत आत्माविष्कार अधिक मोकळेपणानें झाल्यामुळें असो, वामनरावांच्या निबंधांत सहसा न आढळणारा नाजुकपणा व गोडवा या लेखांत प्रकट झाला आहे.

'स्मृतिलहरीं'तल्या ललित लेखांचें लघुनिबंधाशीं अगदीं जवळचें नातें आहे असें मी अनेकदां म्हणतों तें याच कारणामुळें. या पुस्तकांतलें 'संदेश' हें प्रकरण पाहावें. (पृ. ६६-६८) त्यांत लघुनिबंधाचा कोणता गुण नाहीं? 'मी कांहीं बडा साहित्यिक नाहीं हें तुम्हांला ठाऊक आहे' या पहिल्या वाक्यापासून त्यांत वामनरावांनीं जी तार छेडली आहे ती लघुनिबंधाचीच आहे. 'मनुष्य इंद्रियपूजक का ध्येयपूजक?' (पृ. ४०-४३) या प्रकरणाचा मथळा गंभीर वाटला तरी त्यांतलें विवेचन किती हलक्या हातानें आणि खेळकर वृत्तीनें केलें आहे हें पाहण्याजोगें आहे. किंबहुना या पुस्तकांतील सर्वच लेखांचा हा एक प्रमुख आकर्षक विशेष आहे.

लघुनिबंध लिहायला म्हणून वामनराव बसले आणि त्यांनीं हे ललित लेख लिहिले असें मुळींच नाहीं. कादंबरी लिहितांनासुद्धां तिच्या प्रचलित तंत्राचा ते फारसा विचार करीत नसत. मग असें स्वैर लिखाण करतांना ते आपल्या प्रतिभेवर पायबंद घालून घेतील हें शक्यच नव्हतें. पण त्यांनीं स्वच्छंदानें लिहिलेल्या लिखाणाचें लघुनिबंधाशीं अगदीं जवळचें नातें आहे. त्यांच्या लिखाणाला हें स्वरूप कसें प्राप्त झालें असावें याचा थोडक्यांत विचार करणें मनोरंजक होईल.

नदीचा पूर ओसरल्यावर केवळ प्रवाहाचा वेग मंदावत नाहीं, तर त्याचा गढूळपणाही नाहींसा होतो. वयपरत्वें माणसांतही असेच बदल होत असावेत. वामनरावांसारख्या विचारवंताला तर हे फरक अधिकच तीव्रतेनें जाणवले असतील. पूर्ववयांत प्रत्येक मनुष्य नाहीं म्हटलें तरी, आपापल्यापरीनें आग्रही असतो. स्वतःचीं मतें, मूल्यें, निष्ठा यांच्या निर्दोषत्वाबद्दल त्याला स्वप्नांतसुद्धां शंका येत नाहीं. पण जसजसा त्याला जगाचा अनुभव येत जातो तसतसा असला आग्रह हा दुराग्रह आहे हें त्याला उमगूं लागतें. ढालीची

एक बाजू सोनेरी असली तरी दुसरी रुपेरी असूं शकेल ही पूर्वी न पटणारी गोष्ट आतां त्याला खरी वाटूं लागते.

पन्नाशीच्या आसपास जिथें सामान्य माणसाच्या मनांत असे बदल स्पष्टपणें होऊं लागतात, तिथें वामनरावांसारख्या सहृदय व चिंतनशील साहित्यिकाच्या मनांत मानवी स्वभावाचें कोडें सोडविण्याचा प्रयत्न करतांना किती विचार-तरंग हरघडीं निर्माण होत असतील याची कल्पना करणेंच बरें. लघुनिबंध-काराची प्रतिभा अशीच असावी लागते. पाण्यांत खडा टाकला कीं तिथें लहानमोठीं वर्तुळें उठतात ना? त्याप्रमाणें कुठल्याही नव्या अनुभवानें – मग तो कितीही साधा असो वा सूक्ष्म असो–त्याचें मन पुलकित झालें पाहिजे. 'रागिणी' किंवा 'सुशीलेचा देव' यांत चर्चा, विचार व वादविवाद यांची रेलचेल आहे; क्वचित् अगदीं कल्लोळ आहे! पण ज्यांना आपण विचार-तरंग म्हणूं शकूं असा नाजुक भाग त्यांत थोडा आहे. लेखकाची विद्वत्ता, वाचन, अवलोकन, बुद्धीची कुशाग्रता आणि वृत्तीची विचारप्रवणता यांच्यांतून त्या चर्चांचा उगम झाला आहे. त्यांची बैठक मुख्यतः बौद्धिक आहे. 'स्मृति-लहरीं'तल्या ललित लेखांत जें विचारांचें गुंजन आहे त्याची बैठक भावनात्मक आहे. त्यामुळें या आठवणीवजा निबंधांचें स्वरूप पूर्णपणें निराळें झालें आहे. 'त्यानें काळी मुलगी कां पसंत केली?' आणि 'आठवणींतून आठवणी आणि मूळ मुद्द्याची पाठवणी' हीं दोनच प्रकरणें वाचलीं तरी हें सहज लक्षांत येईल.

या भावनात्मक बैठकीला वामनरावांच्या वृत्तींत स्वभावतःच वास करीत असलेल्या तत्त्वचिंतनाची जोड मिळाली. मात्र इथली तात्त्विकता त्यांच्या इतर ग्रंथांपेक्षां निराळ्या प्रकारची आहे. इथें 'केवळ सत्याकरितां सत्य' अशी लेखकाच्या सत्यशोधनाची भूमिका नाहीं. सत्याचा शोधसुद्धां जीवन अधिक सुखी व सुंदर बनविण्यासाठींच करायचा असतो हें तो क्षणभरसुद्धां विसरत नाहीं. त्यामुळें हातीं न लागणाऱ्या उच्च आदर्शापेक्षां ज्यांना तुम्ही आम्ही सहज स्पर्श करूं शकूं अशा व्यावहारिक ध्येयवादाचेंच चित्रण या ललित लेखांत वामनरावांनीं केलें आहे. मला तें मोठें मनोज्ञ वाटतें. आकाशां-तल्या चांदण्या खुडण्याची आकांक्षा मनुष्यानें खुशाल बाळगावी; पण तें करतांना आपल्या पायांना पृथ्वीचा आधार सदैव हवा याचा त्यानें स्वतःला विसर

पडूं देऊं नये. 'स्मृतिलहरीं' तल्या बहुतेक लेखांतून वामनरावांनीं हें सुवर्ण-सूत्र मोठ्या चातुर्यानें गुंफलें आहे.

ध्येयवाद आणि व्यवहार यांची सांगड घालण्यांत वामनराव इतके यशस्वी होऊं शकले याचें कारण एकच आहे. तें म्हणजे त्यांची दुहेरी प्रज्ञा. ते जसे तत्त्वज्ञ आहेत तसे विनोदकारही आहेत. तत्त्वज्ञ लेखक माणसाच्या मनाचीं सामर्थ्यें शोधीत जातो; उलट विनोददृष्टि असलेला लेखक त्या मनाच्या मर्यादा पाहत जातो. या दोन्ही शक्ति एका मनांत क्वचित् वास करतात. टिळक, राजवाडे, केतकर वगैरेंचें लिखाण पाहिलें कीं त्यांत जशी विचारांची प्रखरता आढळते तसा भावनेच्या ओलाव्याचा अभावही जाणवतो. त्यामुळें त्यांचें जीवनविषयक विवेचन कितीही तर्कशुद्ध असलें तरी सामान्य माणसाला तें थोडेंसें दूरचेंच वाटतें. वामनरावांचें वाङ्मय वाचतांना आपल्याला तसा भास फारसा होत नाहीं. त्यांची सहृदयता आपल्याला जाणवते, केव्हां केव्हां मोहवितेसुद्धां. या सहृदयतेचा उगम वामनरावांच्या विनोदी वृत्तींत आहे, कविवृत्तींत नाहीं. त्यांचें कविमन कधींच विशेष विकसित झालें नाहीं. पण त्यांच्यांतला विनोदकार मात्र जीवनांतलें कडूगोड अनुभव चाखीत चाखीत मोठा चोखंदळ झाला. केवळ चोखंदळच नव्हे! तर जितका चोखंदळ तितकाच प्रेमळही. त्यांच्या सहृदयतेंत एक प्रकारचें मधुर कारुण्य आढळतें तें याच कारणामुळें. मनुष्य देव होऊं शकत नाहीं, त्याच्यांत अनेक लहानमोठीं वैगुण्यें असतात, तो चुका – केवळ चुकाच नव्हे तर प्रसंगीं गुन्हे – करतो. पण तो स्वभावतः दुष्ट नाहीं; तो मूर्ख आहे, विकारवश आहे, शरीर आणि आत्मा यांच्या झगडयांत निर्भयपणानें आत्म्याच्या बाजूनें उभें राहायला जो धीर लागतो तो अजून त्यानें कमावलेला नाहीं, असें वामनराव वारंवार मोठ्या पोटतिडिकीनें सांगतात. 'स्मृतिलहरीं' तील पठाणाचें चित्र (पृ. ५७–५८) हें त्यांच्या प्रतिपादनाचें एक प्रकारचें प्रतीकच आहे असें म्हटलें तरी चालेल. 'त्यानें रागाच्या भरांत आपल्या बायकोचा खून केला होता, पण तो फार सज्जन होता.' (पृ. ५७) हें किती विचित्र आणि विलक्षण वाक्य आहे! पण वामनरावांच्या मतें त्यांत शंभर टक्के सत्य आहे. मनुष्याचें मन हें मोठें विचित्र रसायन आहे. त्यांत अगणित घटक –

त्यांतले कांहीं परस्परविरोधीसुद्धां असतात – चित्रविचित्र रीतीनें मिसळले जातात. जगांत जणूं कांहीं क्षणाक्षणाला माणसाचें मन घडविलें जात असतें. प्रत्येक अनुभवाची त्याच्यावर प्रतिक्रिया होत जाते. आनुवंशिकता, उपजत गुणदोष, परिस्थितिजन्य संस्कार, वासनांची व भावनांची अतृप्तता, सामाजिक घडामोडींचे परिणाम, एक ना दोन, अशा शेंकडों गोष्टी मिळून शेवटीं माणसाचें मन बनतें. त्या मनाचा एखादा आविष्कार अतिशय भयंकर असेल. पण एखाद्या तळ्यांत सुसरी असल्या तरी जशीं कमळें फुलत राहतात, त्याप्रमाणें अशा माणसाच्या मनांतही चांगल्या किंवा नाजुक भावना जागृत असतात, अशी वामनरावांची श्रद्धा होती. जगाचे अत्यंत कटु अनुभव आले असूनही माणुसकीवरली त्यांची ही श्रद्धा कधीं ढळली नाहीं. त्यांच्या वृत्तींत कधीं कडवटपणा आला नाहीं. याचें सारें श्रेय त्यांच्यांतल्या विनोदकाराला च दिलें पाहिजे. मनुष्य हा असा आहे व तो तसा आपण स्वीकारला तरच आपण त्याचा विकास करूं शकूं अशी त्यांची निष्ठा होती. या निष्ठेमुळें त्यांचा विनोद किती सौम्य, नाजुक, मधुर आणि हृदयंगम झाला आहे हें 'स्मृतिलहरीं' तलें कुठलेंही प्रकरण चाळलें तरी दिसून येईल.

धोंडोपंत बर्व्यांच्या म्हणून वामनरावांनीं सांगितलेल्या या आठवणी पुष्कळ अंशीं त्यांच्या स्वतःच्याच आहेत. नजराण्याचें ताट जाळीदार रेशमी रुमालानें झांकण्याची पद्धत आहे. त्यामुळें तो नजराणा अधिकच आकर्षक वाटूं लागतो. या पुस्तकांत धोंडोपंतांची काल्पनिक मूर्ति वामनरावांनीं निर्माण केली आहे ती एवढ्यासाठींच. या विशिष्ट पद्धतीमुळें आत्मनिवेदनाचा जिव्हाळा आणि काल्पनिक वाङ्मयांतलें लालित्य यांचें मोठें सुंदर संमीलन या स्मृतींत झालें आहे.

वामनरावांनीं हे लेख लिहिले तेव्हां लघुनिबंधकार म्हणून फडके–काणेकर यशस्वी रीतीनें वाटचाल करीत होते. त्यांचें लेखन आल्फा ऑफ् धी प्लाउ, लिंड्, ल्यूकास, रिचर्ड किंग इत्यादि इंग्रजी लघुनिबंधकारांच्या पद्धतीचें होतें. वामनरावांनीं या आधुनिक लेखनपद्धतीकडे कधींच फारसें लक्ष दिलें नाहीं. मात्र 'स्मृतिलहरी' वाचतांना एक गोष्ट मनांत आल्यावांचून राहत नाहीं. पहिल्या पिढींतल्या लेखकांनीं मेकॉलेप्रभृति गंभीर निबंधकारांपासून जशी

स्फूर्ति घेतली तशी गोल्डस्मिथ, ॲडिसन्, स्टील वगैरे ललित निबंधकारांपासून घेतलेली दिसत नाहीं. 'The Vision of Mirza' सारख्या ॲडिसन्च्या कांहीं निबंधांचे मराठींत अनुवाद झाले. पण ॲडिसन्च्या लेखनाचें मर्म – हळुवार हातानें, कधीं गुदगुल्या करीत तर कधीं चिमटे काढीत, जीवनदर्शन घडविणें – लक्षांत घेऊन त्या पद्धतीचा अवलंब कुणीं केला नाहीं. विद्यार्थिदशेंत वामनरावांच्या हातून या इंग्रजी ललितनिबंधकारांचा थोडाफार अभ्यास घडला असावा, ते संस्कार प्रौढपणीं 'स्मृतिलहरी' लिहायला घेतल्यावर जागे झाले आणि त्यामुळें त्यांच्या हातून हें निराळ्या धर्तीचें हृदयंगम लेखन घडलें असा तर्क केला तर तो सर्वस्वीं चुकीचा ठरूं नये. ॲडिसन्नें आपल्या निबंधांच्या द्वारें सर रॉजर डी. कॉव्हर्लेसारखें अमर पात्र इंगजी वाङ्मयांत निर्माण केलें. 'स्मृतिलहरीं' तले धोंडोपंत मराठी वाचकांना असेच प्रिय होऊन राहतील.

या चिमुकल्या पुस्तकांत विविध अनुभव आहेत, हृद्य कथाप्रसंग आहेत, मजेदार स्वभावचित्रें आहेत, मार्मिक तत्त्वचर्चा आहे, खुसखुशीत संभाषणें आहेत, रम्य विनोदस्थळें आहेत, सुविचार आहेत, सुभाषितें आहेत. आणि विशेष हें कीं या सर्व गोष्टींना कुठेंहि खोगीरभरतीचें स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. निवेदनाच्या, संभाषणाच्या किंवा चर्चेच्या ओवांत सहजासहजीं या साऱ्या गोष्टी आपल्याला भेटतात व आपला बौद्धिक आणि भावनात्मक आनंद वृद्धिंगत करतात. एखाद्या झऱ्याच्या कांठानें गंमतीनें फिरत फिरत जावें आणि फुलें, पांखरें, वनश्री वगैरेंच्या दर्शनानें मन उल्हसित व्हावें, तसें हें पुस्तक वाचून वाचकाला वाटतें.

मात्र या आनंदापेक्षांही उच्च प्रकारची शक्ति या पुस्तकांत आहे. दोन तासांत हें पुस्तक वाचून हातावेगळें करतां येतें. पण पहिलें वाचन संपल्यावरच त्याची गोडी आपल्याला कळूं लागते – आणि तें पुनःपुन्हाः वाचण्याची इच्छा उत्पन्न होते! या सर्व स्मृतींवर मार्मिक सांसारिक तत्त्वज्ञानाची जी सौम्य सोनेरी सांवली पसरली आहे ती दीर्घकाळ आपल्याभोंवतीं रेंगाळत राहते. 'स्मृतिलहरी' चें वाचन आपल्याला अंतर्मुख करतें, क्षणभर उदात्त पातळीवर नेतें. माणूस थोडासा अंतर्मुख झाला, जीवनाच्या प्याल्यांत केवळ

सुख सहसा असूं शकत नाहीं, किंबहुना सुखदुःखांचें चित्रण हाच खरा जीवनरस आहे हें त्यानें जाणलें, ज्या न्यायाची तो इतरांकडून अपेक्षा करतो तोच आपण इतरांना दिला पाहिजे हें एकच तत्त्व जरी त्यानें प्रामाणिकपणें अमलांत आणण्याचा प्रयत्न केला, तरी जगांतलीं कितीतरी दुःखें हां हां म्हणतां नाहींशीं होतील, हा विचार या स्मृतींच्या नंदादीपासारख्या स्निग्ध प्रकाशांत मनांत बळावत जातो. या विचाराची आजच्या जगाला अतिशय आवश्यकता आहे. शीतयुद्धांनीं कुडकुडलेला, महागाईनें मरगळून गेलेला आणि उद्यांचा दिवस कसा उजाडणार आहे याची कल्पना नसल्यामुळें संत्रस्त आणि संभ्रमित झालेला जगांतला सामान्य मनुष्य आज आशाळभूतपणानें चोहींकडे नजर टाकीत आहे, जीवनाला दृढमूल करणारे नवे आधार शोधीत आहे. त्याला हें पुस्तक थोडासा तरी दिलासा देईल. ॲटम् बॉम्बच्या आणि अंधलोभाच्या विध्वंसक शक्तीपेक्षां माणसाच्या प्रेमाचें आणि त्यागाचें विधायक सामर्थ्य अनेक पटींनीं अधिक आहे हा वामनरावांचा संदेश त्याच्या काळवंडलेल्या मनांत आशेचा किरण निर्माण करील. 'खरं जीवन म्हणजे काय हें मला तुरुंगांत असतांना कळून आलं. आम्ही तिथं एकमेकांना मनुष्य म्हणून ओळखूं लागलों.' या त्यांच्या उद्‌गारांत जीवनाचें रहस्य विशद करणारा गुरुमंत्र आहे अशी त्याची खात्री होईल.

जून १९५३
कोल्हापूर

वि. स. खांडेकर

स्मृति-लहरी

म्हातारपणाला दुसरी बाल्यावस्था म्हणतात. पहिल्या बाल्यावस्थेंत दुसऱ्यांच्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात, तर दुसऱ्या बाल्यावस्थेंत स्वतःच्या आठवणी सांगाव्याशा वाटतात. या दुसऱ्या अवस्थेला *Anecdotage* हा एक चांगला इंग्रजी शब्द आहे; कारण त्यांत *Anecdote* आणि *dotage* या दोनहि शब्दांचे अर्थ सूचित होतात. मराठीमध्यें असा चांगलासा शब्द नाहीं. धोंडोपंत कर्व्यांनीं 'अठ्ठावनी' हा शब्द 'आठवणी सांगण्याची हौस ज्यांत आहे असें अठ्ठावनाच्या आसपासचें वय' या अर्थानें वापरण्यांत यावा, असें एकदां संभाषणांत सुचविलें. ही सूचना मान्य होवो न होवो, ते आतां 'अठ्ठावनीं'त आलेले आहेत यांत शंका नाहीं. कारण सांगण्यासारख्या कृति करण्यापेक्षां ऐकण्यासारख्या स्मृति सांगण्यांतच त्यांना अधिक आनंद वाटत असतो असें दिसतें. त्यांचा हा दोष असेल किंवा नसेल. एवढी गोष्ट खरी कीं त्यांच्या स्मृति ऐकण्यांत आम्हांला तरी आनंद होतो. आठवणी सांगण्याबद्दल त्यांना फारसा आग्रह लागत नसे. आम्ही घरोब्याची मंडळी एकत्र बसलों म्हणजे एखादा दुसरें विधान करून किंवा स्पष्टच प्रश्न विचारून किली फिरवली म्हणजे त्यांचें घड्याळ चालू व्हायचें! या आठवणी लिहून काढा म्हणून त्यांना एकदां आम्हीं विनवलें तेव्हां त्यांनीं कांहीं आठवणी लिहून काढल्या. पण हें काम त्यांनीं स्वभावानुसार अर्धवट सोडून दिलें, तेव्हां आम्ही मंडळींनीं आपणच त्या लिहून काढाव्या असें ठरवलें. कांहीं आठवणी त्यांनीं लिहिलेल्या आहेत; कांहीं आठवणी त्यांच्या आणि इतरांच्या साहाय्यानें संपादकानें लिहून काढलेल्या आहेत. त्यानेंहि हें काम पुरतें केलेलें नाहीं, पण हें अर्धवट सोडलेलें काम पुढें-मागें पुन्हा हातीं घेतां येईल अशी आशा आहे.

—संपादक

१

खरं बोलणारे, का खोटं बोलणारे ?

मी म्हणजे एक विचारी माणसांना गूढ आहे. अविचारी माणसांपैकीं कांहींजण मला खोटं बोलणारा, ढोंगी, लुच्चा म्हणतात, व कांहींजण मला खरं बोलणारा, सरळ, सात्त्विक समजतात. मला माझ्याविषयीं काय वाटतं विचाराल तर मी प्रांजलपणानं सांगेन, मी दोन्ही आहें. आणि अगदीं खरं बोलावयाचं म्हणजे मी कसा आहें हें माझं मलाच समजत नाहीं ! मी कित्येक वेळां खरंहि बोलतों आणि कित्येक वेळां खोटंहि बोलतों. पुष्कळ वेळां एखाद्याशीं खरं बोलून एखादे वेळेस त्याला मी फसवतों हें जितकं खरं आहे तितकंच, एखादेवेळेस सद्धेतूनं एखाद्याशीं खोटं बोलल्यामुळें मी खरं बोलणारा आहें असा माझ्यावर उगाच आरोप केला जातो हेंहि खरं आहे !

खरें-खोटेंपणाबद्दलच नव्हे, तर माझ्या इतर गुणावगुणांविषयीं बोलतांना खोल विचार करणारे लोक मतच देत नाहींत. मित्रमंडळी माझ्या गुणांवर आणि सत्कर्मांवर स्तुतिसुमनांचा वर्षाव करतात आणि शत्रु माझ्यावर शिव्यांची लाखोली वाहतात ! जगांत ईश्वर असता, आणि तो पृथ्वीतलावरील मानवी जगाला मधूनमधून दर्शन देणारा असता आणि माझ्याविषयीं कुतूहल असणाऱ्या लोकांची जिज्ञासा ईश्वरानं तृप्त करण्याइतकी ती त्याला महत्त्वाची वाटती तर तो मात्र बरोबर मत देता. पण एवढं भाग्य कुठं आहे कीं माझ्याविषयीं मत देण्याकरितां कां होईना, ईश्वरानं अस्तिवांत यावं आणि माझ्या मित्र-शत्रु-तटस्थांच्या मतांची त्याला इतकी मातब्बरी वाटावी कीं त्यानं सगुण रूप धारण करून ती जिज्ञासा तृप्त करावी ? (बाकी राहून राहून मला असं एक आश्चर्य वाटतं कीं प्लॅन्शेट (Planchette) लावून तुकाराम-रामदासांच्या स्वर्गस्थ आत्म्यांना जर आधुनिक ' ऋषि ' पाहिजे तेव्हां आपल्या खोलींत बोलावून आणूं शकतात तर या ' ऋषीं ' ना प्रत्यक्ष ईश्वरालाच प्लँशेटच्या

द्वारें समन्स लावून बोलावून कां आणतां येऊं नये ? पण हें विषयान्तर झालं; गडकऱ्यांच्या धुंडिराजपंतांसारखं होतं कधीं कधीं माझं.) सांगत काय होतों तर, माझ्या आठवणी मी कांहीं सांगणार आहे त्या खऱ्या म्हणा, खोट्या म्हणा, मला चांगलं म्हणा, वाईट म्हणा, मी आपला मला आठवेल तसं सांगणार आहें. आणि पहिल्याप्रथम सांगून ठेवतों कीं, यांत मी कालक्रम पाहणार नाहीं किंवा 'कलाविकास' का कायसं निघालं आहे ना – तें पाहणार नाहीं. आठवणींचं 'तंत्र' कांहीं असलं तर तें माझ्या ऐकिवांतदेखील नाहीं. मी एवढंच तंत्र संभाळणार कीं, आठवेल तसं सांगावयाचं, आणि लिहिण्याच्या पूर्वी मंत्र एवढाच जपणार कीं, माझा मान सांगतांना विनयाचं वरवर सोंग घेण्याची जशी मला इच्छा होऊं नये तशीच माझी फजिती सांगतांना लज्जेनं लपवालपवीहि मीं करूं नये. माझं वर्तन बरं असो किंवा बुरं असो, माझं हें लेखन खरं असावं ही माझी इच्छा आहे. हीच माझी कला, हेंच माझं सामर्थ्य आणि हीच माझी (ईश्वर असला तर त्याच्याजवळ) विनंती.

जीव तोडून हें जरी मी बोललों तरी तें कांहीं कोणी खरं मानणार नाहीं. आणि मीहि खरं मानीत नाहीं ! कारण माझं खरं बोलणं कोणतं आणि खोटं कोणतं हें माझं मलाच समजत नाहीं ! अनुभवांतली एक गोष्ट सांगतों म्हणजे कसं तें ध्यानांत येईल.

आमची विमल (म्हणजे विमल उपाध्ये नव्हे, विमल कर्वे), विनायकराव कर्व्यांची मुलगी, कॉलेजमधें इंटरच्या वर्गांत होती तेव्हांची गोष्ट. विनायकरावांनीं डेक्कनी कॉलनींत स्वतःच्या मालकीचीं दोन घरं बांधलेलीं, शिवाय डॉक्टर म्हणून चलती. तेव्हां त्यांची आणि अर्थात् त्यांच्या पत्नीची इच्छा अशी कीं, तिला श्रीमंताचा हुशार मुलगा पति म्हणून लाभावा. आणि हें कांहीं कठीण नव्हतं. कारण विमल चांगली देखणी होती, बुद्धीनं उत्तमांपैकींच. आणि खऱ्याच गोष्टी बोलावयाच्या तेव्हां सांगण्याला हरकत नाहीं कीं, तिला चांगले सुदृढ, हुशार, सद्गुणी, श्रीमंत असे दोन मुलगे सांगून आले होते ! (म्हणजे अर्थात् मध्यस्थांच्या द्वारें, दुरून दुरून, पण सूचक रीतीनं, मागणी घालण्यांत आली होती.) पण आमचे विनायकराव कर्वे जितके श्रीमंत, तितकेच सरळ आणि सालस. त्यांनीं त्या तरुणांना बोलावून आणून सांगितलं कीं, "मला तुमच्या सगळ्या गोष्टी पसंत आहेत. पण आमच्या मुलीचा

स्वभाव आणि तिचीं मतं तुम्हांला पटतील कीं नाहीं याबद्दल तुमचा तुम्ही विचार करा ! ती सुशील आहे, विचारी आहे, विनयशील आहे; पण – पण, खरं बोलायचं म्हणजे स्वातंत्र्यवादाचं खूळ तिच्या डोक्यांत शिरलेलं आहे. तुमच्या कॉलेजांतल्या सभांमधें ती जें कांहीं बोलते तें तुम्हांला ठाऊकच आहे. तेव्हां या बाबतींत तिचं आणि तुमचं पटेल का नाहीं याबद्दल विचार करून पाहा. माझ्याशीं तर ती असं म्हणत असते कीं, सुशील पति जसा आपल्या पत्नीशीं वागतो तशी मी आपल्या पतीशीं वागेन; म्हणजे बेफामपणें अनिर्बंध वागेन असं नव्हे, तर तो जसा आपल्या मित्रांबरोबर किंवा मैत्रिणींबरोबर पत्नीला न विचारतां फिरायला जातो, त्यांना घरीं घेऊन येतो, चहापाणी देतो, तसं मीहि करीन. घरांतलं काम तिला करावं लागणारच नाहीं; पण देखरेख करावी लागेल, ती आनंदानं करील; पण पुरुष जसा आपल्या कामाबद्दल स्वतःलाच जबाबदार असतो, तशी ती असेल. " अशा प्रकारचं विनायकरावांचं बोलणं ऐकल्यावर मागणी घालणारे बहुतेक तरुण नाकापेक्षां जड होऊं शकणारं हें मोतीं नाकारीत. विमल आईबापांशीं बोलतांना आपलीं मतं स्पष्ट सांगून टाकी, तेव्हां पति-पत्नींमधें पुढें बेबनाव येऊं नये म्हणून भावी पतीला आगाऊच या गोष्टी सांगून त्याला त्या पसंत असल्यास विवाहाला संमति द्यायची, असं विनायकरावांचं धोरण होतं आणि तें व्यवहारदृष्ट्या बरोबरच दिसतं. तिची आई विनायकरावांना म्हणायची कीं, असल्या गोष्टी सांगून मागणी घालणाऱ्या वरांना तुम्ही बिचकवतां. पण विमलच वडिलांचा पक्ष घ्यायची आणि ' बाबा करतात तेंच बरोबर आहे ' असं म्हणायची !

माझा घरोबा असल्यामुळें हे वादविवाद (आणि कधीं कधीं सौम्य खटके) मला ठाऊक होते. आणखी एक गोष्ट मला ठाऊक होती ती ही कीं, विमलचा ओढा माधव आपटे याच्याकडे आहे. हा आपटे म्हणजे आमच्या कॉलेजांतल्या आमच्याबरोबर असलेल्या पी. एम्. आपटे, बार्शीला आतां वकील झाले आहेत, त्यांचा मुलगा. त्याचंहि मन तिच्याकडे ओढ घेत होतं; पण विमलचीं हक्काबद्दलचीं सभेंतलीं भाषणं, आणि आघाडी मारून आधींच मागणी करणाऱ्या दोघां तरुणांची मधाशीं सांगितलेली पीछेहाट,यांमुळें तोहि पुढें पाऊल टाकण्यास बिचकत होता.

शिवाय त्याला बायकांचा अलीकडचा स्वातंत्र्यवाद विशेष पसंत नव्हता.

सात्त्विक दृष्टीनं व बायकांच्याच हिताच्या दृष्टीनं तो म्हणे कीं, 'न स्त्री-स्वातंत्र्यमर्हति'। त्याच्या बाबतींत दुसरी अडचण अशी होती कीं, त्याचा देशाभिमानाकडे, किंबहुना सत्याग्रहाकडे, ओढा होता आणि पोषाखांत व राहणींत साधेपणा असावा अशा मताचा तो होता. विमल त्याला आवडे, पण तिचीं सुधारलेलीं मतं आणि तिचे तऱ्हेदार पोषाख त्याला आवडत नसत. (सौंदर्याच्या दृष्टीनं आवडत असत. आणि विमलला ते चांगले शोभतात असंहि त्याला वाटे, पण 'रंगेलपणाचे' म्हणून आवडत नसत !) त्यांत पुनः अडचण अशी उत्पन्न झाली कीं, तिनं एकदां 'सत्याग्रह इष्ट का अनिष्ट' याविषयीं कॉलेजांत वादविवाद झाला असतां विवाहित सत्याग्रही लोकांवर तिनं पुष्कळ तोंडसुख घेतलं होतं आणि 'ज्यांना या फंदांत पडावयाचं असेल त्यांनीं लग्नाच्या फंदांत पडूं नये' अशा आशयाचं वक्तृत्वपूर्ण भाषण केलं होतं.

दोघांकडचा घरोबा, दोघांचा खरा स्वभाव आणि दोघांचीं खरीं मतं ठाऊक, मनांचा ओढा आणि अडचणीहि ठाऊक, – आणि आमचा मूळचा स्वभाव विकतचीं श्राद्धं घेऊन अनाहूत परोपकार करूं पाहावयाचा आणि अशा लोकांना मिळणारे शिव्याशाप घेऊन मनांत पश्चात्ताप पावत बसावयाचं (किंवा यदा-कदाचित् कोणी महात्म्यानं उपकार करण्याच्या इच्छेबद्दल दुवा दिला तर ब्रह्मानंद मानून मागील पश्चात्तापाचीं दुःखं विसरावयाचीं !) अर्थात् त्या तरुण-तरुणींकडे पाहून आमचं मन द्रवलं. तरुणांच्या काय, किंवा मोठ्या पोक्त लोकांच्या काय, मतांचं आम्हांला कांहीं वाटत नाहीं. आम्ही एकंदर वृत्ति आणि धोरण पाहतों आणि हीं सात्त्विक आणि उदार असलीं म्हणजे कोठल्याहि दोन माणसांचं जुळलंच पाहिजे, असं आपलं आमचं मत. नवरा-बायकोचं तर जुळलंच पाहिजे याबद्दल आमची बालंबाल खात्री आहे. तेव्हां आम्हीं या दोन प्रेमी जीवांचं लग्न जुळविण्याचं मोफतचं पौरोहित्य स्वीकारलं, आणि मध्यस्थाची कुशलता दाखविण्याला आरंभ केला.

बंगल्याच्या आवारांतील बागेंत फिरतां फिरतां विमलला एक दिवस मीं म्हटलं कीं, "माधव आपट्याचं तुझ्याबद्दल इतकं चांगलं मत असेल असं मला नव्हतं वाटलं."

"कशावरून तुम्ही म्हणतां ?" विमल म्हणाली.

"कशावरनं काय ?" मीं उत्तर दिलं. 'मी प्रत्यक्ष बोलण्यावर भिस्त ठेवीत

नसतों. प्रसंगोपात काढलेल्या उद्‌गारांना मी फार महत्त्व देतों. अलीकडे तऱ्हेदार पोषाखावर तो टीकास्त्र चालवीत नाहीं, आणि जिच्याजवळ पैसे असतील तिनं नीटनेटका पोषाख करण्यास हरकत नाहीं असं तो म्हणूं लागला आहे, म्हणून मी म्हणतों. बाकी नीटनेटकं आवडूं लागलं आहे म्हणून नीटनेटका पोषाख आवडूं लागला आहे, असं मी तरी म्हणेन, मग तूं आपली कांहींहि म्हण ! '

" समजलं समजलं. " विमल उद्‌गारली, " तुम्ही हें संगळं खोटं सांगतां. "

" मी खोटं सांगेन असं तूं –विमल, तूं म्हणतेस ? तूं देखील माझ्यावर आरोप करूं लागलीस म्हणजे मग जगांत राह्यलाच नको ! " असं म्हणून मीं उसासा सोडला आणि असा आविर्भाव आणला कीं विमलनं लगेच माफी मागितली !

हा विजय संपादून आमची स्वारी मग माधव आपट्याकडे गेली आणि त्याच्याजवळहि वरच्यासारखाच प्रयोग करून विमलबद्दल त्याचं मन जें साशंक होतं तें थोडंबहुत विवाहानुकूल केलं !

खरी गोष्ट सांगावयाची प्रतिज्ञा प्रथमच केली आहे, तेव्हां कादंबरीप्रमाणें नसती गुंतागुंत उत्पन्न न करतां एकदम सांगून टाकतों कीं, थोडक्याच दिवसांत विमल आणि माधव यांना परस्परांशीं विवाहबद्ध होण्यास आम्हीं अनुकूल केलं. एखादं मोठं राजकारण-मोठी मुत्सद्देगिरी–लढवून साध्य झाल्यावर आपल्या इकडच्या फडणविसाला किंवा युरोपांतल्या बिस्मार्कला जसा आनंद झाला असेल तसा आनंद आम्हांला झाला ! विमलजवळ माधवसंबंधानं आणि माधवाजवळ विमलसंबंधानं आम्हीं ज्या खोट्याखोट्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या त्यांच्या ध्यानांत आल्या कीं काय असा संशय दोनदां-तीनदां आला, पण तो खोटा ठरला आणि विमलनं जेव्हां माधवाच्या कंठांत माळ घातली तेव्हां विजयश्रीनं आमच्याहि गळ्यांत माळ घातली अशी आमची समजूत झाली ! आणि कां होऊं नये ? (आतां मात्र तसा आनंद होत नाहीं, कारण मी त्यांना बनवायच्या ऐवजीं त्यांनींच मला बनविलं होतं असं आतां मला पक्कं आणि पुराव्यानिशीं समजून आलं आहे. त्या दोघां लुच्च्यांच्या ध्यानांत माझा कावा लवकरच आला होता आणि तीं दोघंजण लग्नाच्या आधीं मला चांगलंच बनवीत होतीं !)

मौज अशी झाली होती कीं, त्यांना फसविण्याचा माझा उद्योग त्यांच्या लक्षांत येऊं लागल्यावर माझ्या पोक्त भोळसटपणाचे आणि सात्त्विक लुच्चेगिरीचे अनेक

मासले आठवणं आणि एकमेकांना सांगणं हा एकमेकांशीं बोलण्याला आणि मोकळेपणानं हसण्याला त्यांना एक विषयच मिळाला व यामुळें त्यांचा संकोच आणि भिडस्तपणा नाहींसा झाला. भिडस्तपणा गेल्यावर माझा कावा आपल्या ध्यानांत आला नाहीं असं दाखवून मला फसविण्याचे गुप्त कट त्यांनीं केले आणि अशा रीतीनं त्यांच्या प्रेमसंभाषणांना आणि प्रेम-लीलांना निमित्त होण्याचं पुण्य मला लाभलं !

मी खरं बोलतों का खोटं, यावरून गोष्ट निघाली, तेव्हां आतां मी पुनः विचारतों कीं, मी या प्रसंगीं खरं बोललों का खोटं ? [उभयतांचं खरं हृदय मीं ओळखलं होतं तेव्हां मी जें बाह्यतः खोटं बोललों तें खोल तात्पर्यार्थानं खरं होतं; पण एका अर्थीं मी बरंचसं खोटंहि बोललों नव्हतों का ?]

• • •

२

गुलाबाचें फूल व अनुमान

आमचा माधव आपटे आणि विमल कर्वे यांचं लग्न कसं जुळून आलं हें मागं सांगितलं. त्यांचं लग्न झाल्यावर एक थोडीशी जी गंमत झाली ती आतां सांगतों.

तीं उभयतां लग्न झाल्यावर एक दिवस माझ्याकडे सहज गप्पा मारण्याकरितां आलीं असतां आमच्या आवडीचा विषय, म्हणजे स्त्री-पुरुषांची लायकी आणि त्यांचे हक्क, याविषयीं चर्चा सुरू झाली. मी त्या वेळेस मॅट्रिक्युलेशनचे मराठीचे पेपर तपाशीत होतों आणि पेपरांची ती रास तपासतां तपासतां माझा जीव मट्टच्यास आला होता. तीं आलीं त्या वेळेचा एक चांगल्या वळणदार उभ्या अक्षरांत लिहिलेला पेपर मी तपाशीत होतों व त्यांतील उत्तरं वाचून खूप झालों होतों. कारण अशीं मार्मिक उत्तरं वाचण्याचं भाग्य फारच थोड्या वेळां येतं (आणि खरं बोलायचं म्हणजे दुसरं कारण असं कीं, तो पेपर एका मुलीनं लिहिलेला असला पाहिजे असं मीं अक्षरावरून आणि भाषेवरून ताडलं होतं. एका प्रश्नाच्या उत्तरांत कांहीं आक्षेपांचं निरसन करतांना " पण मी म्हणत्यें " असें म्हणून आक्षेपांचं निरसन केलेलं होतं.) माधव हा बोलण्यांत तरी बायकांच्या विरुद्ध, तेव्हां त्याला त्या पेपरांतील कांहीं वाक्यं वाचून दाखवून मीं म्हटलं, 'बोल आतां, असले मार्मिक विचार आणि अशा सुंदर भाषेंत सांगणाऱ्या मुलींची योग्यता मुलांपेक्षां कमी असते, असं तूं म्हणूं शकशील का ?" यावर माधव विमलकडे डोळे मिचकावून म्हणाला कीं, '[बागेंत एखादं चांगलं गुलाबाचं फूल असलं म्हणजे बाग चांगली असते, असं ठरत नाहीं. एका उदाहरणावरून सामान्य सिद्धान्त काढतां येणार नाहीं. "] विमला म्हणाली, " आतां उदाहरण तुमच्या विरुद्ध जात आहे म्हणून हा तार्किक वेदान्त तुम्हांला सुचतो आहे; बाकी संसारांतलीं अनुमानं अनुभवांतल्या थोड्या उदाहरणां-

वरूनच काढलेलीं असतात आणि तीं बरोबरहि असतात. बागेंत गुलाबाचं एकच फूल असलं तरी त्या एका फुलावरून गुलाबाचीं फुलं चांगलीं असतात हें अनुमान काढतां येईलच." त्या दोवांच्या तार्किक वादांत मी शिरलों नाहीं, पण माझं खरं मत स्त्रियांच्या बाबतींत पक्षपाती असल्यामुळें मीं त्या पेपरांतील दुसरीं कांहीं वाक्यं वाचून दाखविलीं आणि "अशीं वाक्यं लिहिणारा मुलगा इतक्या पेपरांमध्यें तरी, अजून दिसला नाहीं" अशा प्रकारें बोलून स्त्रियांची तरफदारी करूं लागलों. माधवाच्या मनांत माझ्याबद्दल आदर होता, पण वाद करीत असतां तो कोणाला ऐकावयाचा नाहीं आणि कोणाची प्रतिष्ठा ठेवायचा नाहीं. तो मला म्हणाला कीं, "मुलींच्या पेपरांना जास्ती मार्क देण्याची आणि त्यांची वाहवा करण्याची प्रोफेसरांची रीतच आहे, त्यांतलाच हा प्रकार आहे झालं. पेपर बऱ्यापैकीं आहे, पण तो उत्तमांपैकीं नाहीं आणि प्रातिनिधिक तर मुळींच नाहीं." विमल अर्थात् जोरजोरानं म्हणाली कीं, "तो उत्तम आहे आणि प्रातिनिधिकहि आहे." आणि माधवाकडे एका विशिष्ट भावगर्भ मुद्रेनं पाहून ती पुढें म्हणाली, "बायकांमध्यें कांहीं चांगलं दिसल तरी 'नाहीं' म्हणायचं असं ठरवल्यावर चांगलं दिसणार कसं? डोळस मनुष्य आंधळ्यासारखं वागूं लागला तर कोण काय करणार?" माधव लगेच उत्तरला, "आंधळ्यासारखा कशाला म्हणतेस? आंधळा झालों होतों म्हणून तर लग्न केलं!" हा प्रेमकलह तिथंच थांबविण्याच्या इराद्यानं मीं म्हटलं, "हा वाद राहूं द्या. मला पेपरांची ही रास आज संपवावयाची आहे. हा नंबर किती?—एक हजार तीन?"

हा नंबर ऐकल्याबरोबर माधव एकदम उद्गारला.

"आं? काय, म्हणतां काय? १००३! अहो, हा नंबर तर माझ्या नानूचा! मुलींना जास्ती मार्क मिळतात म्हणून मुलींसारखं अक्षर काढून 'मी म्हणत्यें' असं मुद्दाम लिहिण्याचं मीं ठरवलं आहे, असं एकदां तो म्हणाला होता खरा!"

हें ऐकल्यावर माझ्या स्त्रीपक्षपाती मनांत आणि विशेषेंकरून आमच्या विमलच्या मनांत कोणकोणते विचार-विकार उत्पन्न झाले असतील आणि आमचे चेहरे कसे झाले असतील, याचं वर्णन करण्यास प्रो. फडक्यांसारख्यांचीच लेखणी समर्थ आहे!

• • •

३

जगाची स्तुति आणि निंदा

माझे बाळमित्र बाळासाहेब पानसे, माधव आपटे, त्याची पत्नी विमल आणि मी सामाजिक सुधारणेसंबंधीं बोलत असतां, 'लोकमताला कितपत किंमत द्यावी ?' हा प्रश्न निघाला. माधव म्हणाला, "लोकमताला मुळींच किंमत देऊं नये." विमलनं अर्थात् त्याच्या उलट बाजू घेतली. "तुमचं पुरुषांचं ठीक आहे, पण आम्हां बायकांना लोकमताला भ्यावं लागतं. मी स्वतः लोकमताला विशेष भीक घालीत नाहीं, पण सामान्य बायकांबद्दल मीं म्हटलं." माझे मित्र बाळासाहेब स्वतःचं मत न देतांच अध्यक्षाप्रमाणें बसून राहिले व या कौटुंबिक सभेंत 'उपवक्ता' म्हणून बोलण्याची त्यांनीं मला डोळ्यांनीं, मानेनं व हास्यानं सूचना दिली. वसंतव्याख्यान-मालेंतील पूर्वीच्या कांहीं उपवक्त्यांप्रमाणें मीं स्वतंत्र व्याख्यानच दिलं ! पण त्यांत कांहीं मनोरंजक गोष्टी असल्यामुळें तेथील तीन श्रोत्यांनीं तें ऐकून घेतलं. मीं म्हटलं:—

"जगांत स्तुति काय किंवा निंदा काय, दोन्हीहि कित्येक वेळां निराधार असतात. वीस वर्षांपूर्वीं मी असिस्टंट सुपरिंटेंडंट होतों. (बाळासाहेब त्या वेळेस आमच्या शाळेंत शिक्षक होते आणि एल्एल्. बी. चा अभ्यास करीत होते, त्यांना आठवत असेल मी सांगतों ती गोष्ट.) माझ्या अगदीं धाकट्या भावाला, त्यानं शिक्षकाचा अपमान केला म्हणून मीं वर्गांत जाऊन पांच छडयांची शिक्षा दिली. (त्या वेळीं अशा शिक्षा देत असत.) वास्तविक त्याचा कांहीं दोष नव्हता. कारण शिक्षकानं व्याकरणाचा एक चुकीचा नियम सांगितला होता, त्यावर त्यानं फक्त कांहीं शंका विचारल्या होत्या. मास्तरांचा दोष असूनसुद्धां मीं आपल्या धाकट्या भावाला जाणूनबुजून शिक्षा केली. कां ? तर निष्पक्षपातीपणाची कीर्ति मिळावी म्हणून ! अपेक्षेप्रमाणें मला कीर्ति मिळाली, पण या पोराला अपमानामुळें क्षय लागण्याची पाळी आली ! लोकांत माझी कीर्ति

झाली, पण माझं पाप मी मनांत ओळखून आहें ! बाळासाहेब, आठवते आहे ना ही गोष्ट ? "

" हो, हो. आठवते आहे तर ! तुमची स्तुति करणाऱ्यांमध्यें मी नव्हतों, हें सांगा या तरुणांना. नाहीं तर यांचा गैरसमज व्हायचा ! "

" झाला तरी हरकत नाहीं. निंदा तुम्ही नेहमींच करतां, तेव्हां एकदां तरी स्तुति केल्याचा आरोप येऊं द्या ! ही थट्टा सोडून दुसरी अनुभवाची गोष्ट सांगतों, त्यावरून दिसून येईल कीं, स्तुति जशी कित्येक वेळां अनाठायीं असते तशी निंदाहि असते. वीस वर्षांपूर्वीचीच गोष्ट. बाळासाहेबांना हेंहि प्रकरण ठाऊक आहे. "

" कोणतं प्रकरण ? "

" कुसुम गोगटेचं. तिला आतां पांच-सहा मुलं झालीं आहेत आणि तिच्या मुलीला मुलगी होऊन ती आतां आजारी झाली आहे ! त्या वेळेस ती पी. ई.-मधें होती आणि पी. ई. ची परीक्षा त्या वेळीं युनिव्हर्सिटी घेत असे. तिचे संस्कृतचे प्रिलिमिनरीचे पेपर तपासतांना लोकांनीं आक्षेप घेऊं नये म्हणून मीं तिला वाजवीपेक्षां कमीच मार्क दिले आणि याबद्दल आमच्या कांहीं प्रोफेसर-मित्रांनीं मला दोषहि दिला. पण किती काटले तरी शेंकडा ६५ मार्क तिला द्यावे लागले आणि सबंध वर्गांत ती दुसरी आली. लोकांनीं अर्थात् म्हणण्यास आरंभ केला कीं, ' देवांना कुसुमं आवडतात त्याप्रमाणें प्राफेसरांनाहि आवडतात. त्याचं स्थान लोकांच्या डोक्यावरचं हें निसर्गसिद्धच आहे. कुसुमांना जात्याच सुवास असतो, सुवासाबद्दल मेहनत करावी लागत नाहीं ! ' वास्तविक मीं लोका-पवादाला भिऊन कमी मार्क दिलेले, पण फळ हें असं ! त्या वेळीं जास्त वाईट वाटण्याचं कारण असं कीं, प्रिलिमिनरीचा निकाल लागल्यावर कॉलेजमधील अध्यापकीय खोलीच्या बाहेर मी उभा होतों. तेव्हां कुसुम आपल्या एका मैत्रिणीबरोबर वर आली आणि म्हणाली, " सर , मला तुम्हीं वाजवीपेक्षां जास्त मार्क दिलेत अशी मुलं माझी चेष्टा करतात; तुम्ही असे जास्ती मार्क कां देतां ? " हीं वाक्यं ऐकल्यावर मला काय वाटलं असेल याची कल्पना करा. लोक चेष्टा करीत तें मी सोशीत असें व हसण्यावारी दवडीत असें. पण स्वत: कुसुमनं हा आरोप करावा ? मी ओशाळलों, घामाघूम झालों, कांहीं तरी समर्थन केलं, आणि तिला वाटेला लावलं. मी कांहीं ही गोष्ट कोणापाशीं बोललों

नाहीं, पण दुसऱ्या दिवशीं सर्व कॉलेजभर जिकडे तिकडे हीच गोष्ट बोलली व ऐकली जात होती आणि तींत दर खेपेस तिखट-मीठ आणि मसाला अधिक पडत होता. कॉलेजच्या प्रिन्सिपलसाहेबांच्या कानांवर ही गोष्ट गेल्यावर त्यांनीं मला बोलावून घेऊन सांगितलं कीं, "तुमची चूक असो वा नसो, लोकापवादाला भिऊन आम्हांला वागलंच पाहिजे. तुमच्याविरुद्ध इतकं काहूर उठलं आहे कीं, तुम्हांला काढून टाकावं असंच माझे सहकारी मित्र म्हणत आहेत. पण मीं रदबदली करून एवढ्यावरच भागवलं आहे कीं, तुम्ही दोन वर्षांची रजा घ्यावी आणि विलायतेस जाऊन एखादी उच्च पदवी घेऊन यावी. तुम्ही येईतोंपर्यंत हें प्रकरण लोक विसरतीलच. आणि आल्यावरहि तुमची नेमणूक कॉलेजांत न करतां आमच्या बाहेरगांवच्या एका शाळेवर करावयाची." मीं एकंदर परिस्थितीचा विचार करून त्यांचं म्हणणं मान्य केलं. न करून करतों काय ?

विलायतेहून आल्यावर संस्कृत विषयामध्यें हे अत्यंत पारंगत आहेत आणि अशा योग्यतेचा मनुष्य विलायतेस पाठवून बाहेरच्या शाळेचं महत्त्व वाढविण्याकरितां यांची बदली झाली आहे, असं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालं आणि अंदरकी बात न जाणणारे लोकहि तसंच मानूं लागले ! त्या शाळेबद्दल मला फार आपुलकी वाटते असं लोक म्हणत असतात व कोपऱ्यांत राहून स्वार्थत्यागपूर्वक काम केल्याबद्दल नवीन पिढीकडून माझी वाहवा होत असते ! जगाचा जमाना हा असा आहे. जगाच्या स्तुतींतहि अर्थ नसतो आणि निंदेंतहि अर्थ नसतो. सगळा मायेचा खेळ आहे ! "

"असेल, मायेचा खेळ असेल." विमल म्हणाली, "पण मायेनं स्तुतिसुंदरीचं सोंग घेतलं म्हणजे तिचा खेळ आवडतो, पण जर का तिनं निंदाकालिकेचं रूप धारण केलं, तर मग मात्र 'जग म्हणजे माया आहे' हा वेदान्त सुचतो, एरव्ही नाहीं ! "

• • •

४

त्यानें काळी मुलगी कां पसंत केली ?

" धोंडोपंत, विमलच्या वडील बंधूंना पुष्कळ मुली सांगून येत होत्या, पण त्यांनीं काळीच मुलगी पसंत केली हें कसं काय ? " मीं एकदां धोंडोपंतांना विचारलं.

" ती फारच मजेदार गोष्ट आहे. त्यावर एक लघुकथा देखील रचतां येईल. " धोंडोपंतांनीं उत्तर दिलं.

" लघुकथाच कां, तुमचीं विषयान्तरं यायला लागलीं कीं लघुकथेपेक्षां मोठी कादंबरीच ती होईल. "

" विषयान्तरं हीं यायचींच. पण काव्यगायनाला गेल्यावर चांगल्या कवींच्या कवितांबरोबर गचाळ कविताहि जशा ऐकाव्या लागतात, तशीं आमच्या मुख्य गोष्टीबरोबर विषयान्तरंहि ऐकलीं पाहिजेत. "

" बरं आहे. ऐकतों. "

" त्याचं असं झालं कीं विमलचं लग्न झालं त्या वेळेपासून विनूला (तुम्ही याला ' विनायकराव ' म्हणा, पण मी विनूच म्हणणार) मुली सांगून येत होत्या. तो त्या वेळेस कॉलेजांत होता, आणि लग्न करण्याची त्याची त्या वेळेस इच्छाच नव्हती, पण वडिलांच्या आग्रहावरून तो मुली पाहण्यास आमच्या-सारख्यांबरोबर आणि विमल वगैरे बहिणींबरोबर जात असे. त्याचे वडील जरी आमच्याबरोबर असले तरी ' पोक्त व बोलके प्रोफेसर ' म्हणून प्रश्न वगैरे विचारण्याचं आणि बोलण्याचालण्याचं काम आमच्याकडे यायचं. हें बोलणं करतांना आमचा ' पोक्तपणा ' आम्हांला हास्यास्पद, किंवा क्वचित् प्रसंगीं करुणास्पद स्थितींत आणून सोडावयाचा. उदाहरणार्थ, एकदां आम्ही ' चटक-चांदणी ' नांवाची मीं जी कादंबरी लिहिली आहे आणि जी 'सुप्रसिद्ध ' आहे असं मी मानतों, ती कोणीं लिहिली आहे आणि वाचली आहे का, असं विचारलं.

" ती कोणीं लिहिली आहे हें मला माहीत नाहीं आणि चटोर कादंबऱ्या

वाचण्याची बाबा आम्हांला परवानगी देत नाहींत"–असं तिनं उत्तर दिलं, तेव्हां तोंड कसं झालं असेल हें सांगायला नकोच. दुसऱ्या एका प्रसंगीं आम्हीं एका इंग्रजी पांचवींतल्या मुलीला हरिभाऊ आपटयांच्या कादंबऱ्यांबद्दल तुमचं काय मत आहे असा प्रश्न विचारला. तेव्हां तिच्या वडिलांनीं, "अहो प्रोफेसर-साहेब, तुमचं ज्ञान इथं दाखवूं नका" असं म्हणून आम्हांला गप्प बसविलं ! तिसऱ्या एका ठिकाणीं आम्ही गेलों. तिथें त्या मुलीला 'शिवण-टिपण कांहीं येतं का ?' म्हणून आम्हीं प्रश्न केला. तिनं 'हो' म्हणून उत्तर दिल्यावर आम्ही थापांना न फसणारे असे व्यवहारतज्ज्ञ आहोंत असं दाखविण्याकरितां आम्हीं म्हटलं, "कांहीं नमुना आहे का दाखविण्यासारखा ?"

"हो;" दारांत उभी असणारी तिची आई म्हणाली, "तिच्या अंगांतील पोलकं तिनें शिवलेलं आहे."

"दुसरा कांहीं नमुना नाहीं ना ?" आम्हीं म्हटलं, तेव्हां त्या आईला 'नाहीं' म्हणावं लागलं; पण खोटं बोलण्याचा आरोप आपल्यावर येईल म्हणून तिनं मुलीला एकदोन मिनिटांनीं घरांत बोलावलं आणि 'तिचं शिवणकाम आणून दाखवितें बरं का ?" असं म्हणून त्या दोघी घरांत गेल्या. शिवणांतलं एक अक्षर समजत नाहीं आम्हांला, आम्ही तिचं पोलकं पाहून काय करणार असा मनांत विचार आला आणि "पोलकं आणायला नको, मीं उगाच कांहीं तरी प्रश्न केला." असं मी म्हणूं लागलों आणि तसा घरांत निरोपहि पाठविला. पण तिच्या आईला वाटलं, चांगलं स्थळ आहे, शिवणटिपण येत नाहीं म्हणून हातचं जायचं आणि शिवाय खोटेपणा पदरीं यायचा ! तेव्हां तिनं दोनचार मिनिटांनीं मुलीच्या अंगांतलं पोलकं आमच्याकडे पाठविलं ! हा प्रकार पाहून मी इतका ओशाळलों कीं मला काय बोलायचं हें सुचेना. पण चहा लगेच आला, तेव्हां कांहीं तरी बोलायचं म्हणून 'मीं चहा अलीकडे सोडला आहे, असं खोटंच सांगून चहाच्या दुष्परिणामाबद्दल व्याख्यान झोडलं, आणि त्या प्रसंगांतून कसाबसा निभावलों ! अशाच एका प्रसंगीं एका मुलीला बिचारीला मीं रडवलं. विमलच्या वडिलांनीं मला वाटेंत पकडलं आणि मुलीच्या आईबापांची विशेष माहिती न सांगतांच मला त्या मुलीकडे घेऊन गेले. शिष्टपणा आणि पोक्तपणा दाखविण्याची आम्हांला संवय म्हणून मुलगी लाजत मुरडत बाहेर आल्यावर आम्हीं मोठेपणाचा आव आणून विचारलं, "मुली, तुझे वडील काय करतात ?"

हा प्रश्न विचारल्याबरोबर ती रडूं लागली आणि हुंदके देऊं लागली ! हा काय प्रकार आहे म्हणून मी अचंबा करूं लागलों, तेव्हां तिच्या भावानं सांगितलं कीं, "आमचे वडील चार महिन्यांपूर्वी वारले." आणि त्याच्या डोळ्यांतहि आंसवं दिसूं लागलीं. मुलीला पाहण्याचं पुढचं काम माझ्याबरोबर आलेल्या मंडळींनीं कसं तरी उरकलं, पण तेव्हांपासून कानाला खडा लावला कीं..."

"अहो धोंडोपंत, विनायकरावांनीं काळी मुलगी कां पसंत केली हा प्रश्न आहे, कानाला केव्हां खडा लावला हा नाहीं."

"कबूल आहे, पण मुलगी पाह्यला गेल्यावर दारांच्या आणि खिडक्यांच्या पाठीमागें अर्धवट लपलेल्या दुसऱ्या मुली आणि बायका जशा पाहाव्या लागतात, तसंच काळ्या मुलीच्या गोष्टीबरोबरच दुसऱ्या मुलींच्याहि गोष्टी ऐकल्या पाहिजेत, आणि आतां एका सुंदर मुलीची गोष्ट ऐकवतों. विनूच्या मनांत एम्. ए. झाल्याशिवाय लग्न करायचं नव्हतं, म्हणून तो केवळ वडिलांच्या आग्रहास्तव मुली पाहण्यास जात असे नि त्यांतल्या बहुतेक मुली त्याच्या आईला व विमलला पसंत न पडल्यामुळें त्याच्या नकाराचा प्रश्नच येत नसे. त्यांना एखादी पसंत पडली तर हाच 'नाहीं' म्हणत असे आणि लग्नाचा प्रश्न लांबणीवर टाकीत असे. पण एम्. ए. झाल्यावर आतां लग्न करावयाचं म्हणून त्यानं ठरविलं आणि माझ्याकडे येऊन "आतां यापुढें मुलगी पाहावयाला तुमच्या-बरोबर नुसता नांवाला मी येणार नाहीं, तर मुलीशीं दहा-पंधरा मिनिटं बोलून मगच पसंत नापसंत ठरविणार" असं त्यानं सांगितलं. हें समजल्या वर मुलगी पाहण्याचा प्रकार आम्हीं बदलला. मुलगी सांगून आली कीं तिच्या वडिलांना किंवा भावाला चहाला बोलावून तिलाहि बरोबर घेऊन येण्यास मी सांगत असें आणि त्या वेळीं विनूला व विमललाहि बोलावीत असें. वधू-वर पक्षांच्या गांठी पडल्यावर कांहीं तरी युक्ति करून वधू-वरांना गच्चीवर सोडून इतर सगळ्यांना मी बाहेर बोलावून घेत असें. एप्रिल-मेचे दिवस असल्यामुळें संध्याकाळीं गच्चीवर मोकळ्या हवेंत मुलगी पाहण्याचा समारंभ घडवून आणणं मला सोयीचं वाटे.

एक दिवस असा योगायोग आला कीं, दोन वधूंना तास-दीड तासाच्या अंतरानं पाहणं प्राप्त झालं. कारण त्या दोघींना दुसऱ्या दिवशींच बाहेरगांवीं वर-संशोधनाच्याच कार्याला जावयाचं होतं. संध्याकाळीं पांचच्या सुमारास

ग्रंथालय. ठाणे. स्थापना.

एक मुलगी विनूला दाखविली. ती देखणी होती, पण जरा धीट आणि 'पुरुषी' होती, म्हणून विमलला आणि विनूलाहि ती नापसंत होणार हें मीं ओळखलं. चहापाणी होऊन ती मंडळी निघून गेल्यावर मीं पसंतीचं ढोंग करून म्हटलं, "नवीन युगांत अशाच मुली पाहिजेत. विमलला तर ही पसंत पडलीच पाहिजे. काय विमल, आहे ना तुला पसंत ?"

स्त्रियांनीं लाजणं चांगलं नाहीं, पुरुषांप्रमाणें धिटाई दाखवावी, स्त्री-पुरुषांचे हक्क समान आहेत, असं नेहमीं म्हणणाऱ्या विमलला आपल्या भावाकरितां 'बायकी बायको' हवी होती; तेव्हां तिला काय उत्तर द्यावें हा पेंच पडला. आणि 'मी कोण ठरविणार ? विनूदादाला पसंत पडत असली तर आम्हांलाहि ती पसंतच आहे.' असं म्हणून उत्तराची ती टाळाटाळ करूं लागली, आणि पुरुषांचं मन कोणीं सांगावं ? त्यांना हंडाभर हुंडा पाहिजे, अप्सरेसारखं रूप पाहिजे वगैरे नेहमींचे आरोप पुरुषांवर ठेवून मुख्य मुद्दचाची टाळाटाळी करूं लागली. वादासध्यें ती समसमान हक्क प्रतिपादिते, पण भावाला बायको पाहतांना तिला अशा 'पुरुषी' मुली पसंत पडत नाहींत, ही विसंगति आग्रहपूर्वक तिच्या पदरांत मी घालणार होतों, इतक्यांत मीं बोलावलेली दुसऱ्या मुलीकडची मंडळी मुलीसह आलीच. ही मुलगी म्हणजे आमची नर्मदा. ती मॅट्रिक झालेली होती, सुशील आणि सुग्रण आहे अशी तिच्याबद्दल माझी खात्री होती; पण दिसण्यांत ती वाईट नव्हे, पण सामान्यांपैकींच होती. रंग काळासांवळा (किंवा काळाच म्हणा ना !) म्हणून ती बहुधा नापसंत ठरणार हें मला वाटतंच होतं. पण मित्राच्या आग्रहास्तव आणि नर्मदेचा हितचिंतक म्हणून हा योगायोग मीं जुळवून आणला होता. चहापाणी आणि थोड्याबहुत गप्पा झाल्यावर माझ्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें नियोजिलेल्या वधूवरांशिवाय इतर मंडळीला मीं कांहींतरी निमित्त करून खालीं बोलावून घेतलं. विमल खालीं आल्यावर मला म्हणाली, "ही मुलगी विनूदादाला कसली पसंत होते ? तुमचा चहा आणि आमचा वेळ फुकट जायचा होता तो गेला, इतकंच आज कार्य झालं."

"कां, विनूदादाला पसंत कां नाहीं व्हायची ? आणि त्याला नसली तरी तुला पसंत आहे ना ?"

काय उत्तर द्यावं हें विमलला सुचेना. कारण ती काळी आहे म्हणून नापसंत

हें खरं मत सांगावं, तर पुरुषांप्रमाणेंच बायकादेखील रूपाकडे पाहतात, असं मी म्हणेन ! थोड्या वेळापूर्वी पुरुषांविरुद्ध ती जें बोलली होती तें किती अन्यायाचं होतं हें तिला कबूल करायला लावीन ही तिला भीति वाटत होती ! बरं, मुलगी पसंत आहे असं वरवरचं बोलण्याचा अभिनय करण्याचं सामर्थ्यहि पहिल्या-प्रथम तिच्यामध्यें नव्हतं. पण क्षणार्धांत ती सावरली आणि " काळी असली म्हणून काय झालं, बेताची शिकलेली आहे, पसंत करायला कांहीं हरकत नाहीं" असं वरून बोलूं लागली. दहापंधरा मिनिटांनीं मी गच्चीवर गेलों आणि पाहतों तों नर्मदा आणि विनू जवळ जवळ उभीं राहून गच्चीवरून रस्त्याकडे पाहात जणूं कांहीं पुष्कळ दिवसांची ओळख आहे अशा स्नेहभावानं बोलत व हसत आहेत ! हा अकल्पित प्रकार काय आहे याची मला कल्पना होईना. कारण विमलप्रमाणेंच मलाहि वाटत होतं कीं नर्मदा नापास होणार ! गच्चीवर मी आल्याची चाहूल ऐकल्यावर विनूनं माझ्याकडे अर्थपूर्ण स्मित करून पाहिलं, तेव्हां तर मी स्तंभितच होऊन गेलों. मिनिट-अर्धा मिनिट वरवरचं कांहीं तरी बोलून नर्मदेला " विमल खालीं बोलावीत आहे " असं म्हणून खालीं लावून दिलं आणि हातांच्या व डोळ्यांच्या द्वारें, ' हें काय प्रकरण ?' म्हणून विनूला हसत हसत विचारलं. " जिंकलों गेलों बुवा मी ! " तो म्हणाला. "अरे, पण कसा ? " मीं विचारलं. तो म्हणाला, " तुम्ही सगळीजण निघून गेल्यावर त्या मला विनयानंच पण निश्चयपूर्वक म्हणाल्या कीं, आपलं लग्न जुळणं शक्य नाहीं,तर आपण टिळक-गांधी यांच्या राजकारणाबद्दल किंवा हवा-पाण्याबद्दल पांच-दहा मिनिटं बोलूं या,आणि नाटकाचा हा प्रवेश संपवूं या ! "

" लग्न जुळणं शक्य नाहीं म्हणजे कोणत्या अर्थानं ? मी आपणाला पसंत नाहीं असं का आपणाला म्हणावयाचं आहे ? " मीं विचारलं, तेव्हां त्या म्हणाल्या ' तसं कसं मी म्हणेन ? पण मी काळी आहें आणि मला इतक्या लोकांनीं नापसंत केली आहे कीं आपण मला नापसंत कराल याबद्दल शंकाच वाटत नाहीं; आणि खरं सांगूं का ?....आपल्या रूपाला आणि रुबाबाला मी शोभायची नाहीं असं खरंच मला वाटतं. मी खरंच आपणाला शोभायची नाहीं.' त्या अशा तऱ्हेनं हें सगळं बोलत होत्या कीं, त्यांतलं अर्ध-समाधानी औदासीन्य, त्यांतला विनय, कटु सत्याचं औषध गिळून गोड तोंडानं त्यांच्याविषयीं बोलण्याची खरी विनोदबुद्धि इत्यादि गोष्टी पाहून

म्हणा, किंवा तुमच्या तोंडून त्यांच्या सद्‌गुणांची स्तुति पुष्कळ ऐकली होती म्हणून म्हणा, किंवा अनेक लोकांनीं नाकारल्यामुळें त्यांचे सद्‌गुण मातीमोल होणार असं वाटून म्हणा, किंवा त्यांनीं माझी स्तुति केली तिला भुलून म्हणून म्हणा, किंवा त्यांच्या अवयवांच्या नीटसपणामध्यें आणि डोळ्यांमध्यें विलक्षण आकर्षकपणा आहे म्हणून म्हणा, किंवा अज्ञात कारणामुळें उल्लू होऊन म्हणा, कांहीं तरी होऊन 'मीं लग्न केलं तर तुमच्याशींच करणार, तुम्ही मला नाहीं म्हणूं नका" अशी त्यांची मी मनधरणी करूं लागलों! 'नाहीं, नाहीं' म्हणतां म्हणतां थोड्या वेळानं त्या कबूल झाल्या आणि पांचदहा मिनिटांच्या आंत आमचीं मनं एकजीव झालीं!—असा हा प्रकार आहे. आतां काय चेष्टा कराल तेवढी थोडीच आहे!"

मीं विनूच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली आणि "नर्मदा मला ठाऊक आहे, तुझ्या संसारांत कांहीं एक उणेपणा ती राहूं द्यायची नाहीं" इत्यादि प्रकारें बोलून त्याच्याबरोबर खालच्या मंडळीकडे गेलों आणि गोड बातमीचा सुगंध जिकडे तिकडे पसरविला. विमलला हें काय झालं हें समजेना! पण मला जी हकीकत समजली ती तिला एकीकडे नेऊन सांगितल्यावर तिला सगळा उलगडा झाला आणि आपला भाऊ गुणांची पारख करणारा आहे, केवळ रूपाकडे पाहणारा नाहीं, याचा तिला अभिमान आणि आनंद वाटला. नर्मदेकडे पाहून मीं म्हटलं, "विमल, तुमच्या या भावी वहिनी सुप्रसिद्ध सीझरसारख्याच पराक्रमी आहेत." "त्या कशा?" विमलनं विचारलं तेव्हां मीं म्हटलं, "सीझरविषयीं He came, he saw, he conquered—आला, पाहिलं, जिंकलं' असं म्हटलं आहे, आणि तुमच्या या भावी वहिनींबद्दलहि 'या आल्या,यांना पाहिलं आणि यांनीं जिंकलं' असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं!"

"पण मीं जिंकलं नाहीं, जिंकली गेल्यें." आतां जणूं काय सगळं ठरलं आहे अशा स्वरानं नर्मदा म्हणाली.

"वादांत तरी आतां मला जिंकलंस ना?" असं मीं म्हटलं आणि पुढें हा वाद असाच चालणार इतक्यांत तिच्या वडिलांनीं खालून पेढे आणले होते ते वांटण्यास आरंभ केला. नर्मदेनं गच्चीवर आपला काळेपणा कबूल करून आणि त्याचाच फायदा घेऊन जें 'कृष्ण' कारस्थान केलं होतं त्याबद्दल मला त्या वेळेस कोटि सुचली होती, पण संधि न सांपडल्यामुळें पेढ्याबरोबरच ती गिळावी लागली!

• • •

५

घातवार ?

"आपण कांहीं शिवाजी किंवा नेपोलिअन आहों तर आपल्या आठवणी मोठ्या मोठ्या प्रसंगांच्या असतील? आमच्यासारख्यांच्या आठवणी क्षुल्लक गोष्टींच्याच असावयाच्या. आमच्यावर बिकट 'प्रसंग' यायचे ह्णजे बेचव चहा पिण्याचे किंवा अशाचसारखे किरकोळ; आमच्या लढाया रुसव्या बायकोशीं किंवा हट्टी पोरांशीं; आमच्या मोहिमांना माजघरांत आरंभ होऊन सैंपाकघरांतल्या रणक्षेत्रावर त्यांची अखेर व्हावयाची; सकाळीं महायुद्ध होऊन दुपारीं १० वाजतां जेवणाच्या वेळेस आमचा तह झाला, तरी उभय पक्ष संध्याकाळीं चहाच्या वेळेस शस्त्रास्त्रं काढण्यास कचरावयाचीं नाहींत. त्यांतून आमच्यासारख्या प्रोफेसरांच्या आयुष्यांत तर सारेच 'प्रसंग' मिळमिळीत आणि पचपचीत. त्यांत अंगावर कांटे उभे राहतील किंवा हुंदके द्यावयाला लावतील किंवा पोट धरधरून हसायला लावतील असे प्रसंग कोठून येणार? पण एक दिवस किरकोळच पण लागोपाठ असे प्रसंग माझ्यावर आले कीं शुभाशुभ, ग्रहयोग, घातवार, वगैरे न मानणारा मी, घटकाभर त्यांवर विश्वास ठेवूं लागलों!

असं झालं कीं, एक दिवस मी वर्गांत शिकवावयाचं पुस्तक (ह्णजे संस्कृत 'काव्यप्रकाश' त्या दिवशीं मला शिकवावयाचा होता) घरीं वाचल्याशिवाय वर्गावर गेलों. दोनतीनदां तें पुस्तक शिकवलं असल्यामुळें अडचण पडणार नाहीं असं मला वाटलं. पण त्या दिवशीं एका ठिकाणीं अडलों आणि भलताच अर्थ सांगितला. एका मुलानं नम्रपणें माझी चूक नजरेला आणून दिल्यावर आढेवेढे घेऊन अखेर प्रांजलपणाचा आविर्भाव करून चूक कबूल केली. पण मनांत ओशाळलों, आणि पुढें कचरत कचरत शिकवूं लागलों. मुलं पायह्णपट (Stamping) करतात कीं काय अशी क्षणोक्षणीं भीति

वाटूं लागली, आणि स्वतःशींच मनांत रागावलों! कांहीं वेळानं एका मुलानं कांहीं प्रश्न विचारला व मला 'अमुक अमुक अर्थ असावा' असं इंग्रजींत म्हटलं. तेव्हां स्वतःला विचार करण्यास वेळ मिळावा म्हणून सहज एका विद्यार्थिनीला मीं इंग्रजींत विचारलं, 'तुम्हांला काय वाटतं? या मुलाचं म्हणणं तुम्हांला पटतं?' त्या मुलीला असा प्रश्न विचारल्याबरोबर पावसाळ्यांत अचानक गडगडाट व्हावा तसा त्या वेळीं वर्गांत पायहापटीचा व हातआपटीचा गडगडाट झाला! आधींच मनांत मी ओशाळलेला आणि स्वतःवरच रागावलेला, तेव्हां मला वाटलं कीं, मुलांनीं माझी युक्ति ओळखली आणि म्हणून हा प्रसाद आम्हांला मिळाला. पुनः वाटलं कीं, मुलीला प्रश्न विचारल्याच्या आनंदादाखल ही सलामी असेल. आणखी असेच विचार येऊं लागले आणि एक मिनिटभर मी कांहींच बोललों नाहीं. माझ्या संवयीप्रमाणें माझे ओठ मात्र मी कांहींतरी पुटपुटत आहें असं दर्शवीत होते. हें पाहून मुलांनीं पुनः एकदां सरबत्तीची सलामी दिली. त्यांत आमचा माधव आपटे पायहापटी करण्यांत दिसला; तेव्हां स्वतःवरच्या रागाचा आणि ओशाळेपणाचा पारा चढला आणि 'तूं देखील ब्रूटस्! तूं असं करशील असं मात्र वाटलं नव्हतं!' असं त्याला इंग्रजींत रागारागानं म्हणून व वर्गाला उद्देशून 'तरुण मुलांत शिस्त राहिली नाहीं' असा शेरा मारून बूट आपटीत बाहेर पडलों. बाहेर पडल्यावर माधव माझ्याकडे आला व 'मी क्षमा मागतों, पण काय प्रकार झाला याचा खुलासा करण्याची माझी इच्छा आहे;' असं म्हणाला. त्याला माझ्या प्राध्यापकीय खोलींत घेऊन गेल्यावर तो म्हणाला, 'मोटारींतून माझ्या घरींच चहाला चला, वाटेंत सगळं सांगतों.' पण 'आधीं खुलासा मग चहा' म्हटल्यावर त्यानं लगेच खुलासा केला. खरी गोष्ट अशी झाली होती कीं, पायहापट मला उद्देशून नव्हती, तर मला प्रश्न विचारलेल्या मुलाची त्या मुलीशीं लग्न करण्याची इच्छा होती व ती त्यानं तिला व्यक्तहि केली होती आणि ही सर्व गोष्ट आम्हां प्राध्यापकांना जरी ठाऊक नव्हती तरी विद्यार्थ्यांच्या विश्वांत ती सुप्रसिद्ध गुपिताप्रमाणें होती; अर्थात् 'तुम्हांला याचं म्हणणं पटतं का?' या माझ्या साध्या प्रश्नाचा विद्यार्थ्यांनीं पूर्वेतिहासाच्या संदर्भाला अनुसरून प्रेमविषयक अर्थ केला आणि म्हणून त्यांनीं विनोदबुद्धीनं व सहजस्फूर्तीनं त्या स्थलाला व प्रसंगाला अनुसरून योग्य ती सलामी दिली!

नेहमीं घरीं वाचून जाणारा मी आजच वाचल्याशिवाय वर्गावर गेलों, सहसा न अडणारा आजच अडलों आणि सहसा भलता प्रसंग न ओढवून घेणारा मी आजच तसला प्रसंग ओढवून घेतला, तेव्हां आजचा प्रसंगच वाईट, अशी मनांत कल्पना आली आणि असंच कांहींतरी माधवला म्हणून आणि झालं तें सगळं हसण्यावारी नेऊन (किंवा खरं बोलायचं म्हणजे नेल्यासारखं दाखवून) माधवकडे मी चहा पिण्यास गेलों. तिथें गेल्यावर विमलशीं कांहीं थट्टा-मस्करी करण्याचा प्रयत्न केला, पण जमला नाहीं. मनांत म्हटलं कीं हा कृत्रिम आविर्भाव करण्यांत फायदा काय ? स्वतःवरच रुसलेल्या मनुष्याला विनोद साधणार कसा ?

थोड्याच वेळांत दिसून आलं कीं, माधव आणि विमल यांच्यामध्यें कांहीं-तरी अढी उत्पन्न झाली आहे आणि म्हणून थट्टामस्करीला रंग येत नाहीं. त्यांना मोकळेपणानं बोलण्यास लावण्याकरितां "चहा बरा झाला आहे, नाहीं ?" असं म्हटलं, तेव्हां माधव थोडासा उसासा टाकून म्हणाला, "मीं या बाबतींत कांहीं बोलायचं नाहीं असं ठरवलं आहे." चहा चांगलासा झाला नव्हता, तेव्हां विमलला हें बोलणं लागलं आणि ती घरांत निघून गेली. तिला परत आणण्याकरितां मनांत युक्ति योजून मीं म्हटलं, "कांहीं चिवडा, बिस्किट, वडी, नाहींतर दुसरं कांहीं तरी आण ना विमल ?" कर्मधर्मसंयो-गानं घरांत कांहींच नव्हतं. हें कळल्यावर माधवनं पुनः श्वास आंत घेऊन उच्छ्वास सोडला, आणि "बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं" असं कांहींतरी तो पुटपुटला. त्याबरोबर विमल रडूंच लागली, आणि हें पाहून मी ओशाळलों ! आज घातवारच असला पाहिजे आणि कांहीं बोललों तरी वाईटच परिणाम व्हावयाचा, अशी खूणगांठ बांधून बाहेर जाण्याची तयारी केली. बाहेर पडत असतां माधवला 'आज तुमचं काय बिनसलं आहे ?' असं मीं कानांत विचारलं. त्याचाहि परिणाम विपरीतच झाला. कारण त्याला पांच-पेंचच राहिला नाहीं व तो मोठ्यानंच म्हणाला, "सकाळीं भाजी वाईट झाली आहे म्हटलं तेव्हां तिला राग आला, म्हणून स्वयंपाकाबद्दल कांहीं बोलायचं नाहीं असं मीं ठरवलं आहे. वाईटाला वाईट म्हटलं तर रागावते, कांहींच बोललं नाहीं तर आतांसारखी रडते, तेव्हां आतां मी काय करणार ? नशीब आपलं, दुसरं काय ?" विमलनं हें ऐकलं आणि घरांतून वाघिणीसारखी

बाहेर पडून माधवची चांगलीच हजेरी घेतली आणि हें सगळं पाहण्याचं माझ्या नशिबीं आलं ! 'घातवार, घातवार ! ' मीं मनांत म्हटलं आणि घरांत गेल्यावर बायकोशीं एक शब्द बोलूं नये, खुणेनं होय-नाहीं म्हणावं असं मनांत येऊं लागलं. घरीं गेल्यावर बायको बोलायला आली तेव्हां अर्धवट या निश्चयाला अनुसरून आणि आणि अर्धवट विनोदबुद्धीनं खुणांनीं मी होय-नाहीं सांगूं लागलों आणि जिभेवर उजव्या हाताचं बोट ठेवून आणि दुसरा दांत व मान नकारर्थी हलवून 'आज बोलायचं नाहीं असं ठरविलं आहे.' असं सुचविण्याचा प्रयत्न केला ! चार-पांच मिनिटं मला बोलायला लावण्याचा प्रयत्न करूनहि मी बोलत नाहीं, नुसत्या जिभेवर हात ठेवून खुणाच करतों आहें असं पाहून तिला काय वाटलं कोणास ठाऊक ! आणि तिनं गळाच काढला ! मनांत मीं म्हटलं "घातवार, घातवार ! आज कांहीं केलं तरी भलताच परिणाम व्हायचा ! "

.....पुढें सगळ्या गोष्टी ठीक झाल्या. विमल आणि माधव यांच्यांतली अढी गेली. माझ्यासमोर त्यांनीं जो प्रकार केला त्याबद्दल त्यांनीं दिलगिरी दर्शविली; माझ्या पत्नीचं दुःख क्षणिकच होतं. त्या दिवसाच्या सर्व प्रकारांची आठवण झाली म्हणजे आम्ही सगळींजणं आतां हसतों आणि एकमेकांना थट्टेनं चिडवतों. पण त्या दिवसाची आठवण झाली म्हणजे 'घातवार' म्हणून कांहीं आहे असं वाटल्याशिवाय राहात नाहीं ! एरवी त्या प्रकाराची संगति लावायची कशी ? कादंबरी आणि लघुकथांत असले योगायोग चालत नाहींत हें टीकाशास्त्राच्या दृष्टीनं बरोबर आहे, पण जगांत असे अनुभव येतात हें मात्र खरं आहे."

• • •

६

मनुष्य इन्द्रियपूजक का ध्येयपूजक ?

"नुकताच एक विश्वकुटुंबवादी (कम्युनिस्ट) माझ्याकडे आला होता. त्याचा ध्येयवाद व विशेषेंकरून त्याची ध्येयनिष्ठा पाहून त्याच्याविषयीं माझ्या मनांत फार आदर उत्पन्न झाला. सर्व जग हें मोठ्या सच्छिल कुटुंबाप्रमाणें मानावयाचं, ज्यानं त्यानं आपल्या शक्तीप्रमाणें काम करावयाचं; उच्चनीचभाव कांहीं नाहीं, प्रत्येक व्यक्तीचे सारखे हक्क; त्यांतल्या त्यांत अधिक शहाणे किंवा सामर्थ्यवान् असतील त्यांनीं आपल्या शहाणपणाच्या किंवा सामर्थ्याच्या जोरावर आपले बडेजाव वाढवून घ्यावयाचे नाहींत किंवा खाजगी कुणगे करून ठेवावयाचे नाहींत; आजारी असतील त्यांना किंवा लहान असतील त्यांच्या गरजांप्रमाणें सुखसोयी पुरवावयाच्या, द्रव्योत्पादनसामर्थ्य न पाहतां त्यांच्या गरजांकडेच लक्ष द्यावयाचं, सामर्थ्य अल्प असलं म्हणून अधिक सामर्थ्य असलेल्यांनीं त्यांच्यावर अंमल चालवावयाचा नाहीं इत्यादि इत्यादि कल्पना मला पुस्तकांच्या द्वारें परिचित होत्या. परंतु माझ्या त्या मित्राच्या तोंडून त्या ऐकल्या तेव्हां त्या अतिशय रम्य व जिवंत वाटूं लागल्या. तथापि माझ्या स्वभावाप्रमाणें मीं त्याला प्रथम थट्टेनंच म्हटलं कीं, "तुम्ही लोक 'कुटुंब' मानीत नाहीं, मग 'विश्व-कुटुंब' हा शब्द कां वापरतां ?" या शाब्दिक आक्षेपाचं निरसन त्यानं गोड हास्यानं केल्यावर मीं म्हटलं कीं "ध्येय म्हणून तुमची कल्पना चांगली आहे, पण स्वतःची पत्नी, स्वतःचीं मुलं, स्वतःची खाजगी मालमत्ता, आपल्या मनाप्रमाणें वागण्याची मुखत्यारी, आपल्या बुद्धीच्या नि सद्गुणांच्या जोरावर मिळविलेला अधिकार चालविण्याची मुभा, इत्यादि गोष्टी असल्याशिवाय मनुष्य मनापासून आणि उत्साहानं काम करील असं तुम्हांला वाटतं का ? बायको आणि मुलं यांचं लहानसं 'कुटुंब'च नसलं तर 'विश्व-कुटुंबा'ची कल्पना सत्यसृष्टींत कितपत खरी ठरेल ?"

यावर तो तरुण म्हणाला कीं, "तुम्ही वयस्क लोक मनुष्यस्वभाव हा स्वार्थी आहे असं मानतां, पण तो तसा नाहीं. आतांपर्यंतचा इतिहास तसा आहे खरा, पण तुमच्या समाजव्यवस्थेमुळें (अथवा 'अव्यवस्थे'मुळें म्हणा) मनुष्याला स्वार्थी बनावं लागलं. खरोखर पाहिलं असतां मनुष्य वाटतो तेवढा स्वार्थी नाहीं. खाजगी मालमत्ताच नाहींशी केली म्हणजे द्रव्याविषयींचा स्वार्थ राहतो आहे कशाला ? आणि पत्नी ही खाजगी मालमत्ता ही कल्पना सोडली, आणि स्त्रीपुरुषांना पूर्ण स्वातंत्र्य दिलं म्हणजे मनोविकारांचा कोंडमारा होणार नाहीं आणि स्त्रियांच्या मोहानं होणारे गुन्हे, मारामाऱ्या वगैरेहि बंद होतील ! '

त्याचं हें बोलणं ऐकून मीं केवळ अश्रद्धासूचक हास्य केलं आणि " गोड आशेच्या दृष्टीनं या कल्पना रम्य वाटतात, पण कटु सत्याच्या दृष्टीनं या भ्रामक वलगना दिसतात " असं म्हटलं. त्यानं मग देशाकरितां वगैरे स्वार्थत्याग केलेल्या अनेक लोकांचीं उदाहरणं दिलीं आणि शेवटीं घरगुती उदाहरण म्हणून मातेचा दाखला देऊन त्यानं मला विचारलं, " मातेचं प्रेम देखील स्वार्थी असतं असं तुम्ही म्हणतां का ? "

मी या प्रश्नाचं उत्तर देणार इतक्यांत त्याला आपल्या आईची तसबीर एका जवळच्या चित्रकाराकडे तयार करण्यास दिली होती ती आणण्याची आठवण झाली आणि तो ' आतां येतोंच आईची तसबीर घेऊन ' असं सांगून व ' वन्दे मातरम् ' करून निघून गेल्यावर पांच मिनिटं झालीं असतील नसतील तोंच त्याचा एक कम्युनिस्ट मित्र त्याच्या शोधार्थ माझ्याकडे आला. अर्थात् मी त्या वेळीं माझ्या मनांत प्रबळ झालेले मातृप्रेमाविषयींचे विचार त्याच्यापुढें मांडूं लागलों, तेव्हां ही स्वारी माझ्या भोळेपणाची जणूं कांहीं कींव करून म्हणाली कीं, " ध्रोंडोपंत, मातेचीं स्तोत्रं काव्यांत फार चांगलीं. यशवंत कवींचं 'आई' हें काव्य काव्यदृष्टचा फार चांगलं आहे–म्हणजे तुमच्या या व्यापारी वर्गप्रधान जगांत फार चांगलं आहे; पण आम्ही नवीन करूं पाहत आहोंत त्या जगांत आम्ही मातेच्या प्रेमाचं स्तोम माजवीत नाहीं. अहो, आई आई म्हणून तुम्ही म्हणतां, पण आईच्या जिवावर बेतली तर आई प्रत्यक्ष आपल्या मुलाचं मांस खाऊन स्वतःचा जीव वांचवील ही खरी वस्तुस्थिति आहे ! हें सत्य तुम्हांला रुचायचं नाहीं, पण हें असं आहे खरं. "

आधीं आलेल्या कम्युनिस्टाचं मत आणि याचं मत, यांतील तफावत पाहून मला जरा मौज वाटली आणि या दोघांचा परस्परांत वाद झाला तर फार मौज होईल अशी कल्पना मनांत येऊन मीं त्या वेळीं या प्रश्नाला बगल देऊन "भांडवलवाल्यांचीं मनं वळवून समाजाची हळूहळू सुधारणा तुम्ही कां घडवून आणीत नाहीं? बंडखोरीची भाषा तुम्ही कां वापरतां?" इत्यादि मुद्द्यांसंबंधीं आम्ही वाद करूं लागलों. त्याचं असं म्हणणं पडलं कीं, "क्रान्तीशिवाय गत्यंतर नाहीं आणि ही सुखासुखी व्हावयाची नाहीं. भांडवलवाले––मग ते लहान असोत किंवा मोठे असोत, अशिक्षित असोत किंवा सुशिक्षित असोत, चांगले असोत किंवा वाईट असोत––शेवटीं ते आपल्या जातीवर जावयाचेच. त्यांच्यावर बळजोरी केल्याशिवाय ते वळावयाचे नाहींत." मीं आपल्याकडून त्याला पुष्कळ सांगितलं कीं, शिक्षणाचा प्रसार झाला आणि मजूर सुसंघटित झाले म्हणजे चढाओढीच्या तत्त्वापेक्षां सहकारितेचं तत्त्व अधिकाधिक पटूं लागेल आणि क्रमाक्रमानं विचारांत आणि आचारांत इष्ट तो फरक होईल. त्याला हें गुळमुळीत तत्त्वज्ञान कोठून पसंत पडणार? तो उसळला आणि म्हणाला,

"या भांडवलवाल्यांना शिक्षणाचा आणि शब्दांचा मार पुरेसा नाहीं; त्यांना जोडेच पाहिजेत, सगळे लेकाचे स्वार्थी आणि भ्याड."

"असं कां म्हणतां? हेच भांडवलवाले आपल्या आईकरितां आणि बायकामुलांकरितां कितीतरी स्वार्थत्याग करीत आहेत! त्या स्वार्थत्यागाला व्यापक आणि उच्च स्वरूप नाहीं का देतां येणार?"

"तुम्हांला म्हणूं नये असं, पण तुम्ही दुधखुळे आहांत. मघाशीं सांगितलं ना कीं भांडवलशाहींत येथून तेथून सगळे स्वार्थी! बायकोचं प्रेम, मातेचं प्रेम वगैरे जें तुम्ही म्हणतां तें सगळं स्वार्थाचं रूपान्तर आहे, दुसरं कांहीं नाहीं."

त्याला मी उत्तर देणार इतक्यांत पहिला कम्युनिस्ट मित्र आईची तसबीर घेऊन परत आला आणि आपल्या आईच्या प्रेमाबद्दलच्या गोष्टी सांगूं लागला. आपली आई स्वतः दारिद्र्यांत राहून, दागिने मोडून कॉलेजांतला आपला खर्च कसा चालविते याबद्दलच्या गोष्टी सांगतांना त्याचा कंठ गहिंवरून आला व डोळ्यांत आंसवें आलीं. तो प्रकार पाहून या कम्युनिस्टांत वादावादी लावून

देऊन आपण गंमत पाहावी, हा दुष्ट विचार मीं सोडून दिला आणि त्या वेळेस दुसराच विषय काढून गोड संभाषणांत काळ घालविला.

कालान्तरानं मात्र मीं ते दोघे एकत्र आले असतां "मातेसुद्धां सर्व मनुष्यजात स्वार्थी आहे, का उच्चतम स्वार्थत्याग मनुष्याला शक्य आहे ?' यावर दोघांची वादावादी घडवून आणली आणि 'त्वयार्धं मयार्धम्' अशा धर्तीवर त्यांचा समेट घडवून आणला. मनुष्य हा असा असल्यामुळें स्वार्थी वृत्तीला कांहीं बंधनं पाहिजेत आणि परोपकारवृत्तीला उत्तेजन पाहिजे, म्हणजे आजकालचीं बंधनं आणि आजकालची कुटुंबव्यवस्था सध्यां तरी अगदीं त्याज्य नाहीं, अशा प्रकारचे सिद्धान्त त्या अनुकूल परिस्थितींत त्यांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला; पण ते कसले दाद देतात ? त्यांनीं त्यांतूनहि पळवाट काढली आणि 'पुढें याबद्दल वाद करूं' असं म्हणून ते निघून गेले. मनुष्याला स्वार्थी मानावयाचं,का निःस्वार्थी, का अर्धवट स्वार्थी आणि अर्धवट निःस्वार्थी यांबद्दल कम्युनिस्टांमध्यें एकवाक्यता नसते हा क्वचित्प्रसंगीं दिसून येणारा दोष मीं घडवून आणलेल्या वादावादीमुळें त्यांच्या नजरेस आला म्हणून मला आनंद झाला आणि अधिक आनंद झाला याचं कारण असं कीं, परस्परांत वादावादीची यादवी लावून देण्याची माझी युक्ति त्यांच्या ध्यानांत आली तरी ते रागावले नाहींत !

• • •

७

आनंद मानावयाचा का दुःख मानावयाचं ?

" कॉलेजामध्यें अलीकडचे मुलगे आणि अलीकडच्या मुली ध्येयशून्य झालीं आहेत असं म्हणतात, त्याप्रमाणें कदाचित् असेलहि. मला मात्र तसं वाटत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीची एक गोष्ट सांगतों ती ऐका आणि आपलं मत बनवा. माझ्यावर सगळ्या मुलांची भक्ति; कोणत्याहि वेळेला कोणींहि माझ्याकडे यावं आणि सल्लामसलत विचारावी. मीहि माझ्या बुद्धीप्रमाणें योग्य वाटेल तें सांगत असें आणि शक्य ती मदत करीत असें. त्यांतल्या त्यांत नारायण आपटे नांवाचा संस्कृत ऐच्छिक वर्गांतला माझा विद्यार्थी तर माझ्याकडे नेहमीं यावयाचा आणि हरतऱ्हेच्या खाजगी आणि सार्वजनिक गोष्टींचीहि चर्चा करावयाचा. कम्युनिझम्कडे त्याची बरीच प्रवृत्ति होती."

" मागें एकदां दोन कम्युनिस्टांची गोष्ट सांगितली तोच का हा ?" आमच्या वामनराव जोश्यांनीं विचारलं.

" हो, तोच हा. त्याच्यावर माझी फार मर्जी. कारण तो फार हुशार होता, खेळण्यांतहि पटाईत होता आणि सुशील तर कमालीचाच. त्याला उत्तेजन देऊन संस्कृत कविता, मराठी लघुकथा वगैरे लिहिण्यास मी सांगत असें आणि तो उत्तम लिहीतहि असे. बी. ए. च्या परीक्षेला दहा-पंधरा दिवस देखील राहिले असतील नसतील; एक दिवस त्याची मला चिठ्ठी आली कीं ताबडतोब मला भेटावयाला यावं; मी आजारी आहें, पण एक लघुकथा लिहिली आहे ती आपण अवश्य वाचावी,—विलंब न लावतां वाचावी अशी इच्छा आहे; इत्यादि, इत्यादि. माझ्या स्वभावाला अनुसरून इतर कामं बाजूला सारून मी त्याच्याकडे गेलों आणि पाहिलं तों तो विषमज्वरानं आजारी ! सात-आठ दिवसच झाले होते, पण तो अत्यंत कृश, निस्तेज आणि खरं बोलायचं म्हणजे अर्धवट प्रेतकळा आलेलाच दिसला. मी गेल्यावर त्याच्या डोळ्यांत अश्रु आले, पण

विशेष न बोलतां 'मीं एक लघुकथा लिहिली आहे. अगदीं लहान आहे, ती इथेंच वाचा' असं, कष्टपूर्वकच कसेबसे तोंडांतून शब्द काढून तो म्हणाला आणि मग उशाखालचा एक कागद कसाबसा काढून त्यानं माझ्या हातांत दिला. त्यांत मीं वाचलं:–

शेवटची विनंती

"एक कॉलेजिअन विद्यार्थी; एक त्याच्याच वर्गांतली विद्यार्थिनी; एकत्र येणें-जाणें, बसणें-उठणें; अभ्यास करणें - न करणें; रुसणें-रागावणें, वगैरे वगैरे. सात्त्विक प्रेम; एकनिष्ठ राहण्याच्या आणाभाका. विद्यार्थी आजारी पडला. मरणार असं वाटलं, प्रियतमेचें काय होणार ही काळजी; अत्यंत प्रिय व पूज्य अशा गुरूंना बोलावून आणून आपली कहाणी त्यानें लेखाच्या द्वारें सांगितली आणि अखेरची विनंती केली कीं, गुरुजींनीं त्या प्रियतमेला उपदेशाच्या चार गोष्टी सांगून दुसऱ्या कोणाशीं तिचें लग्न जुळवून द्यावें, नाहीं तर बिचारी.....

हा विद्यार्थी म्हणजे आपला नारायण आपटे आणि ही विद्यार्थिनी म्हणजे तारा हर्षे.

शेवटची इच्छा एवढीच आहे.

आणखी एक इच्छा एवढीच आहे कीं, आईला तार करावी व आणवावी. तारा हर्षेला भेटण्याची इच्छा नाहीं. भेटल्यास गहिंवर येऊन वायु होईल."

नारायण

ही चमत्कारिक 'लघुकथा' वाचून मी स्तंभित झालों, पण दुसरं कांहीं बोलणं न सुचल्यामुळें त्याच्या आईला कुठें तार करावयाची वगैरे गोष्टी बोलूं लागलों. अधिक जिव्हाळ्याच्या गोष्टी बोलणार इतक्यांत तारा हर्षे आणि नारायणाची आई या खोलींत! "आं, तुम्ही कशा?" त्याच्या आईला मीं विचारलं.

"या मुलीनं मला तार केली होती. ती त्याची मैत्रिण दिसते. ती कॉलेजच्या गेटाजवळ माझीच वाट पाहत होती." त्याच्या आईनं म्हटलं.

"आई, तुझ्याशीं मला बोलायचं आहे, पण काय बोलूं? तारा, कशाला आलीस तूं मला..."

पुढें त्याच्यानं बोलवेना. डोळचांवर त्यानं हात ठेवले आणि दुसऱ्या बाजूला तोंड केलं. त्याची आई त्याच्याजवळ गेली आणि अंगावरून हात फिरवूं लागली; पण हुंदक्यांशिवाय कांहीं उत्तर मिळेना. थोडक्याच वेळांत वायु झाला आणि...लवकरच प्राणवायु गेला !

तारा हर्षेवर त्याचें प्रेम असेल आणि तें इतकें असेल, अशी मला कल्पना नव्हती. त्याच्या मृत्यूनंतर तारा हर्षे बी. ए. च्या परीक्षेस बसणार नव्हती, पण मीं आग्रह करून बसविलीच. आणि ती सेकंड क्लासांत पास झाली. पास झाल्यावर उत्तर हिंदुस्थानांतील एका लहानशा हायस्कुलांत तिनें नोकरी धरली. ती कुंकूं लावीत नव्हती आणि तिकडचे लोक तिला विधवा समजत होते. वरील हकीकतीनंतर दोनतीन वर्षांनीं मीं नारायण आपटचाच्या इच्छेला अनुसरून पत्रद्वारें उपदेशाच्या कांहीं गोष्टी तिला सांगितल्या आणि विवाहाचा प्रश्न सुचविला. तिच्या ओळखीचाच एक मुलगा वर म्हणून दुरून दुरून सुचविला. तिचं उत्तर आलं कीं, "आपल्याविषयीं पूर्वी पूज्यभाव होता, आतांहि आहे; आपण असल्या गोष्टी लिहितां तें सद्भावानें लिहितां हें मी जाणून आहें. पण कृपा करून लिहूं नयेत. संस्कृतांतील शाकुन्तल, सावित्रीआख्यान, रामायण, वगैरे शिकवितांना एकनिष्ठ पति-पत्निप्रेमाची मनावर ठसेल अशा तऱ्हेनें वाखाणणी करणारे आणि आमच्यापुढें उच्चतम आदर्श ठेवणारे आपणच मला भलतें करण्यास सांगतां हें माझें दुर्दैव, दुसरें काय म्हणूं ? वगैरे, वगैरे." अशा प्रकारचं पत्र आल्यावर मीं तो प्रश्नच पूनः तिजजवळ काढला नाहीं. सहा-सात वर्षं उत्तर हिंदुस्थानांतच राहून एका सुट्टीमध्यें आईबापांना भेटण्यास ती या बाजूला आली होती आणि मलाहि भेटली. कुंकूं नव्हतेंच. तिच्याशीं कसं बोलावं हें प्रथम मला समजेना. तिलाहि क्षणभर असंच झालं. पण ती माझ्याआधीं सावरली आणि कांहीं तरी कोटि करून तिनं मला हसविलं आणि आम्ही मग बऱ्याच मोकळेपणानं इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलूं लागलों. जाण्यापूर्वी पुनर्विवाहाची गोष्ट थट्टेच्या ओघांत दुरून दुरूनच काढली, तेव्हां ती म्हणाली, "तुम्हां पुरुषांना दुसरा उद्योग नाहीं का? "

बोलण्याचालण्यावरून ती आनंदांत दिसली. पण दुःखाची छटा माझ्या नजरेंतून कशी सुटणार ? चांदणं कितीहि जरी स्वच्छ असलं तरी रजनीच्या

मुखावर अंधुक कृष्णछाया पसरलेली नसते का ? तें कांहींहि असो, तारा हर्षेकडे पाहिलं, म्हणजे मला आनंदहि होतो आणि दुःखहि होतं.—ती या परिस्थितींत आनंदांत आहे म्हणून आनंद होतो आणि दुःखहि होतं; तें कां होतं हें सांगितलंच पाहिजे का ? "

• • •

८

जगाची स्तुति आणि निंदा

एकदां आम्ही घरोब्याची मंडळी धोंडोपंतांकडे गप्पा मारीत बसलों असतां धोंडोपंतांच्या कॉलेजांतील क्रिकेट-टीमचा कॅप्टन फडके आणि त्याचे तीन-चार मित्र आले आणि त्या कॅप्टनचा आणि त्याच्या मित्रांचा कांहीं दोष नसतां कॉलेजच्या पोरांनीं त्यांच्यावर उगाच बालंट आणून कॉलेजांत त्यांची बदनामी चालविली आहे, अशा अर्थाची तक्रार त्यांनीं आम्हांला सुनावली. 'जगांत असं चालायचंच.' मी (संपादक) त्यांना म्हणालों. "रँग्लर परांजप्यांना कॉलेजच्या पोरांनीं उगाच वाईटपणा दिला नाहीं का ? कॉलेजच्या पोरांचं कशाला ? टिळकांनीं, '**प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते**' असं म्हणून त्यांना 'प्रासादशिखरस्थ काक' नाहीं का ठरवलं ? याच टिळकांना आयुष्याच्या अखेरीअखेरीस किर्लोस्कर थिएटरमध्यें उगीचच्या उगीच अंडीं खाण्याची पाळी आली ! गोखल्यांची तर उगीचच्या उगीच इतकी नालस्ती झाली कीं, ते देशद्रोही आहेत अशा समजुतीनं कांहीं तरुणांनीं आगगाडींत त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला होता ! न. चिं. केळकरांनाहि कारण नसतां वाईटपणा थोडा का आला आहे ? ज्यांचं सद्धेतूनं बरं करायला गेले तेच त्यांच्यावर कांहीं वेळां उलटलेले आहेत ! तेव्हां जगाचाच हा जमाना आहे. असं समजून आलेल्या वाईटपणाला शान्तपणें तोंड दिलं पाहिजे."

माझ्या या पोकळ वेदान्ती विचारांनीं मुलांचं कांहीं समाधान झालं नाहीं. आणि ते 'आपल्यावर मोठा अन्याय होत आहे, हें कॉलेज असलंच आहे, इतकंच नव्हे तर जग भल्यांचं राहिलेलं नाहीं,' वगैरे मोठमोठ्या पोक्त गोष्टीहि बोलूं लागले. या सगळ्या गोष्टी धोंडोपंत इतका वेळ शान्तपणें ऐकून घेत होते. पण 'जगांत भलेपणाच राहिलेला नाहीं, भल्यांचं हें जगच नव्हे' वगैरे गोष्टी ऐकल्यावर त्यांनीं एक सिगारेट पेटविली आणि हसून म्हणाले–

"अरे फडके आणि तूं नाडकर्णी, कॉलेजच्या पोरींसारखा तुम्ही खेळाडूंनीं तरी चिरचिरेपणा करूं नये. आणि दुसरं असं पाहा, नाहक वाईटपणा पदरीं येतो म्हणून तुम्ही सगळेजण तक्रार करतां, पण फुकटचा चांगुलपणा मिळतो त्याबद्दलहि वास्तविक न्यायाच्या दृष्टीनं तुम्हीं तक्रार केली पाहिजे. तशी तक्रार कधीं करतां का ? काय वामनराव, बोला तुम्ही, तुम्हीं कांहीं एक चांगलं केलं नसतां तुम्हांला चांगुलपणाचं श्रेय कधींच मिळालं नाहीं का ?"

"माझ्याविषयीं म्हणाल, तर त्याचं असं आहे." मी म्हणूं लागलों तेव्हां धोंडोपंतांनीं मला अडवलं आणि म्हणाले : "तुम्ही साहित्यिक. तुमच्याकडून सरळ उत्तर कुठलं यायला ? पण फडके, मागची मॅच तुम्हीं जिंकलीत त्या-वेळेस विरुद्ध पार्टीचा बोलर आजारी पडला होता आणि आपले दिवेकर आणि पाटील हे अपेक्षेबाहेर उत्तम खेळले म्हणूनच जय मिळाला; पण श्रेय तुझ्या कॅप्टनशिपला मिळालं; खरं ना ? त्या वेळेस सगळं श्रेय तूं आपल्या खिशांत घातलंस. तेव्हां जग भलं होतं वाटतं ? आणि आतां तें वाईट झालं ?"

"त्याचं असं आहे;" फडके म्हणूं लागला. इतक्यांत धोंडोपंतांनीं तोंडांतून सिगारेट काढून म्हटलं, "अरे, तूं क्रिकेटर आहेस. या साहित्यिकासारखी उडवाउडवी करूं नकोस. तूं कॅप्टन होतास म्हणून तो बोलर आजारी पडला नाहीं, आणि दिवेकर आणि पाटील हे चांगले खेळले ते तूं कॅप्टन होतास म्हणन नव्हे."

"खरं आहे तें. पण....."

"पण असं आहे कीं, फुकटचं श्रेय लाटायला तुम्ही-आम्ही सगळेजण तयार असतों. याच्याहि पुढें जाऊन मी म्हणतों कीं, आपण वाईट गोष्टी करतों त्या पचतात, इतकंच नव्हे, तर त्या लोकांना एखादे वेळेस चांगल्या वाटतात आणि ते आपली स्तुति करतात आणि या स्तुतीची माळहि आपण आनंदानं गळचांत घालून जगांत मिरवतों ! मी कित्येक वेळां भित्रेपणानं अपमान सहन केले आहेत, पण त्यामुळें मी मोठा 'समंजस' ठरलों आहें ! मी एकादे वेळेस रागाच्या भरांत बोलूं नये तें बोललों आहें, पण त्यामुळें मी मोठा निर्भीड, सरळ, सडेतोड बोलणारा अशी माझी कांहीं दिवस ख्याति झालेली आहे ! अज्ञाना-मुळें मीं मौन स्वीकारलं त्याचा अर्थ मी खोल विचार करणारा असा झाला

आहे ! फार काय, पापं केलेलीं आहेत तीं लोकांना पुण्यरूप वाटून, मी वंदनीय, पूजनीय म्हणून कांहीं दिवस गणला गेलेला आहें ! लोकांनीं केलेल्या चांगल्या गोष्टींचं श्रेय गैरसमजुतीनं मला मिळालं आहे आणि तें मीं निमूटपणें घेतलेलं आहे. मीं अनेकदां मूर्खपणा केला, पण बायकोनं त्याचं सारं दूषण आपल्याकडे घेऊन सासूचीं बोलणीं खाल्लीं तीं मीं ब्र न काढतां तिला खाऊं दिलीं आणि स्वतःकडे शहाणपणा घेतला ! असे एक का दोन प्रसंग ! माझी बायकोच काय,आपल्या इकडच्या बऱ्याच बायका असं करतात; पण त्याचं फळ काय,तर जन्मभर आपल्या स्वतःच्या बायकोची आणि स्त्रीजातीची आपण चेष्टा करतों!

"बायकांची आम्ही चेष्टा करतों ती आपली खेळकर वृत्तीनं. विनोद-बुद्धीनं करतों; ' मीं म्हटलं. "बायकांची योग्यता आम्ही ओळखून नसतों असं का तुमचं म्हणणं आहे ?"

"बायकांचा हा प्रश्न सध्यां बाजूला ठेवूं, कारण मूळ मुद्द्याला आपण सोडून जाऊं लागलों आहोंत. फुकटचं श्रेय आपण पुष्कळदां घेतों, इतकंच नव्हे, तर मूर्खपणा करून सवरून दुसऱ्याकडे त्याचा वाईटपणा नाहक ज्यात असला तरी तो निमूटपणें जाऊं देतों हें मी म्हणत होतों. याच्याहि पुढें जाऊन मी असं म्हणतों कीं, मूर्खपणाच नव्हे तर आपण केलेलीं पापं एखादे वेळेस पचतात, त्याची तक्रार करीत नाहीं. आपल्या पापाचं प्रायश्चित्त योगायोगानं दुसऱ्याला मिळालं तर गुपचुप बसतों,—त्या वेळेस ' जग हें भल्याचं नाहीं ' अशी ओरड करीत नाहीं ! असे प्रकार मनांत आले म्हणजे मला मात्र म्हणावंसं वाटतं कीं, ' खरंच, जग हें भल्याचं नाहीं. "

खरी गोष्ट अशी कीं, जगांत कोणाला न्याय नको आहे, दुसऱ्याला अन्याय झालेला चालतो, आपण अन्याय केला तरी तोहि आपण चालवून घेतों, पण स्वतःच्या बाबतींत अन्याय झाला तर मग मात्र त्याची आपणांला चीड येते. आपले अपराध आणि आपलीं पापं इतकीं असतात कीं, न्यायानं पाहिलं असतां आपल्याला दहादां फांशीं दिलं पाहिजे असं कार्लाइल म्हणतो तें अगदीं खरं आहे. पण हा न्याय कोणाला नको असतो. दुसऱ्याची चूक किंवा आगळीक असली म्हणजे मग मात्र न्याय आठवतो ! ' अन्याय, अन्याय ' म्हणून तुम्ही ओरडत आहांत, पण देवापुढें जाऊन सर्वांगीण न्याय मागण्याची छाती आहे का तुमच्यापैकीं एकाची तरी ?"

धोंडोपंतांचं या वेळचं अवसान पाहून फडके आणि त्याचे क्रिकेटर मित्र थंडगारच पडले, आणि ओशाळल्यासारखे झाले. तें धोंडोपंतांच्या ध्यानांत येतांच त्यांनीं आपली व्याख्यानबाजी आवरून धरली आणि पुनः एकदां सिगारेट पेटवून 'चहा झाला का ?' म्हणून मोठ्यानं ओरडून घरांत विचारलं. नंतर ते हलक्या आवाजांत म्हणाले, "फडके, आतां मी जें बोललों तें तुमच्यावरच्या रागानं नव्हे. मी स्वतःवरतीच आज रागावलेला आहें. तो राग आतां असा बाहेर पडला. या फडक्याच्या बाबतींत अन्याय होत आहे असं मला वाटतं आणि तें मीं वरिष्ठांशीं आणि बरोबरीच्यांशीं बोलूनहि दाखविलं; पण याचं बक्षीस मला काय मिळालं तर मीच नालायक ठरलों; मीं असंच करायला पाहिजे होतं, मीं तसंच होऊं द्यायला नको होतं, मी पक्षपात करणारा आहें, वगैरे आरोप प्रिन्सिपॉलकडे जमलेल्या मंडळींनीं अर्धवट थट्टेनं काढलेले मला ऐकावे लागले ! आणि हा आजचाच अनुभव नाहीं ! आजच कॉलेजांतून घरीं परत आल्यावर पाहतों तों मीं केलेल्या चुकीबद्दल आई माझ्या पत्नीवर रागावत आहे ! 'नवरा एवढा चांगला, पण बायको ही अशी ! ' असं आमची आई म्हणत होती ! 'खरी चूक माझी आहे असं आईला सांगून टाकतों; माझ्याकरितां तुला कां उगीच बोलणीं बसावींत ?' म्हणून मीं 'तिला' म्हटलं, तर ती म्हणाली, "एवढं करूं नका हं कृपा करून ! खोटं बोलण्याचा आणखी आरोप माझ्यावर यायचा. " आणि तिचं हें म्हणणं खरंहि होतं. पण ही गोष्ट मनाला लागून राहिली होती आणि मन उद्विग्न होऊन गेलं होतं. स्वतःवरच रुष्ट होऊन सचिन्त बसलों असतां आमचे मित्र हे साहित्यिक वामनराव वर आले आणि क्रिकेटमॅच आमच्या टीमनं जिंकल्याबद्दल माझं अभिनन्दन करूं लागले ! मॅच जिंकणारे बॅटस्मेन कोण, आणि अभिनन्दन कोणाचं होत आहे, हें पाहून मनांत हसूं आलं, आणि क्रिकेट-खात्यावर मी देखरेख चांगली करीत नाहीं, पक्षपात करतों, हे घरचे अहेर आठवून पुनः मन उद्विग्न आणि रुष्ट झालं. अशा मनःस्थितींत तुम्ही मंडळी आलांत तेव्हां मी कांहीं तरी नरम-गरम बोलून गेलों. बरं, हा चहा आलाच. तो घ्या आतां. "

"गरम बोललांत तेंच चांगलं झालं," फडके म्हणाला. "चहा गरम असला म्हणजेच गोड लागतो."

"आणि चहा पितांना बायकोची तिच्या पाठीमागें चेष्टा चालविली, म्हणजे

तो यांना अधिक गोड लागतो." वहिनी धोंडोपंतांकडे पाहून म्हणाल्या. "मघांशीं माझं आणि सासूबाईंचं नांव घेऊन कांहीं तरी चेष्टा चालली होती, ती मीं ऐकली नाहीं, पण,–"

"ऐकली नाहींत, मग चेष्टा चालली होती कशावरून म्हणतां ? तुमची तर स्तुति चालविली होती त्यांनीं ! " मीं म्हटलं.

"मान तुटली तरी स्तुति व्हायची नाहीं ! " वहिनी उद्‌गारल्या. "त्या विद्यार्थिनींची मात्र तोंड भरून स्तुति होईल ! जग आतां भल्याचं राह्यलं नाहीं."

"खरं आहे, बाई," धोंडोपंत म्हणाले. "तूं म्हणतेस तेंच खरं ! कॉलेजच्या विद्यार्थिनींची मीं मघाशीं स्तुति केली का ? उत्तम ! पाह्यलंत, गडचांनो, जग कसं आहे तें ? आतां कॉलेजच्या विद्यार्थिनींचं नांव तरी काढलं होतं मीं ? जग खऱ्याचं आणि भल्याचं राह्यलं नाहीं हेंच खरं. कोणाची तरी उगीच स्तुति होईल आणि कोणाची तरी उगीच निन्दा होईल! बाकी जग हें असं आहे म्हणूनच बरं आहे. नाहक स्तुतीची आणि निन्देची फिटास फिट होते ! "

• • •

९

कोणीं कोणाला फसवलं ?

धोंडोपंत 'कालिदासाच्या काव्यांतील पाठभेद' यावर एक लेख लिहीत होते. त्यांतला कांहीं भाग मीं वाचला होता. तो मला आवडला होता आणि म्हणून पुढचा भाग वाचण्याकरितां मी त्यांच्याकडे संध्याकाळीं गेलों आणि 'लेख पुरा झाला का ? ' म्हणून विचारलं. "लेख कांहीं पुरा झाला नाहीं, पण ही नोटीस लिहिली आहे ती वाचा." ते म्हणाले. त्या नोटिशींत दोन मुलांनीं वर्गांत खोड्या केल्या होत्या म्हणून प्रत्येकीं २० रुपये दंड केला आहे असं लिहिलं असून असाच अपराध त्यांचेकडून पुनः घडल्यास त्यांना कॉलेजमधून घालवून देण्यांत येईल, असं लिहिलं होतं. नोटीस वाचून होई-पर्यंत त्यांची सिगारेट संपली ती टाकून देऊन त्यांनीं त्या मुलांनीं काय खोड्या केल्या, त्या रागानं पुन्हा संतप्त होऊन सांगितल्या.

"या खोड्या तर किरकोळ स्वरूपाच्या आहेत !" मीं म्हटलं. "दुसऱ्या प्रोफेसरांच्या वर्गांत तर याहून--"

"पण माझ्या वर्गांत नाहीं चालायच्या." 'माझ्या' शब्दाला जोर देऊन म्हणाले. "या पोरांना चांगलं ठेचलं पाहिजे म्हणजे चांगली जरब बसेल. माझा अपमान म्हणजे काय आहे ? I must make an example of them."

"तुमचा अपमान केला हा त्यांचा अपराध दिसतो,--इतरांचा अपमान त्यांनीं केला असता तर कांहीं तुम्हीं अशी कडक शिक्षा केली नसती. तुमचं नेहमींचं तत्त्वज्ञान आज विसरलेत वाटतं ?"

"माझ्या रागाच्या आगींत आणखी रॉकेल ओतूं नका, वामनराव." धोंडोपंत गंभीरपणें म्हणाले; तेव्हां मी आपला गप्प बसलों आणि जवळ पडलेलं रघुवंशाचं पुस्तक चाळूं लागलों. एक-दोन मिनिटं असे आम्ही बसलों

असतां फडके आणि नाडकर्णी हे दोघे मुलगे दारावर टिक् टिक् करून आले. "आज कोणाविरुद्ध तक्रार आहे?" धोंडोपंतांनीं विचारलं, "करमरकराच्या विरुद्ध Vote of censure pass करणार ना?"

"Vote of censure पास करणार होतों" फडके म्हणाला, "पण या नाडकर्णीचं आणि इतरांचं असं म्हणणं पडलं कीं, पुराव्यानिशीं तो आतां आपल्या तावडींत चांगला सांपडला आहे हें जगाला ठाऊक झालं आहे. आपल्या मरणानंच तो मेला आहे, त्याला आणखी मारण्यांत फायदा काय? क्षमा करावी झालं."

"आणखी असं," नाडकर्णी म्हणाला, "तुमच्यापुढें आम्हीं हें प्रकरण आणलं म्हणजे तुम्ही 'जाऊं दे, क्षमा करावी,' असाच सल्ला देणार, म्हणून मीं याला सांगितलं कीं जाऊं दे, क्षमा कर झालं. तुमच्यासारख्यांजवळ राहून हें शिकलों नाहीं, तर काय शिकलों आम्ही?"

"हेंच सांगायला आलों होतों आम्ही." फडके म्हणाला, "आतां जातों जरा टेनिस खेळायला."

ते दोघे निघून गेल्यावर धोंडोपंत डोळे मिटून एक मिनिटभर आरामखुर्चीवर पडून राहिले. त्यांच्या मनांत काय विचार चालले होते कोणास ठाऊक! पण मुलांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांना देखील क्षमा करावी आणि आपण स्वाभिमानाला भलतं महत्त्व देऊन दुराग्रहानं, आपला दरारा कमी होतो म्हणून, एवढ्या तेवढ्या कारणांकरितां जबर शिक्षा करावी हें चांगलं का, अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनांत घोळत असावेत असं वाटतं. कारण एक मिनिटाच्या त्या ध्यानस्थ स्थितींतून ते एकदम उठले आणि माझ्याजवळ पडलेली ती नोटीस उचलून त्यांनीं ती फाडून टाकली आणि '**शिष्यादपि सुभाषितं ग्राह्यम्**' असे उद्गार काढले! त्यांचा नेहमींचा स्वभाव मला ठाऊक होता आणि त्यांची मनःस्थिति मीं ओळखली होती, पण उगीच त्यांना खिजवण्याकरितां मीं म्हटलं, "कां, फाडून कां टाकली नोटिस? या खोड्याळ पोरट्यांना चांगला दंड केलाच पाहिजे. We must make an example of them."

धोंडोपंतांनींहि माझ्या भाषणांतला निष्कपट उपरोध आणि टोमणा ओळखला आणि स्मित करून कांहीं तरी उत्तर देण्याचा प्रयत्न मनांतल्या

मनांत केला तो ओठांच्या हालचालीवरून मला दिसला. पण बहुधा परस्पर-विरोधी विचारांमुळें शब्द मात्र ओठांबाहेर आले नाहींत. आरामखुर्चीवर बसून त्यांनीं जवळ पडलेलं कालिदासाचं एक काव्य उचलून मनांत वाचण्यास आरंभ केला. "बरं आहे, मी आतां जातों, क्षमा असावी." असं म्हणून बाहेर पडणार होतों; "पण जरा बसा, बसा हो," असं म्हणून त्यांनीं मला बसवून घेतलं. मीहि फारसे आढेवेढे न घेतां तेथला रघुवंश घेऊन वाचूं लागलों. इतक्यांत ज्यांनीं धोंडोपंतांच्या वर्गांत खोड्या केल्या होत्या आणि ज्यांना दंड केल्याची त्यांनीं नोटिस काढून फाडली होती तेच दोघे विद्यार्थी दारावर भीत भीत टक्‌टक् करून, हलक्या पावलानें, चोरट्यासारखे आले. धोंडोपंतांनीं त्यांच्याकडे पाहिलं न पाहिलं असं करून पुस्तकावरचे डोळे न काढतांच 'काय पाहिजे? कशाला आलेत?' असं तुटकपणें विचारलं.

"आम्हांला जबर दंड केल्याची नोटिस तुम्ही लावणार आहांत असं क्लार्क-कडून कळलं." त्यांतला एकजण म्हणाला. "But, Sir,-"

"बट् सर नाहीं आणि फट् सर नाहीं!" धोंडोपंत रागाच्या आविर्भावानं म्हणाले, "मला तुमच्याशीं बोलायचं नाहीं."

"But, Sir,-"

"काय 'बट् सर'? आतां जा तुम्ही, मला तुमचं कांहीं एक ऐकावयाचं नाहीं." असं म्हणून त्यांनीं आपलं डोकं पुस्तकांत खुपसलं.

ते मुलगे काय करतात बिचारे! एकदोन मिनिटं थांबून हिरमुसलीं तोंडं करून ते परत जाऊं लागले. धोंडोपंतांचा रागाचा नाटकी आविर्भाव पाहून मी मनांत हसत होतों आणि हसण्याचं चिन्ह त्या पोरांना दिसूं नये म्हणून पुस्तकाआड तोंड लपवून घेतलं होतं. मुलगे फाटकाच्या बाहेर पडणार इतक्यांत धोंडोपंतांनीं खुर्चीवरून उठून त्यांना हांक मारली आणि जवळ आल्यावर त्यांना ते म्हणाले: "अरे,

*उष्णत्वमग्न्यातप-संप्रयोगात्**
शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य ।

हें शिकवलेलं आठवतं ना? मग जा तर."

* "पाणी एखाद् वेळेस तापतं, पण अग्नीचा संपर्क लागतो म्हणूनच तें तापतं; एरवीं पाण्याचा धर्म म्हटला म्हणजे शैत्य हाच होय."

त्या पोरांचं संस्कृत बेताचंच दिसलं, कारण त्या वचनाचा त्यांना क्षणभर कांहीं बोध झालेला दिसला नाहीं ! ते बावरल्यासारखे होऊन वेड्यासारखे एकमेकांकडे आणि आमच्या दोघांकडे पाहूं लागले ! त्याची दया येऊन मी अर्थ सांगूं लागणार तोंच धोंडोपंतांच्या चेहऱ्यावरून वगैरे त्यांना थोडासा अर्थबोध झाला असावासा वाटतं आणि 'Thanks, Sir' असं म्हणून हसऱ्या चेहऱ्यानं ते बाहेर पडले !

"या पोरांचं संस्कृत अगदीं कच्चं दिसतय्" असं मीं म्हटलं, तेव्हां धोंडोपंत म्हणाले, "संस्कृत कच्चं असेल, पण कांहींचीं मनं फारच सुसंस्कृत आहेत ! उदाहरणार्थ, तो फडके आणि नाडकर्णी" !

• • •

१०

आठवणींतून आठवणी आणि मूळ मुद्द्याची पाठवणी

मुंबईच्या हिंदु-मुसलमानांच्या दंग्याचे ते दिवस होते. एक दिवस विनू कर्वे, तारा हर्षे, माधव आपटे, विमल, नर्मदा (नाहीं, नर्मदा नव्हती त्या वेळेस, ती क्षयानं वारली होती) अशी मंडळी आम्ही गप्पा मारीत बसलों होतों, तेव्हां सगळचांनीं मुसलमानांवर झोड उठविली; मीहि त्यांतच सामील होतों, पण कांहीं वेळानं माझी तात्त्विक सत्यनिष्ठा जागृत झाली आणि मीं अमुक धर्माचे चांगले आणि अमुक धर्माचे वाईट असं म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं, सगळचा धर्मात चांगले, तसेच वाईट लोक असतात असं म्हटलं. इतक्यांत माझे मित्र वा. म. जोशी तिथें आले आणि तेहि चर्चेत सामील झाले. त्यांनीं मलाच दुजोरा दिला आणि आपल्या कांहीं आठवणी सांगितल्या. ते म्हणाले : "मी तुरुंगांत असतांना रोज ४० पौंड, म्हणजे रॉकेलचा मोठा डबा भरून कांहीं उरतील एवढे, जोंधळे कांहीं दिवस दळण्याकरितां देत असत. माझं जातं खराब होतं म्हणून माझ्या हातून तेवढे जोंधळे दळून होत नसत. पण माझ्यावर पहारा करण्याकरितां ठेवलेला कैदी पहारेकरी (Convict overseer) जो होता तो बलुची मुसलमान होता. त्यानं आपल्या बायकोचा खून रागाच्या भरांत केला होता, पण तो फार सज्जन होता."

"बायकोचा खून करणारा सज्जन! चांगलं आहे!!" विमल मधेंच म्हणाली.

"हो, सज्जन. तुम्हांला नाहीं समजायचं तें. तो अतिशय धर्मवेडा होता. अशक्त झाला होता, पण त्याच्या रमजानच्या का कसल्या, महिनाभर चालणाऱ्या 'रोज्या' च्या दिवसांत तो दिवसां तोंडांत पाण्याचा थेंब घालीत नसे. त्याच्या अंगांत अगदीं त्राण नव्हता, पण पोटांत अन्नपाणी नसतांना देखील तो मला चक्की 'पिसण्यां' त मदत करीत असे. मी त्याला

नको म्हणत असें; कारण मदत करतांना त्याला कोणीं पाहिलं असतं तर त्याची 'पिवळी पगडी' गेली असती (म्हणजे, ओव्हरसिअरच्या अधिकारावरून पदच्युत होऊन पुनः साधा कैदी झाला असता आणि त्यालाच चक्की पिसण्याचं काम करावं लागलं असतं). चक्की पिसतांना तो अगदीं धापा टाकीत असे आणि आतां यालाच घेरी येते कीं काय अशी मला भीति वाटत असे. पण तो आपला हट्ट सोडीत नसे. भत्त्याच्या वेळीं मला भाकरी मिळे आणि तो ओव्हरसिअर म्हणून त्याला पोळचा मिळत. त्यांतली एक तो मला देत असे. हें देखील हुकमाच्या विरुद्ध होतं. जर जेलरनं किंवा सुपरिंटेंडंटनं पाहिलं असतं तर त्याची पिवळी पगडी गेली असती. पण त्याला नको नको म्हटलं तरी तो ऐकत नसे आणि मला पोळी खायला लावीत असे. त्याच्या अशा कितीतरी गोष्टी सांगतां येतील."

वा. म. जोशींनीं आपले अनुभव सांगितल्यावर तारा हर्षेलाहि स्फूर्ति उत्पन्न झाली आणि ती उत्तर हिंदुस्थानांतले आपले अनुभव सांगूं लागली. ती म्हणाली, "आमच्या गांवीं हिंदु-मुसलमानांचा दंगा गांवाच्या एका मोहल्ल्यांत सुरू होता, तेव्हां आमच्या मोहल्ल्यांत कधीं दंगा होत नसे म्हणून मी कांहीं कामाकरितां बाहेर पडलें. पण योगायोग असा कीं त्या दिवशीं कांहीं हिंदु गुंडांनीं त्या मोहल्ल्यांतल्या एका मुसलमानाचं दुकान लुटण्यास आरंभ केला आणि त्या दंगलींत मी सांपडलें. मीं भराभर पावलं टाकून तेथून निसटण्याचा प्रयत्न केला, पण कांहीं हिंदु गुंडांना माझ्या अंगावर असलेल्या थोड्या दागिन्यांचा मोह होऊन म्हणा, किंवा पापबुद्धीनं म्हणा, ते माझ्या पाठीस लागले. मी घाबरून जाऊन घामाघूम झालें आणि भान न राहून जवळच्याच एका घरांत शिरलें. तें होतं मुसलमानाचं! आगींतून फुपाटचांत पडल्यासारखं झालं. पण सांगायची गोष्ट अशी कीं, तिथल्या मालकानं मला सभ्यतेनं वागवून त्याच्या गोषांतल्या बायकांकडे पोंचवलं; चहा दिला आणि कांहीं वेळानं स्वतः हिंदूसारखा पोशाख करून त्यानं मला बिऱ्हाडीं पोंचवलं! तेव्हां खरी गोष्ट अशी आहे कीं मुसलमान सगळे वाईट, या म्हणण्यांत अर्थ नाहीं."

"हिंदूंच्या विरुद्धच तुम्हीं गोष्टी सांगितल्यात, पण मला वाटतं....." विमल मध्येंच म्हणाली, तेव्हां तिचं वाक्य पुरं होऊं न देतां मी म्हणालों,

"हिंदु वाईट असं आम्हांला ध्वनित नाहीं करायचं. उलट मला तर असं वाटतं कीं, आमचा सालसपणा आणि सात्त्विकपणा हेच दुर्गुण ठरण्याची आतां पाळी आली आहे. सद्‌गुण हेच कधीं कधीं दुर्गुण ठरत असतात."

"सद्‌गुण हे सद्‌गुण असतील तर ते दुर्गुण कसे ठरतील?" माधव आपटे मला पेंचांत पकडण्याच्या आविर्भावानं मधेंच म्हणाला. तेव्हां मीं म्हटलं, "कसे ठरतात हें मला आतां सांगतां येत नाहीं, पण ठरतात हें खरं. बायकांचे चांगले दागिने हें मघाशीं, तारा हर्षेनं सांगितलं त्याप्रमाणें त्यांच्यावर आपत्ति ओढवतातच ना? देश सुपीक आणि सुसंपन्न असला म्हणजे त्याच्यावर स्वाऱ्या होतात का नाहीं?"

"तुम्ही उदाहरणं देतां तीं नैतिक सद्‌गुणांचीं नाहींत,—सौंदर्याचीं किंवा नैसर्गिक संपन्नतेचीं आहेत. नैतिक सद्‌गुण हे दुर्गुण कसे ठरतात हा माझा प्रश्न आहे." माधव आपट्यानं असं मला मध्येंच बरोबर अडवलं, पण लगेच म्हटलं, "नैतिक सद्‌गुण देखील घाताला कारणीभूत होतात. एखाद्याची सद्‌गुणविषयक सत्कीर्ति ही त्याच्याबद्दल असूया उत्पन्न करण्याला कारणीभूत होत नाहीं का? ग्रीस देशामध्यें अरिस्टायडीज् नांवाचा एक सचोटीचा, आणि मोठा न्यायनिष्ठ पुरुष होऊन गेला. टिळक जसे 'लोकमान्य' तसा अरिस्टायडीज् हा 'न्यायनिष्ठ', (Aristides, the Just) अशी त्याची सर्व देशभर कीर्ति पसरलेली होती. पण कांहीं लोकांना असं वाटूं लागलं कीं, हा मोठा न्यायनिष्ठ आणि आम्ही काय अन्यायनिष्ठ? ग्रीसमध्यें अशी एक चाल होती कीं, दरवर्षीं देशाला अत्यंत विघातक कोणी असेल तो गुप्त मतदानपद्धतीनं निवडून काढून त्याला हद्दपार करण्यांत येत असे. अरिस्टायडीजची कीर्ति कालान्तरानं पुष्कळांना असह्य होऊन एक वर्षीं हद्दपार करण्यास हा अत्यंत लायक म्हणून लोक-गंगेचा निर्णय झाला आणि बिचाऱ्याची 'न्यायनिष्ठा' आणि सत्कीर्ति त्याच्या नाशाला कारणीभूत झाली!"

"पूर्वीच्या इतिहासांतलं आणि दुसऱ्यांच्या देशांतलं उदाहरण कशाला पाहिजे? मीच आपला अनुभव सांगतें." तारा हर्षे पुनः मध्येंच म्हणाली आणि आपला अनुभव सांगूं लागली. ती म्हणाली: "मी कांहीं मोठी बुद्धिमान् किंवा कर्तृत्ववान् किंवा वक्तृत्वनिपुण नाहीं हें तुम्हांला ठाऊक आहे. पण आमच्या गांवांत एक 'स्त्री–समाज–सेवा–मंडळ' आहे, त्याची

मी चिटणीस आहें आणि शिक्षकिणीचं काम सांभाळून या समाजाचं थोडं-बहुत काम करतें; त्यामुळें स्थानिक वर्तमानपत्रांत माझं नांव पुष्कळदां येतं आणि त्यामुळें शाळेंतहि माझं जरा कौतुक होतं. पण यामुळेंच कांहीं शिक्षकिणींच्या मनांत माझ्याविषयीं असूया उत्पन्न झाली! या शिक्षकिणींपैकीं एकीचा गणित शिकविण्यांत मोठा हातखंडा होता. इतका कीं शाळेंतली शिक्षकीण असून खाजगी रीतीनं परीक्षेला बसणाऱ्या बी. ए. च्या वर्गांतल्या मुलींच्या तिला शिकवण्या मिळत. आमच्या बाजूच्या पंचक्रोशींतच नव्हे तर सहस्रक्रोशींत शिक्षणखात्यांतल्या जाणत्या लोकांमध्यें तिची कीर्ति पसरलेली होती. पण स्थानिक वर्तमानपत्रांत तिचं नांव येत नसे आणि मी सामान्य शिक्षकीण असून त्या गांवीं मोठी प्रसिद्ध, याचंच तिला वैषम्य! तेव्हां माझं समाजसेवामंडळांतील पुण्य माझ्या आड येत आहे कीं नाहीं सांगा!"

"असे प्रकार पुष्कळदां होतात," मी मुद्दाचा धागा हातीं घेऊन पुढें बोलूं लागलों. "सत्कीर्तिप्रमाणेंच सौजन्यहि कित्येकदां घातुक होतं. युव-युवतींचं सात्त्विक उत्कट प्रेम त्यांना संकटांत लोटतं याचीं उदाहरणं अनेक आहेत. पण आईचं मुलावरचं प्रेम किंवा मुलाचं आईवरचं प्रेम हें देखील उभयतांचं नुकसान करतं. याचं एक चांगलं उदाहरण मला आतां आठवतं आहे तें सांगतों. आमच्या कोंकणांतल्या गांवाजवळच्या एका गांवांतली गोष्ट. तिथल्या एका तरुण कुणब्यावर खुनाचा आरोप नाहक येऊं लागला आणि घाबरून जाऊन तो फरारी झाला. मुंबईस येऊन कुठें तरी मोलमजुरी करून तो आपलं पोट भरीत असे. घरीं म्हातारी आई होती. थोडीशी शेतवाडी होती तीवर कशी तरी दुपारची वेळ ती निभावून नेत असे. मुलाची तिला काळजी वाटायची, नाहीं नाहीं ते विचार मनांत यायचे. बिचारी अगदीं खंगून गेली आणि मृत्युपंथाला लागली! पण त्याचा तिला सात-आठ वर्ष पत्ताच लागला नाहीं! लागेल कसा? सरकारच्या हातीं पत्र जाईल आणि आपण पकडले जाऊं म्हणून तो पत्रच पाठवीत नसे आणि मुंबईत गांवकऱ्यांना तोंड दाखवीत नसे. नांवगांव बदलून कुठें तरी पडून असे. एक जीवश्च कंठश्च दोस्त होता त्याच्याबरोबर मधून मधून पांच-दहा रुपये पाठवून खुशाली कळवीत असे. म्हातारीची आठवण त्याला रोज व्हायची, आणि तिच्याकरितां रात्रीं निजतांना त्याच्या डोळ्यांतून अश्रु

ग्रंथ संग्रहालय, ठाणे

पडायचे. शेवटीं त्याला राहवेना म्हणून वेषांतर करून एके दिवशीं अपरात्रीं तो आपल्या झोंपडीशीं आला आणि म्हातारीला हळूच 'आई, आई' म्हणून हांक मारूं लागला. म्हातारीनं आवाज ओळखला. पण 'स्वप्न तर नाहीं ?' असं क्षणभर तिला वाटलं आणि 'स्वप्न नाहीं' असं ठरल्यावरहि काय करावं हें तिला सुचलं नाहीं, म्हणून तो पुन्हा हांक मारूं लागला. शेवटीं कांपत कांपत जाऊन तिनं दार उघडलं आणि पाहाते तों आपला मुलगा नसून कोणी तरी दाढीवाला मुसलमान ! मुलानं आंत शिरून दाराला कडी लावून घेऊन क्षणार्धांत दाढी काढून टाकली आणि आईचे पाय धरले आणि तो हसूं लागला, आणि एकीकडे रडूंहि लागला ! आईचीहि अशीच अवस्था झाली. त्याच्या अंगावरून ती हात फिरवी, कांहींतरी बडबडे, हसे आणि रडूं लागून पदरानं आपले आणि मुलाचे डोळे पुशी ! मुलगा तिच्याजवळ दोनतीन महिने राहिला, आणि आईजवळ १०-१५ रुपये देऊन 'मुंबईला जातों' म्हणूं लागला. म्हातारीच्या आग्रहानं आणखी दोनतीन महिने तो राहिला, पण या अवधींत तिला दिलेले १०-१५ रुपये संपले आणि आतां रोजगाराला गेल्याशिवाय गत्यन्तर नाहीं अशी पाळी आली तेव्हां तो 'आज रात्रीं मी जाणारच' असं जोरानं म्हणाला. आई कसली ऐकते ? 'आज बुधवार आहे, उद्यां आवस आहे' असं करून तिनं त्याला आणखी दोनतीन दिवस ठेवून घेतलं. पण आईची माया तोडून शेवटीं एक दिवस मुलानं जाण्याचा निर्धार केलाच आणि आईनंहि होय नाहीं करीत परवानगी दिली. रात्रीं दोन वाजतां उठून जायचं असं ठरलं. पण उठायला जरा उशीर झाला, आणि म्हातारी म्हणूं लागली कीं, 'तुला भाकरी खायला घातल्याशिवाय आणि बरोबर दोन भाकऱ्या दिल्याशिवाय जाऊं देणार नाहीं.' मुलाला ते मायेचे पाश तोडतां येईनात आणि निघतां निघतां ४-४।। झाले. आतां जावं न जावं असा विचार मुलाच्या मनांत आला, पण हिय्या करून आणि देवाचं नांव घेऊन तो बाहेर पडला. कर्मधर्मसंयोग असा कीं गांवच्या वेशीबाहेर तो पडतो आहे तों त्याच वेळेस गांवांतला जोशी शेताडींत शौचविधीला जाऊन परत येत होता त्यानं त्याला ओळखलं आणि 'अरे गोंद्या, तूं कसा रे इकडे ? फरारी झाला होतास ना?' असं म्हटलं. गोंद्या उत्तर देतोय् कशाला ? तो पळूं लागला. पण त्या ग्रामजोश्यानं पैशाच्या लोभास्तव त्याला पकडलं आणि

शेवटीं गोंद्याला नाहक शिक्षा व्हायची ती झालीच ! आतां पाहा, मुलाचं आईवर प्रेम नसतं, किंवा आईचं त्याच्यावर एवढं प्रेम नसतं, तर हा प्रसंग ओढवला असता का ? "

" प्रेमामुळं हा प्रसंग नाहीं ओढवला, वेडच्या प्रेमामुळें ओढवला. " विमलनं आक्षेप घेतला. त्यावर मी उत्तर देणार इतक्यांत थंडगार सरबत घरांतून आलं आणि गप्पा तिथेंच थांबल्या. सरबत पितांना तारा हर्षे आणि विनू कर्वे यांना एकमेकांशीं सलगीनं बोलतांना आणि एकमेकांकडे पाहून साभिप्राय हसतांना पाहिलं, तेव्हां मनांत एकदम विचार आला, ' अरेच्या, या तारा हर्षेनं इतकीं वर्षं आत्मसंयमन केलं, पण अखेर या विधुराच्या पाशांत सांपडणार वाटतं! " पण त्या वेळेस मी बोललों नाहीं. म्हटलं केव्हां तरी समजेलच काय आहे तें !

• • •

११

गाडी रुळावरून घसरली का रुळावर आली ?

विनू कर्वे यानं काळी बायको कां पसंत केली हें मीं मागें सांगितलं. याची बायको नर्मदा ही आणि तिचं मूल हीं क्षयानं वारलीं हें मला ठाऊक होतं. पण तो पुनः लग्नाला तयार आहे इतकंच नव्हे, तर तारा हर्षे इच्याशीं त्याचं लग्न ठरलं आहे हें ऐकून मला आश्चर्य वाटलं. तारा हर्षे ही इतक्या वर्षांच्या आदर्शात्मक आत्मसंयमनानंतर लग्नाला कशी तयार झाली हें आश्चर्य तर खरंच; पण त्यापेक्षां मला याचं आश्चर्य वाटलं कीं मला कशा या गोष्टी कळल्या नाहींत ? शेवटीं मीं एकदां तारा हर्षेला घरीं बोलावून "आम्ही सांगत होतों तेव्हां ऐकलं नाहींस, आतां हें कसं काय सुचलं ?" असं विचारलं. तेव्हां तिनं "देवानं गांठी बांधलेल्या असतात; आपण काय करतों ?" असं प्रथम कांहीं तरी म्हणून खरी हकीकत नंतर सांगितली ती अशीः—"बिगनेर इथें मी शिक्षकीण म्हणून थोडंसं नांव मिळवलं, स्त्री-सेवामंडळाची चिटणीस म्हणून काम केलं, त्याबद्दल योग्यतेपेक्षां अधिक कीर्तिहि मला मिळाली. हृदय-मंदिरांतल्या प्रेममूर्तीची मानसपूजा करून समाधान मानून घेण्याचा मी प्रयत्न करीत असें. पहिलीं कांहीं वर्षं माझ्या मनाला पूर्ण नाहीं तरी पुष्कळ समाधान मिळालं, पण पुढें पुढें असमाधानाची रुखरुख वाढूं लागली. देहधर्म म्हणूनच नव्हे, तर इतर कारणांमुळेंहि. आपल्या हिंदुस्थानांत स्त्रियांना अविवाहित राहून लोकापवाद टाळणं कठीण. कोणा पुरुषाशीं कामाच्या निमित्तानं थोडाबहुत परिचय झाला आणि बोलणं-चालणं होऊं लागलं कीं लोकांची जीभहि बोलूंचालूं लागते आणि मग त्या स्त्रीला त्या पुरुषाशीं कसं वागावं हें समजत नाहीं. तीं मग त्याच्याशीं बोलण्याचं टाळूं लागते, भलत्याच ठिकाणीं तुटकपणा दाखविते आणि क्वचित्प्रसंगीं त्याला अपमान वाटेल असं बोलते किंवा वागते, आणि मग विचार करूं लागल्यावर असं वागल्याबद्दल पश्चात्ताप पावते ! असे प्रसंग वारंवार येऊं लागले म्हणजे जीव नकोसा होतो. आणि

वैतागानं, कोठला का पुरुष असेना, त्याच्याशीं लग्न करून लोकांचीं तोंडं बंद करावींत, असे वेडे विचार मनांत येऊं लागतात ! या खेपेला मी या बाजूला आल्यें त्या वेळेस मी अशा मनःस्थितींत होत्यें आणि तुम्हांला भेटून मन मोकळं करून घेणार होत्यें. पण तुम्ही इथें नव्हतातच. तुमची विचारसरणी आठवून असाहि मनांत विचार यायचा कीं, आपण जें आत्मसंयमन करीत आहोंत तें खरोखरच उचित आहे, का सौजन्याचा हट्टाग्रह आपण धरून बसलों आहोंत ? इतके दिवस आपण ध्येयवादी म्हणून कीर्ति मिळविली ती गमावेल म्हणून आपण ब्रह्मचर्याची ही तपश्चर्या हट्टानं चालू ठेवली आहे, का खरोखरच हा मार्ग श्रेयस्कर आहे म्हणून आपण त्या मार्गानं जात आहोंत ? अशा या संशय-ग्रस्त दोलायमान मनःस्थितींत असतांना विमलच्या निमित्तानं 'त्यांची' गांठ पडली. आधीं ओळख होतीच, पण त्यांची पत्नी वारल्यामुळें ते दुःखी-कष्टी होते, आणि—आणि—कारणं कशाला सांगायला पाहिजेत ? आमच्या गांठीभेटी बऱ्याच व्हायला लागल्या ही गोष्ट खरी. नर्मदेसारखी सुशील पत्नी वारल्यानंतर लगेच कांहीं दिवसांनीं पुनः लग्न करण्याचा त्यांनीं आपला विचार व्यक्त केला. तेव्हां प्रथम मला त्यांचा राग आला,—इतका कीं मीं त्यांना आणि एकंदर पुरुषजातीला पुष्कळशा शिव्या देऊन घेतल्या. पण घरीं गेल्यावर याबद्दल माझं मन मला खाऊं लागलं. मी एवढी निग्रही त्या मला तरी लग्न करायची आतां इच्छा होऊं लागली आहेच ना ? आणि पुनः लग्न करायचंच तर लवकर केलेलं काय वाईट ? आणि वाईट असलं तरी सबंध पुरुषजातीला मीं कां दोष द्यावा? आणि एखाद्याच्या दोष असला तरी मीं जे अपशब्द उच्चारले ते रास्त होते का ? असे नाना तऱ्हेचे विचार मनांत येऊन माझ्या भावनात्मक स्वभावाची मला लाज वाटूं लागली आणि चीड येऊं लागली आणि लगेच त्यांच्याकडे जाऊन माफी मागायची असं ठरवून माफी मागितलीहि. पण या माफी मागण्याच्या प्रकरणामुळें त्यांचं आणि माझं एकान्तांत पुष्कळसं मोकळे-पणानं संभाषण होऊन एकमेकांबद्दल आदर वाटूं लागला, आणि मला वाटतं आदराच्या पोटींच तेव्हां प्रेमाचंहि बीज लपलेलं होतं. पुढचं आतां थोडक्यांतच सांगत्यें. एक दिवस आम्ही फिरायला गेलों असतां अनुभवाच्या खूप खूप गप्पागोष्टी केल्या आणि कधीं मनसोक्त हसलों, कधीं गंभीर झालों, कधीं पुढाऱ्यांवर टीका केली, कधीं आपले दोष कबूल केले, वगैरे वगरे. परत येतांना

दोन रस्ते फुटले. ' या रस्त्यानं जाऊं या ' असं ते म्हणाले, तेव्हां मीं म्हटलं, ' नको, या रस्त्यानं जाऊं. ' कां म्हटलं कोणास ठाऊक, पण म्हटलं खरं. ' तो लांबचा आहे. घरीं पोंचायला एक तास उशीर होईल, रात्र होईल. ' ते म्हणाले. तेव्हां मीं म्हटलं, ' हरकत नाहीं, तुम्ही बरोबर आहांतच ना ? बाकी तुम्हांला यायचं नसलं तर मग माझा आग्रह सोडला मीं. '

" तसं नाहीं, मला आनंदच आहे. तेवढं अधिक बोलणंचालणं होईल. माझं काय, एक तासच नव्हे तर सबंध आयुष्यहि तुमच्याबरोबर–"

असं बोलून गेले ते आणि जीभ चावून वाक्य अर्धवटच सोडलें, पण त्याचा भावार्थ सगळा उघड होता. तोंडांतून ते शब्द गेल्याबद्दल त्यांना चुटपुट लागून राहिली आणि एकदोन मिनिटं आम्ही कांहीं न बोलतांच मीं सुचवलेल्या मार्गानं चालूं लागलों. जरासं चालल्यावर आम्ही सांवरलों आणि बाह्यतः पूर्ववत् बोलूं चालूं लागलों. मनांत मात्र दोघांच्या काय चाललं असेल तें आमचं आम्हांला ठाऊक ! घराजवळ आल्यावर–

" दमल्या असाल, पाणीबिणी देतों चला. थंडगार पाणी आहे आमच्या घरांत " असं ते म्हणाले आणि हळूच जणूं कांहीं कानांत म्हणाले, " मघाशीं आयुष्यभर प्रवासाचं जें बोलून गेलों त्याबद्दल रागावूं नका हां ? विसरून जा."

" रागवायचं काय त्यांत?" मीं उत्तर दिलं आणि लगेच हलक्या आवाजांत म्हटलं, " प्रवास करणं मला फारसं आवडत नाहीं. मी आपली जन्मभर घरांत राह्यला तयार आहें. पण संभाळून असलं पाहिजे तुम्हांला. "

" कां बुवा ?" आश्चर्याचा आविर्भाव करून ते म्हणाले, तेव्हां मीं उत्तर दिलं, " कां म्हणजे ? घरांत आल्यावर घराबाहेर काढणं कठीण आहे ! "

कांहीं अंशीं बोलण्याच्या ओघांत योगायोगानं आणि कांहीं अंशीं जाणून उमजून मनांत होतं तेंच, आम्ही बोलून गेलों आणि-आणि आतां पुढें काय सांगायचं ? बरं झालं का वाईट झालं हें ईश्वरालाच ठाऊक. कसं का असेना, तुमचा आशीर्वाद पाहिजे, आणि–आणि–जमलं तर पेय पाहिजे. "

" जमलं तर काय, जमलंच आहे तुमचं ! " मीं म्हटलं आणि पेयाबरोबर खाद्याचीहि व्यवस्था करून कांहीं वेळ गप्पा मारल्या आणि आशीर्वादपूर्वक तिला निरोप दिला.

• • •

१२

संदेश

मी कांहीं बडा साहित्यिक नाहीं हें तुम्हांला ठाऊक आहे. पण लेकाचे साहित्यिक संमेलनं भरवितात आणि वर्तमानपत्रांत त्यांचा मोठा गाजावाजा होतो. 'संमेलनाचा संदेश' म्हणून संमेलनानंतर व्याख्यानं होतात आणि आमच्या ओरिएन्टल कॉन्फरन्सचा कोणाला पत्ताहि नसतो ! यांचं हें संमेलन म्हणजे काय प्रकरण आहे हें पाहावं म्हणून (आणि खरं बोलायचं म्हणजे तिकडचा प्रांत पाहावा म्हणून) मी एका संमेलनाला गेलों आणि प्रतिनिधींच्या निवासांतच उतरलों. अध्यक्षीय भाषणाच्या कार्यक्रमासाठीं जाण्याकरितां उपरणं, पगडी, वगैरे खोगीर चढवून अर्धा तास आधीं आमची स्वारी तयार झाली. आमच्या कंपूंतल्या आमच्यासारख्या मित्रमंडळीला 'तयारी करा ! उठा, उठा' म्हणून आग्रह करीत होतों, इतक्यांत शाळेंतलीं आठ-दहा मुलं कोणी लांबोडं स्वाक्षरीपुस्तक घेऊन आणि कोणी कागदाचीं चिठोरीं घेऊन माझ्याकडे आलीं आणि 'स्वाक्षरी' द्या म्हणूं लागलीं. 'संदेश पण पाहिजे.' एक-दोघे म्हणाले. मीं म्हटलं, 'मी मोठा साहित्यिक नाहीं, माझी पगडी पाहून फसलेले दिसतां तुम्ही.' 'तुम्ही संस्कृतचे मोठे प्राध्यापक आहांत. आम्हांला ठाऊक आहे.' असं एकानं म्हटलं तेव्हां आमची स्वारी मनांत खूष झाली आणि बोलण्याच्या रंगांत आली. मीं त्या मुलाला म्हटलं, 'मी संदेश कधीं देत नाहीं. संदेश देण्याच्या मी विरुद्ध आहें आणि दुसरं असं कीं 'माझीं पुस्तकं आणि मोठे प्रबंध वाचून जर कोणाला कांहीं 'संदेश' मिळाला नसला तर एका वाक्यांत मी कसा संदेश देऊं ? आणि एका व्याख्यानांत तरी कसा देणार ?' तरी तीं मुलं म्हणूं लागलीं कीं 'कांहीं तरी संदेश द्याच. काय आणि कसा तें आम्ही काय सांगणार ?' मीं म्हटलं, 'संदेश दिला असता; पण संदेश म्हणजे काय, कोणीं द्यायचा, याचा तुम्हीं विचार केला आहेत का ?'

तीं म्हणालीं, 'नाहीं; पण तुम्ही कांहीं तरी दिलाच पाहिजे.' 'बरं आहे तर मग' असं म्हणून एकाच्या हातांतलं चिठोरं घेतलं मीं आणि '**शाईनं लिहूं नका, रक्तानं लिहा**' असा संदेश लिहिला आणि दुसऱ्याचं एक चिठोरं घेऊन '**हिंसा-वृत्ति सोडा, सूत कांता आणि प्रेमसूत्रानें जग हाराप्रमाणें ग्रथित करा**' असा संदेश लिहिला. त्या दोघांना आनंद झालेला दिसला. इतरहि संदेश मागूं लागले. तेव्हां त्या पहिल्या दोघांना विचारलं 'काय रे, या वाक्यांचा अर्थ काय ? शब्दार्थ कळला असेल, भावार्थहि समजला असेल, पण तो तुम्हांस पटला आहे का ? पाहा वाचून. हे दोन्ही संदेश एकच मनुष्य लिहीत आहे. यांत कांहीं विसंगति तुम्हांला दिसत नाहीं ? आणि एकच संदेश दिला असता, तरी तो देण्याची माझी पात्रता काय, तो घेण्याचा आपला अधिकार काय, याचा विचार करायला नको का ? '

ते मुलगे माझी व्याख्यानबाजी ऐकून दबकले. त्यांना कांहीं उत्तर देतां येईना. ते घुटमळत राहिले, तेव्हां त्यांच्या साहाय्यार्थ आमच्या खोलींत राहण्याला आलेले एक साहित्यिक कृष्णाप्रमाणें धावले आणि म्हणाले, 'अहो, त्यांना व्याख्यान कशाला देतां उगीच ? संदेश मागण्यांत काय चूक आहे, आपण नाहीं का संमेलनाध्यक्षांकडून संदेशाची अपेक्षा करीत ? "

"तोच तर माझा प्रश्न आहे." मी वादाच्या भरांत येऊन उत्तर देऊं लागलों. "अध्यक्षांनीं इतकीं पुस्तकं लिहिलीं, इतके प्रबंध लिहिले, इतकीं व्याख्यानं दिलीं, त्यांत जो संदेश असेल त्याव्यतिरिक्त ते आतां एकदोन तासांत काय सांगणार ? आणि खरं म्हणजे त्यांच्या इतक्या वर्षांच्या लिखाणांत आणि जीवनांत कांहीं संदेश मिळाला नसला, तर आतांच्या दोन तासांच्या भाषणांत काय सांपडणार आहे ? "

"वादाकरितां वाद करीत आहांत तुम्ही." तो साहित्यिक म्हणाला आणि कपडे चढवूं लागला. मुलं बिचारीं आमचा वाद मौजेनं ऐकत होतीं. मला साहित्यिकांच्या संगतीमुळें म्हणा किंवा जन्म-स्वभावामुळें म्हणा, भलत्याच वेळीं भलत्याच ठिकाणीं वाद करण्याची 'स्फूर्ति' झाली आणि मीं तावातावानं म्हटलं, 'अहो, अध्यक्षांच्या लेखनांत तुम्हांला कांहीं मननीय, आदरणीय, आढळलं म्हणूनच ना त्याला तुम्हीं अध्यक्ष केलंत? इतक्या पुस्तकांत आणि इतक्या वर्षांच्या जीवनांत त्याला जर कांहीं सांगतां आलं नसेल तर तो एका

व्याख्यानांत कसा सांगणार ? माझं तर मत असं आहे कीं, विशिष्ट संदेशाची अपेक्षा करणं वेडेपणाचं आहे. लेखकाचा खरा संदेश त्याच्या जीवनांत असतो, त्याच्या पुस्तकांत प्रतिबिंबित झालेल्या त्याच्या मनांत असतो. त्याचीं विशिष्ट मतं मला मान्य नसतील, पण मला त्याचं मन कदाचित् आदरणीय वाटेल. लेखकाचे विचार बरोबर असतील किंवा चूक असतील; त्या विचारांत त्याचा खरा संदेश नाहीं, तर त्याच्या विचार करण्याच्या पद्धतींत, त्या विचारांना आधारभूत असलेल्या आणि त्यांना प्रेरणा देणाऱ्या त्याच्या वृत्तींत त्याचा खरा संदेश गर्भित असतो. मॅक्स मुल्लरच्या उपपत्ति तज्ज्ञांना आतां संशयास्पद वाटत असतील, पण त्याची ४० वर्षांची अखंड ज्ञानपिपासेची तपश्चर्या हा त्याच्या जीवनाचा अलिखित संदेश कोण विसरेल ? टिळकांची उत्तरध्रुवावरील आर्यांच्या वसतिस्थानाबद्दलची उपपत्ति कदाचित् चूक ठरेल, पण फावल्या वेळांत विद्याव्यासंग चालू ठेवावा हा त्यांचा कधीं न दिलेला संदेश कायम टिकेल. त्यांचीं राजकीय धोरणं बरोबर होतीं का चूक होतीं हें भविष्यकाळ ठरवील; पण आपल्या ध्येयासाठीं तुरुंगासारख्या आपत्तींना धैर्यानं तोंड द्यावं हा त्यांच्या जीवनांतला गर्भित संदेश हाच त्यांचा खरा संदेश आणि तो मात्र नित्य सत्य ठरेल. असले संदेश कोणी देत नाहींत, पण ते घेतां येतात. कोणी सांगत नाहीं, पण समजतात. " माझं व्याख्यान मीं पुढं चालू ठेवलं असतं, पण इथें ' टाळ्या द्या, टाळ्या द्या ' असं ओरडून तेथल्या मंडळींनीं टाळ्यांचा गजर केला. तो गिल्ला थांबल्यावर एक साहित्यिक म्हणाला, " अहो, हाच संदेश झाला कीं ! हाच द्या ना लिहून ! " ' खरंच हा लिहून द्या ' असं मुलं म्हणूं लागलीं. पण त्यांना दाद दिली नाहीं. तीं जरा दूर गेल्यावर एकमेकांकडे पाहून हसूं लागलीं हें मला दिसलं आणि तें पाहून मला बरं वाटलं ! मुलं गेल्यावर एक मार्मिक पण खवचट साहित्यिक मला चिडविण्याकरितां म्हणाला, " अहो, नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां तुम्हीं आतां संदेश सांगितलाच कीं ! " मीं उत्तर दिलं, " सांगितला असेल कदाचित्, पण " Consistency is the virtue of asses. "

• • •

१३

कोणीं जिंकलें ?

" काय हो धोंडोपंत, " मी (संपादक) एक दिवस म्हणालों, " कांहीं कम्युनिस्टांची आणि तुमची आगगाडींत गांठ पडली होती आणि त्यांनीं तुम्हांला वादांत तीन-चारदां जिंकलं म्हणतात तें खरं का ? खरं असलं तर आश्चर्य आहे ! तुम्हीं जिंकलं जाणं म्हणजे,–म्हणजे काय उपमा देऊं बरं–? "

" उपमा कांहीं देऊं नका, " माधवराव म्हणाले. " कारण धोंडोपंत नेहमींच चुकतात आणि नेहमींच चुकल्याची कबुली देतात ! धोंडोपंत म्हणजे कांहीं एकादी पत्नी नव्हे,–उदाहरणार्थ, ही विमल नव्हे कीं तिनं नेहमीं चूक करावी आणि नेहमीं ती दुसऱ्याची म्हणून सांगत सुटावं ! "

" लग्न करण्यांत माझी चूक झाली, कबूल करत्यें ना मी ! आतां काय उपयोग ? " विमल म्हणाली.

" माधवराव, चांगले सांपडलेत बरं; ' स्त्रीणामशिक्षितपटुत्वम् ' म्हणतात तें असं असतं ! तुमची पतिपत्नींची ही उत्तरा-उत्तरी नेहमींचीच आहे. ती ऐकण्यापेक्षां धोंडोपंतांची हकीकत ऐकूंया. आगगाडींतल्या त्या प्रसंगीं आणखी एक आश्चर्य झालं म्हणे ! आपली कमल साने आहे ना–कम्युनिस्ट झाली आहे ती ? तिचं त्या वादाच्या वेळींच लग्न ठरलं म्हणे ! "

" हें कांहींच आश्चर्य नाहीं. " विमल म्हणाली. " आश्चर्य असं कीं, एवढी ज्वलज्जहाल कम्युनिस्ट ती, तिनं कम्युनिस्टांचं म्हणणं चूक, धोंडोपंतांचंच म्हणणं बरोबर, हें कबूल केलं ! आणि तिचं लग्न आगगाडींत ठरविण्याच्या बाबतींत धोंडोपंतांनीं कांहीं मुत्सद्देगिरी लढविली म्हणतात, ती काय तें ऐकलं पाहिजे यांच्या तोंडून. तुम्हीं हें लग्न जुळवून दिलंत हें खरं का, धोंडोपंत ? "

" झालं तुमचं सगळ्यांचं बोलणं ? आतां ऐका खरं काय तें. " धोंडोपंत बोलूं लागले. " तुमचं सगळ्यांचं म्हणणं थोडंसं खरं आणि थोडंसं खोटं आहे.

तिनं लग्न ठरवलं, का त्यानं, का मीं, का निसर्गानं, मला हें कांहीं सांगतां येणार नाहीं. तसंच वादांत मीं जिंकलं का त्यांनीं, का न्यायानं आणि सत्यानं, का सगळ्यांनींच जिंकलं आणि सगळेच जिंकले गेलों हें मी कोण ठरविणार? तुमचं तुम्ही ठरवा. मी आपला झाली ती हकीकत सांगतों. योगायोग असा कीं बोरीबंदरवर बसून मी पुण्यास येत होतों. तेव्हां त्याच डब्यामधें कम्युनिस्टांचं एक टोळकं दादरला आंत घुसलं. "

" त्यांचं म्हणे ' टोळकं, ' आणि तुमच्यासारखे लोक असले म्हणजे ' मंडळ ! ' चांगलं आहे ! " विमल उद्गारली.

" तसं नाहीं. " धोंडोपंत म्हणाले. " त्यांचा जो एकसारखा किलकिलाट, बडबडाट आणि गडगडाट चाललेला होता त्याला उद्देशून मीं ' टोळकं ' म्हटलं, बाकी दुसरा भावार्थ नव्हता माझा. त्या टोळक्यांत—नाहीं तर ' मंडळां 'त म्हणूं या—कमल साने, सर्वोत्तम फणसे—याच्याशींच तिचं पुढं लग्न जमलं—जनार्दन काळे, गोपाळ फडणीस, अथणीकर, सोलापूरकर वगैरे भाई मंडळी होती. डब्यांत बायका, मुलं, पुरुष वगैरे इतर प्रवासी होते, परंतु भाई लोकांनीं तो डबा जणूं कांहीं आपलाच केला होता आणि इतर लोकांनीं त्यांना तो करूं दिला होता. दोन-तीन बाया आमच्या कंपार्टमेंटमध्यें आपल्या लहानग्यांना घेऊन बसल्या होत्या; त्या बिचाऱ्या भाई लोकांच्या गलग्याला भिऊन म्हणा किंवा या मंडळांत आपण शोभत नाहीं असं वाटून म्हणा, आपण होऊन शेजारच्या कंपार्टमेंटमध्यें गेल्या. कमल सानेची व या भाई लोकांची पूर्वीची ओळख होती आणि आमचीं मतं, वृत्ति, व्यवसाय वगैरेमध्यें त्यांचं आमचं ऐक्य नसलं तरी एकमेकांबद्दल थोडंसं प्रेम आणि थोडा आदर होता. या भाई लोकांना वादाची मोठी खुमखुमी आणि मलाहि कमी नाहीं. तेव्हां बोलण्याच्या ओघांत वादावादी सुरू झालीच. ' तुमचे हेतु चांगले आहेत, ध्येयं चांगलीं आहेत, पण तुमच्या विचारसरणींत कांहीं दोष असण्याचा संभव आहे, आणि दोष नसला तरी आपला समाज अजून तयार नाहीं, पण जरा धीरे धीरे-दमादमानं घ्या ' अशा आशयाचं माझं बोलणं होतं. पण एकेकटा असता तरी तो माझ्यावर तुटून पडला असता; मग बहुसंख्य असल्यावर काय विचारतां ! ' अर्धवट, ' ' भित्रे, ' ' कमकुवत ' इत्यादि विशेषणंच काय, इतरहि अधिक कठोर विशेषणं मला बहाल करण्यांत आलीं ! ' समाजांतले हे अन्याय तुम्हांला

पाहवतात कसे ? चीड कशी येत नाहीं ? ' असे प्रश्न मला सर्वोत्तम फणसे जोराजोरानं विचारूं लागला. मी उत्तर देत असें कीं, जगांत विषमता, अन्याय, गरिबांची छळणूक-पिळणूक वगैरे गोष्टी तुम्ही म्हणतां त्या खऱ्या आहेत; पण नुसतं रागावून-जाजावून, रुसून-चिडून, भावनेच्या भरांत भलत्या गोष्टी करून कसं चालेल ? विचाराला पटतील तेच उपाय योजले पाहिजेत आणि जिथें उपाय नसतील त्या गोष्टींबद्दल शक्य तितकी सहनशीलता दाखवून ' **तांस्तितिक्षस्व भारत** ' या गीतेंतील न्यायानं वागलं पाहिजे. "

" जाळा तुमची ती गीता ' **तांस्तितिक्षस्व भारत** ' शिकविणारी. " भाई फणसे उद्‌गारला. भाई अथणीकरानं दुसरीकडून माझ्यावर मारा केला. " **ततो युद्धाय युज्यस्व** " हा गीतेचा खरा उपदेश आहे, ' तांस्तितिक्षस्व ' हा नाहीं, " तो ओरडला. मी यावर उत्तर देणार इतक्यांत माझ्या अंगावर वरून कसले तरी थेंब पडूं लागले, म्हणून वर बर्थकडे पाहूं लागलों, तेव्हां बर्थवरील फळचांमधून एक कप पालथा पडलेला दिसला. त्यांतून गळणाऱ्या दुधाच्या धारांनीं अभिषेक करून मला दुग्धस्नान घातलं ! चिडून जाऊन मीं चार शिव्या हवेंत फेंकून दिल्या, पण लगेच '**तांस्तितिक्षस्व भारत**' या वचनाची मला आठवण झाली आणि राग गिळून वेदान्त्याप्रमाणें मी स्वस्थ बसलों आणि मग सगळं हसण्यावारी नेण्याकरितां (प्रथम कृत्रिमतेनं आणि नंतर विचारामुळें शांत-चित्त झाल्यामुळें खरोखरच) मी हसूं लागलों आणि इतरांच्या हास्यांत मनापासून सामील झालों. हसणं ओसरल्यावर भाई अथणीकर कोणाचा कप होता, कोणत्या बाईनं तिथें मूर्खपणा करून ठेवला, वगैरे तावातावानं बोलूं लागला. सर्वोत्तम फणसे यानंहि साथ दिली. पण डब्यांतली कोणतीहि बाई आपण कप तिथं ठेवल्याचं कबूल करीना. कोणत्या बाईचा तो कप होता हें मला ठाऊक होतं, पण आधींच ती बाई तो प्रकार पाहून थिजली होती; अगदीं अर्धमेली झाली होती. तेव्हां ' मेलेल्याला मारण्यांत अर्थ काय ?' असा पोक्त आणि शिष्टपणाचा विचार करून मी स्वस्थ बसलों होतों. कमल साने हिनं माझी मनःस्थिति ओळखली होती, तेव्हां ती हळूच सर्वोत्तम फणशाच्या कानाशीं लागून ' यांना कोणाचा कप आहे हें ठाऊक आहे, पण ते बोलत नाहींत,' असं कांहीं तरी पुटपुटली. पण सर्वोत्तमनं तें ऐकलं न ऐकलं असं केलं आणि तो म्हणाला, " तुमच्यासारख्यांच्या मिळमिळीत, गुळ-

मुळीत, गुळगुळीत, गोडगोड स्वभावानं तर हिंदुस्थानची घाण केलेली आहे. या वृत्तीमुळेंच इंग्रज लोक तुम्हां मऊमऊ लोकांच्या हिंदुस्थानाला कोपरानं खणीत आहेत आणि याच वृत्तीमुळें धनोन्मत्त भांडवलवाले मऊ, पडखाऊ कारकुनांना आणि मजुरांना अर्धपोटीं ठेवून आपल्या पोटांचीं ढेरं वाढवीत आहेत."

कमल सानेचं सर्वोत्तमवरती प्रेम होतं तरी तिनं माझी बाजू घेतली आणि म्हणाली, "असल्या किरकोळ ठिकाणीं हीं मोठीं तत्त्वं कशाला आणायचीं ? धोंडोपंतांचंच बरोबर आहे. बर्थवर दुधाचा कप ठेवणाऱ्या बाईला बोलून फायदा काय होणार आहे ? धोंडोपंतांचा कोट बिघडला तो तुमच्या बोलण्यानं स्वच्छ का होणार आहे ? ती आधींच ओशाळली आहे, तिला आणखी ओशाळवण्यांत भूषण काय ? "

" तुमचं बायकी तत्त्वज्ञान हें असंच ; " सर्वोत्तम उसळून म्हणाला. " तुम्हांला तत्त्वनिष्ठेपेक्षां व्यक्तिभावना अधिक वाटते. जिथें चूक असेल तिथें चूक म्हटलीच पाहिजे ; जिथें अन्याय असेल तिथें अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. तुमच्या गोडगोड, गुळमुळीत वृत्तीमुळेंच जबरदस्त लोकांची दंडेली चालते. भीड आणि भ्याडपणा यांच्या पोटींच जुलूम-जबरदस्ती जन्माला येतात. लहान बाळ असलेली बाई झाली म्हणून काय झालं ? तिला दूध बरोबर न्यायचं होतं तर बाटली घेतां येत नव्हती ? आणि वर फळचांवर कप ठेवला तर दूध सांडेल एवढं समजण्याची अक्कल नव्हती तिला ? "

सर्वोत्तमचं हें सडेतोड वक्तृत्व त्या बाईच्या कानीं पडत नाहीं, ती दुसऱ्या बायांशीं बाळंतपणाच्या गोष्टी बोलण्यांत गुंग झाली आहे, असं मला दिसलं तेव्हां जरा बरं वाटलं आणि हा विषय बदलावा म्हणून आणि सर्वोत्तमच्या बोलण्यांत तथ्यांश आहे हें पटून मीं म्हटलं, " फणसे, तुमचं म्हणणं खरं आहे. नरमपणाच्या आपल्या हिंदी लोकांच्या वृत्तीमुळें लोक शेफारतात आणि भलताच फायदा घेतात. आपल्या हक्कांची जाणीव आपल्यामध्यें कमीच हें खरं आहे आणि त्यामुळेंच आपण चिरडले-भरडले जात आहोंत हेंहि खरं आहे. गुळमुळीतपणा गोड दिसतो ; पण व्यवहारांत तो फोल आहे. सडेतोडपणा वाटतो कडू, पण त्याचीं फळं गोड असतात. हें सगळं आमच्यासारख्यांना समजतं, पण स्वभाव एकदम कसा बदलणार ! "

' बदल ' शब्द ऐकल्याबरोबर अथणीकर एकदम म्हणाला, " सगळं जगच

बदलतं आहे. 'बदल' हाच जगाचा न्याय आहे. स्वभाव कां बदलणार नाहीं ? जगांत स्थिर असं कांहीं नाहीं; धर्म, नीति, समाज, स्वभाव, सगळं कांहीं बदलत आहे. 'बदलत नाहीं' ही समजूतच मुळीं चूक आहे. जग गतिमान् आहे. 'इष्ट तो बदल करूं' अशी वृत्ति फैलावल्याशिवाय आपला समाज सुधारावयाचा नाहीं. आपलं तत्त्वज्ञान Dynamic–गतिशील–असलं पाहिजे."

'बदल' या एका शब्दावरून झालेलं अथणीकराचं हें व्याख्यान ऐकून मी मनांत हसलों, पण दूध सांडण्याच्या अपराधाची अधिक चिकित्सा केल्यानं त्या बाईला फार वाईट वाटेल असा विचार मनांत येऊन अथणीकरानं आपल्या आवडत्या तत्त्वाच्या फाजील उत्साहांत केलेलं विषयान्तर माझ्या पथ्यावरच पडलं आणि मीं (वादाची खुमखुमी म्हणूनहि थोडंसं !) वाद मुद्दाम थोडासा रंगांत आणण्याकरितां उलट म्हटलं : "सगळं गतिमान् आहे असं म्हणतां, पण मी तर इथें स्थिर बसलेला आहें; तुम्ही स्थिर आहांत; ही कमल साने स्थिर आहे; हे सर्वोत्तम फणसे–"

"मी 'स्थिर' कशी ? " कमल साने मध्येंच उद्गारली. "बायका चंचल असतात असं तुम्ही पुरुषांनीं ठरवून टाकलं आहे ना ?"

[तिचा तो विनोदी टोमणा मला आवडला, पण तें मनांत ठेवून कोटीला कोटि म्हणून उत्तर दिलं कीं, "बायका चंचल असतात हें तत्त्व आम्हीं ठरवून आतां 'टाकून' दिलं आहे ! तें टाकलेलं तत्त्व आतां पुनः कशाला उकरून काढतां ? "]

"शाब्दिक कोट्या करून एखादी लघुकथा सजवतां येईल, वाद जिंकतां नाहीं यायचा." सर्वोत्तम म्हणाला. "नीति-नियम स्थिर, नित्य आहेत का ? मनुष्यस्वभाव कधीं बदलायचा नाहीं का ? हे आपले प्रश्न आहेत. आम्ही म्हणतों या सर्वांत बदल होईल. तुम्हांला नीतिनियम नित्य–'सनातन'–वाटतात, आम्हांला वाटत नाहींत; तुम्हांला मनुष्यस्वभावांतला 'लोभ' कमी होईल असं वाटत नाहीं; आम्हांला कमी होईल असं वाटतं. तुम्हांला वाटतं कीं खाजगी मालमत्ता नसली तर मनुष्य कामच करणार नाहीं; आम्हांला असं वाटत नाहीं."

"न वाटण्याला कारणं काय ? " मीं विचारलं. Instincts–सहजप्रेरणा बदलतील असं वाटतं तुम्हांला ?"

"हो," सर्वोत्तम म्हणाला. "सहजप्रेरणांना वाव मिळाला नाहीं–अनेक पिढ्या वाव मिळाला नाहीं–तर त्या कमजोर होतात असं कांहीं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे."

"उपार्जित गुण (Acquired characters) अपत्यांमध्यें संक्रान्त होतात यास भक्कम पुरावा नाहीं," मीं हळूच म्हटलं.

"नसेल;" सर्वोत्तमानं उत्तर दिलं. "सहजप्रेरणा कमजोर होत नाहींत असं गृहीत धरलं तरी काय? समाजरचना अशीच केली कीं लोभाला–द्रव्यार्जनाला–बेताचाच वाव मिळेल, तर धनलोभ असून काय करणार? Environment – परिस्थिति–अनुकूल नसेल तर सहजप्रेरणेला गप्प बसावं लागतं; या दृष्टीनं तरी समाजरचनेवर सहजप्रेरणांचं कार्य अवलंबून आहे, हें मान्य केलंच पाहिजे ना?"

"हां, हें मान्य केलं पाहिजे." मीं प्रांजलपणें कबूल केलं तेव्हां सगळ्या भाई लोकांनीं 'जितम्, जितम्' असा विजयोन्मादानं, पण प्रेमभरानंच, हलकल्लोळ केला. तो शान्त झाल्यावर कमल साने हिनं माझी बाजू घेतली आणि म्हटलं कीं, "धोंडोपंतांनीं जरी पराभव मान्य केला असला तरी त्यांनींच जिंकलं आहे; कारण सहजप्रेरणांना वाव देणार नाहीं, त्यांना सुप्त करूं शकेल, अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याला इतकीं शतकं लागतील कीं तीं स्वप्नसृष्टींतलींच आहे असं म्हटलं पाहिजे."

यावर उत्तर देण्यास कांहीं मंडळी सरसावली. पण इतक्यांत कर्जत स्टेशन आलं आणि पाय मोकळे करण्याकरितां कमल साने प्लॅटफॉर्मवर उतरली आणि वाद तिथेंच थांबला. तेव्हां मीहि प्लॅटफॉर्मवर उतरून कमल साने हिला एकीकडे घेऊन ओवाओघानं म्हटलं, "एक प्रश्न विचारूं का?"

"हो, काय हरकत आहे? पण प्रश्न विचारण्यापूर्वीच मी उत्तर देत्यें. सर्वोत्तम फणसे यांच्यांशीं माझं लग्न जुळलं आहे, अशी वार्ता आहे ती खोटी आहे. आमचं दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे, पण लग्नाची गोष्ट आपण होऊन काढायची नाहीं असं मीं मनाशीं ठरवलं आहे; त्यांच्यासारख्या बुद्धिमान्, तेजस्वी, स्वार्थत्यागी मनुष्याच्या पायांत लग्नाची बेडी घालावी का नाहीं हा मला पेंचप्रसंग पडला आहे. आतां त्यांनींच जर विचारलं आणि गळ घातली तर गोष्ट निराळी."

"ते असंच म्हणत असतील !' कमलनं जर गोष्ट काढली तर लग्न करूं, नाहीं तर आपण होऊन मी कांहीं गोष्ट काढणार नाहीं ' असं ते मनांत म्हणत असतील ! तुमच्यांत अधिक काळ कोण दम काढतो आणि जिंकतो हाच माझ्या-पुढें प्रश्न आहे ! "

गार्डानं शिटी फुंकल्यावर आम्ही दोघं डब्यांत शिरलों, तेव्हां ' तिकडे जाऊन स्पेशल चहा प्यायलेले दिसताहेत ' अशी मंडळीनं चेष्टा चालविली. तेव्हां ' तुम्हांलाहि चहा देतों लोणावळ्याला ' असं म्हणून ओठांवर आलेलं हसूं मीं दाबलं. गोष्टीवरून गोष्ट निघतां निघतां आजची रात्र सगळ्यांनीं गप्पागोष्टींत आणि वादविवादांत घालवायची अशी योजना सुचवली गेली. तेव्हां मीं म्हटलं, " सगळेजण भांबुडर्चाला उतरूंया आणि माझ्याकडेच कार्यक्रम होऊं द्या. " त्यांनीं गांवांत आपल्या बिऱ्हाडीं उतरण्याचा आग्रह धरला. ' वादांत थोडासा आग्रह सोडला असला तरी या बाबतींत मी आग्रह सोडणार नाहीं, ' असं मीं जोरानं म्हटल्यावर त्या सगळ्यांचा मिळून प्रतिध्वनि आला कीं, ' आग्रह सोडायला लावणार. ' ' पाहूं या ' मीं म्हटलं. ' बरं आहे, तुमचा आग्रह चालला तर तुमचा आग्रह चालेल. त्यांतहि कांहीं वाईट नाहीं. ' अथणीकर म्हणाला. मग पुनः दुसऱ्या गप्पा सुरू झाल्या. बोलतां बोलतां कला आणि जीवनाचा प्रश्न निघालाच; तेव्हां मीं एका सुप्रसिद्ध कम्युनिस्ट पुढाऱ्याच्या भाषणाचा उल्लेख करून म्हटलं कीं, " या कम्युनिस्टाचा असा आग्रह कां कीं गोकाकच्या धबधब्याचीं निरनिराळ्या वेळचीं आणि दृष्टि-कोनांतलीं चित्रं काढण्याचं सोडून संपावर गेलेल्या गोकाकच्या गिरणींतल्या मजुरांचे, बायकामुलांचे कसे हाल होत आहेत याचीं चित्रं काढावींत ? चित्र-काराला ज्याबद्दल हौस असेल, त्याला जें सौंदर्य दिसेल, त्याला जशी स्फूर्ति होईल, तसं त्यानं चित्र काढावं. गिरणींतल्या बायकामुलांचे हाल होत असतील, पण मजुरांची त्या चित्रकाराला माहिती नसेल, त्याला तुमच्या मार्क्स-वादा-बद्दल, संपाबद्दल, मजुरांच्या छळणुकीबद्दल आणि पिळणुकीबद्दल कांहीं विशेष वाटत नसेल, तर तुमचा भलता आग्रह त्यानं कां मान्य करावा ? असा आग्रह म्हणजे त्याच्यावर एक जुलूमच होईल आणि त्यांत कलेचाहि फायदा होणार नाहीं आणि संपवाल्यांचाहि फायदा होणार नाहीं. त्याला आपल्या चित्रांपासून

कलात्मक आनंद मिळावयाचा तो मात्र गमावून बसेल. त्याचं स्वतःचं जीवन म्हणून आहे का नाहीं ?"

"नाहीं, समाजाव्यतिरिक्त व्यक्तीला स्वतंत्र जीवन नाहीं. समाजाकरितां व्यक्तीनं आपलं सर्वस्व अर्पण केलं पाहिजे. विशेषेंकरून सध्यांच्या परिस्थितींत घराला आग लागली असतां चित्रकारानं चित्र काढीत बसूं नये, तर घागरी-बकेटं घेऊन आग विझवायला धावावं. कवीनं प्रेमलीलांचीं विलासी पदं गुणगुणत बसण्यापेक्षां 'धावा, आग लागली आहे, सर्वजण सांपडेल तें भांडं घेऊन आग विझवण्यास धावा!' असं ओरडून सांगितलं पाहिजे. आग विझवून झाल्यावर चित्रकारांनीं आणि कवींनीं पाहिजे तें करावं, पण आग चालू आहे तोंपर्यंत त्यांचं सगळं सामर्थ्य, त्यांचं सर्व जीवन, आग विझविण्याच्या कामीं खर्च झालं पाहिजे."

"अशा अपवादात्मक स्थितींत तुमचं म्हणणं थोडंसं बरोबर आहे, पण—"

"पण कसलं आहे ? सरळ सरळ आपलं मत चुकलं आहे हें कबूल करा ना ?"

"थांबा, थांबा" मीं म्हटलं, पण माझं ऐकतो कोण ? अखेर कमल साने हिनं पुनः माझी बाजू घेतली. "अपवादात्मक परिस्थितींत धोंडोपंतांनीं तुमचं म्हणणं मान्य केलं आहे. सध्यांची परिस्थिति घराला आग लागल्या-सारखी आहे का, हें तुम्हीं अद्यापि सिद्ध केलेलं नाहीं." इत्यादि गोष्टी सांगण्याचा तिनं प्रयत्न केला. तिचं म्हणणं मंडळीनं ऐकून घेतलं, आणि कांहींनीं तें पटल्याचंहि माना डोलावून दर्शविलं. तेव्हां अखेर मीं जिंकली असं मला वाटलं, पण माझ्या कबुलीजबाबामुळें माझी बाजू बरीच लंगडी झाली होती हें प्रांजलपणें मला कबूल करावं लागलं !

इतक्यांत लोणावळं जवळ आलं तेव्हां चहा आणायला सांगतों म्हणून सर्वोत्तम फणसे उठला आणि मीहि त्याच्या पाठोपाठ गेलों. चहा वगैरे सांगून झाल्यावर फणश्याला मीं साभिप्राय अभिनय करून म्हटलं, "हा माझा चहा झाला, पण तुमचे लाडू केव्हां होणार ?"

"कसले लाडू ? लोक कांहीं तरी उठवतात आणि तुमच्यासारखे लोक विश्वास ठेवतात !"

"अडचण तुमच्याकडून आहे का तिच्याकडून ?" मीं विचारलं.

"त्याचं असं आहे," फणसे म्हणाला, "माझीं मतं, माझी वर्तमान स्थिति,

माझं आयुष्य, माझं भविष्य, हें सर्व तुम्हांला ठाऊक आहे. माझ्यासारख्यांनीं एखाद्या मुलीला संकटांत कां घालावी ? आमचा एक पाय घरांत आणि एक पाय तुरुंगांत अशी अवस्था. एक दिवस खरे चुरमुरे फांकीत आम्ही बसणार, तर दुसऱ्या दिवशीं तेहि मिळायचे नाहींत, मनांत चुरमुरे खात बसावं लागायचं ! मी कशाला कोणाला माझ्याबरोबर आगींत उडी घालायला सांगूं ?"

" पण, एखादीला (म्हणजे तुम्हांला ठाऊक आहे तिला) आग विझवावी अशी इच्छा असली (आणि आग लागली असली म्हणजे प्रत्येकानं ती विझवण्याला धावलं पाहिजे असं तुमचं मतच आहे), समजा, तिला वाटलं कीं, तुमच्याशीं लग्न करण्यांत तिचं आणि तुमचं दोघांचंहि हित आहे, तर तुमची कांहीं हरकत आहे का ? "

" माझी काय हरकत असणार ? मला तर आनंदच आहे ! पण माझ्याबरोबर आगींत उडी घें, असं मी कसा सांगूं कोणाला ? "

" तुमचंहि बरोबर आहे " मीं म्हटलं आणि आम्ही दोघे मंडळींत येऊन बसलों. लगेच चहा-बिस्किटं वगैरे आलीं आणि इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. खडकी जवळ आली तेव्हां आपण भांबुर्ड्याला उतरावयाचं हं सगळ्यांनीं ? असं म्हणून त्यांना सामान आवरायला सांगूं लागलों.

' कांहीं घाई नको, सगळं करतों आम्ही. ' असं मला आश्वासन देऊन ती मंडळी स्वस्थच बसली. मीं म्हटलं, " आपला घाबरट स्वभाव, आपण आधींच्या स्टेशनापासून उगाच जिवाला काळजी लावून घेतों; ही मंडळी प्रवासांत तरबेज आहेत; हे कशाला घाबरतील ?" शिवाय भांबुर्ड्याला सगळ्यांनीं उतरायचं हा आग्रह त्यांनीं चालू दिला म्हणून मी खुषींत होतों, पण इतक्या सगळ्यांना ह्या स्टेशनावर टांगे मिळतील कीं नाहीं ही काळजीहि मनांत मधून मधून डोकावत होती. अखेर खडकीहून गाडी सुटली आणि मी कोट-टोपी चढवूं लागलों आणि स्वतःची ट्रंक आणि वळकटी पाहूं लागलों. ट्रंक सांपडली ती बाहेर काढून ठेवली, पण वळकटी कुठें दिसेना ! ' सांपडेल हो, जातेय कुठें ?' मंडळी म्हणूं लागली. "सगळचा गोष्टी स्थिर आहेत" अथणीकर हसून म्हणाला.

" पण आगगाडींत आगगाडीच्या गतीमुळें तिला गतिमत्व येतं ना ?" मीं उत्तर दिलं आणि काय नामी उत्तर दिलं अशा आशयानं पाहूं लागलों.

" आमचं हेंच म्हणणं आहे"—सर्वोत्तम फणसे म्हणाला, " आगगाडींतलीं माणसं आणि सामान स्थिर वाटतात, पण त्यांच्यामध्यें आगगाडीमुळें गति उत्पन्न झालेली असते. व्यक्तींचंहि तसंच आहे. कालाच्या ओवापुढें व्यक्तींचं कांहीं चालायचं नाहीं. कम्युनिझम् जगांत येणार; मग तुमच्यासारख्या व्यक्ति जागच्या जागीं स्थिर आहोंत असं म्हणोत कीं दुसरं कांहीं म्हणोत ! "

" कम्युनिझम् यायच्या आधीं भांबुर्डं आलं पाहा " असं म्हणून मी उतरण्याची घाई करूं लागलों. पण वळकटी सांपडेना आणि मंडळी मला इकडे तिकडे फिरकूं देईनात ! त्यांचा डाव माझ्या आतां ध्यानांत आला आणि ' अखेरी साधलीत खरी तुम्हीं ' अशी शरणचिठी त्यांना देऊन टाकून स्वस्थ बसलों. म्हणजे स्वस्थ बसलों असं दाखवलं, कारण गांवांत गेल्यावर अखेरीला बाजू कशी उलटवावी याचा कपटव्यूह रचण्याच्या विचाराला मी लागलों होतों !

पुणें स्टेशनवर उतरून गांवांत त्यांच्या बिऱ्हाडीं लगबगीनं जेवण उरकून घेऊन मी डेक्कन जिमखान्यावर येण्यास सज्ज झालों, तों रात्रीं ९–९। वाजले. तेव्हां मीं म्हटलं, " सामान इथेंच राहूं द्या. मी चालत जातों; तुम्हीं मला पोंचवायला आलं पाहिजे. " आणि ते मनाचे चांगले असल्यामुळें उघडेबोडके, हातांत काठ्या घेऊन माझ्याबरोबर फिरत फिरत माझ्या बिऱ्हाडापर्यंत आले ! सर्वोत्तमनं मला वाटेंत जरा एकीकडे घेऊन " ठरलं बरं का, लवकरच लाडू देणार ! " असं कानांत सांगितलं, तेव्हां मला मोठा आनंद झाला.

बिऱ्हाडीं आल्यावर मंडळींना खोलींत बसवून पाण्याचे तांबे, भांडीं दिल्यावर घरांत जातों तों कमल सानेहि मला म्हणाली, " सांगितलं असेलच त्यांनीं बहुधा तुम्हांला ? "

" काय बुवा ? कांहीं नाहीं सांगितलं ! " असं मीं तोंडानं म्हटलं, पण तोंडावरच्या स्मितानं चुगलखोरी केली. तेव्हां मीं म्हटलं, " झालं हें सगळं ठीक झालं. पण पहिल्याप्रथम मागणी कुणीं केली ? अधिक दम कुणीं धरला ? अखेरी जिंकली कुणीं ? "

" तें गूढ आहे, आणि गूढच राहणार. " कमलनं उत्तर दिलं. मी कांहीं उत्तर देणार इतक्यांत बाहेरच्या मंडळींतहि ही बातमी जाऊन पोंचून ' अभिनंदन, अभिनंदन ' असे उद्‌गार रस्त्यावर ऐकूं जातील इतके मोठे कानांवर आदळूं लागले. अभिनंदनाचा वर्षाव ओसरल्यानंतर मीं मंडळींना म्हटलं,

"अखेर तुम्हांला माझ्या बिऱ्हाडीं आणलंच का नाहीं मीं ? अखेरीं जिंकली मींच ! ""

"हें कसलं जिंकणं ? " अथणीकर म्हणाला. "जिंकलं खरं सर्वोत्तम फणशानं ! "

"नाहीं , नाहीं, तसं नाहीं ; " भाई फडणीस आणि भाई काळे उद्‌गारले. "जिंकलं कमल सानेनं, सर्वोत्तमासारखा सर्वोत्तम हिरा..... "

"कोणी का जिंकीना ! आतां १० वाजायला आले आहेत, सिनेमाला जाऊं, येतां का ? " मीं म्हटलं. "आनंदाच्या या प्रसंगीं सिनेमा पाहिजेच. "

"डेक्कन टॉकीजमध्यें आज काय आहे ? " एकानं विचारलं. "Sweetness and Light " मीं उत्तर दिलं, "Sweetness and Light की जय ! " Sweetness and Light की जय ! " सगळेच ओरडले आणि अखेर Sweetness and Light नंच जिंकली !

• • •

१४

'विलक्षण तक्रारी'

एक दिवस आम्ही असेच गप्पा मारीत बसलों असतां धोंडोपंत म्हणाले, "एकेकाच्या विलक्षणच तक्रारी असतात. माझ्या अनुभवांतल्या--अनुभवांतल्या म्हणजे काय, आमच्या पतिपत्नींच्याच--विलक्षण तक्रारी होत्या. पण त्या मागून सांगतों. जगांतल्या कांहीं तक्रारी कशा चमत्कारिक असतात त्या आधीं पाहा. कोणी मूल नाहीं म्हणून रडतो, तर कोणी फार मुलं म्हणून रडतात. कारकून आपण कारकून म्हणून रडकं तोंड करून बसतात, तर बडे अधिकारी आपल्यावर जबाबदाऱ्यांचं फार ओझं म्हणून तक्रार करतात. परीक्षेंत मार्क कमी म्हणून कोणी परीक्षकावर पक्षपाताचा आरोप करतात तर एखादी अपवादात्मक व्यक्ति अशी निघते कीं 'मला अधिक मार्क कां दिलेत' असंच तक्रारीच्या सुरांत विचारते. (अशी ही अपवादात्मक व्यक्ति कोण तें तुम्हांला, मला वाटतं, मागें सांगितलंच आहे.) आपण जित म्हणून हताश झालेले आहोंत; शिकंदरनं जग जिंकलं तरीहि त्याची तक्रार होतीच--आतां जिंकण्याला कांहीं उरलं नाहीं म्हणून तो रडला म्हणतात! शीतल चंद्रिकेचं सुख देणाऱ्या चंद्राला कोणी नांवं ठेवावींत का? त्यालाहि पण नांवं ठेवणारे आहेत! 'तुझ्या या चंद्रिकेनं आमच्या अंगाची लाही होते' अशी ओरड प्रेम-विह्वल तरुण-तरुणी करतात! मौज अशी कीं, या तरुण-तरुणींनीं चंद्रप्रकाशांत अनेकदां एकमेकांच्या सहवासांत आनंदांत वेळ घालविलेला असतो; पण हे उपकार न स्मरतां चंद्राला शिव्या-शाप देण्याला ते तयार असतातच! अंगीं मोठेपणा असला तरी या मोठेपणाबद्दल मोठ्या लोकांची तक्रार असतेच. मोठेपणाचं त्यांना ओझं होतं! Penalty of greatness असे शब्द त्यांच्या तोंडीं मधून मधून येतात. सुजन लोक स्वतः बहुधा आपल्या सौजन्याबद्दल मूकवृत्ति स्वीकारतात! पण त्यांचे आप्तइष्ट 'अमके अमके हे काय, तर ते सुजनच' अशा उपहासगर्भ उद्गारांच्या द्वारें त्यांच्याबद्दलची

अप्रीति, किंवा रुष्टता व्यक्त करतात ! सौंदर्य तरी सगळ्यांना हवं असतं ना ? पण 'आपण कशाला सुंदर झालों ! ' असे शोकात्मक उद्‌गार कांहीं सुंदरी विशिष्ट प्रसंग आले असतां काढतातच ना ? अशी कोणती चांगली गोष्ट आहे कीं जी कांहीं लोकांना तरी जाचक आणि अप्रिय झाली नाहीं ? मला तरी एकसुद्धां दिसत नाहीं ! सौजन्य नकोसं होतं,—सुजनाला स्वतःला देखील आपल्या सौजन्याच्या मूल्याबद्दल आणि वास्तविक स्वरूपाबद्दल शंका येऊं लागते आणि त्याला वाटूं लागतं कीं, 'हें सौजन्य आतां पुरे झालं.' न्यायनिष्ठुरता आपणाला स्वीकारतां येत नाहीं, जरूर असलेला सडेतोडपणा आपणांमध्यें नाहीं, ही खरी गोष्ट असून आपल्या भ्याडपणाला आणि मनोदौर्बल्याला आपण 'कोमलपणा, उदारबुद्धि, समवृत्ति' वगैरे गोंडस नांवं देतों आणि स्वतःची फसवणूक करून घेतों. त्यामुळें कठोर कर्तव्यकर्म न करण्याचं पाप लागतं तें लागतंच आणि वर पुनः ज्याच्याकरितां आपण उदारबुद्धीनं कोमलपणा स्वीकारला तोच आपणावर उलटतो, आपण अंगीकारलेल्या मोठ्या जबाबदारीच्या कामांत विघ्नं आणतो, आणि अखेर वाईटपणा यायचा तो येतोच. पूर्वी एकटयाकडून आला असता, आतां सगळीकडून येतो, एवढाच फरक ! ' हें झालं सौजन्याचं. सौंदर्याची रड मवांशीं सांगितलीच. 'नको हें सौंदर्य ' असं किती तरी हतभागिनींनीं म्हटलं असेल ! विद्वत्व, पांडित्य, यांबद्दलहि असंतोष आहेच. ख-फ-छ-ठ असं आरटणाऱ्या व्याकरणाचा किंवा घट-पटादिकांची खटपट करणाऱ्या न्यायाचा एखाद्याला वीट आला तर तें एक वेळ समजण्यासारखं आहे; पण 'ज्ञानच नको ' असं म्हणण्याची कित्येकांवर (उदाहरणार्थ, या आमच्या वामनरावांवर) पाळी येते त्याला काय म्हणावं ? यौवनावस्थेंत आलेल्या युवयुवतींना कांहीं गोष्टी समजूं लागतात, पण प्रेमपूर्ति होण्याचा संभव फारसा नसला तर "या गोष्टी लहानपणीं समजत नव्हत्या तेंच बरं होतं, '**रम्य तें बालपण देइं देवा,**' अशा प्रकारचे उद्‌गार निःश्वासपूर्वक त्यांच्या तोंडून निघतात. हेंहि एक वेळ मला समजण्यासारखं आहे; पण औपनिषद ऋषींनीं पांडित्याबद्दल निर्वेद वाटला पाहिजे, (**पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्**) असं म्हणावं हें आश्चर्य नाहीं का ? तात्पर्य, अशी कोणतीहि चांगली गोष्ट नाहीं कीं जिच्याविरुद्ध कोणीं ना कोणीं तक्रार केली नाहीं. सुशील स्त्रियांच्या आणि

सत्कवींच्या साधुत्वाबद्दल संशय घेणारे लोक असणार हें भवभूतीनं सांगूनच ठेवलेलं आहे. **यथा स्त्रीणां, तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः।** असं तो म्हणतो; पण संशय घेणारे हे लोक दुर्जन असतात असं त्याचं म्हणणं आहे. माझं म्हणणं आणि माझी तक्रार अशी आहे कीं, केवळ दुर्जनांच्याच नव्हे तर चांगल्या चांगल्या लोकांच्याहि तक्रारी मोठ्या विलक्षण असतात !

आतां हेंच पाहा ना—मी काय वाईट आहें ? व माझी पत्नी काय वाईट आहे ? पण आमचा उभयतांचा एकदां एकमेकांबद्दल विलक्षण प्रकारचा असंतोष होता ! (एका क्षणापूर्वी उच्च भूमिकेवर मी गेलों होतों आणि आवाज मोठ्या सुरांत लागला होता तो आतां खालच्या सुरांत आलेला आहे आणि घरगुती गोष्टी मी बोलूं लागलों आहें हें पाहून तुम्ही कांहींजण मिस्किलपणें डोळे मिचकावून एकमेकांना डिवचीत आहांत हें मी पाहात आहें, पण माझं हें असंच चालायचं ! काय सांगत होतों मी ? हो, आम्हां पति-पत्नींचा एकमेकांबद्दल चमत्कारिक प्रकारचा असंतोष उत्पन्न झाला होता हें मी सांगत होतों.) माझी तक्रार तिच्या विरुद्ध अशी होती कीं, ती अलीकडे रुसत-फुगत नाहीं, आदळ-आपट करीत नाहीं, माझ्या रागावरून मुलांना हिसडीत-बडवीत नाहीं ! तिची माझ्याविरुद्ध तक्रार अशी होती कीं, मी तिच्या अंगावर पूर्वीसारखा ओरडत नाहीं, कधीं रागावत नाहीं, रागारागानं हातांतलं पुस्तक जमिनीवर किंवा टेबलावर आपटीत नाहीं ! या तक्रारी उत्पन्न होण्याचा प्रसंग असा होता :

पुष्कळ पूर्वीची गोष्ट आहे ही. उन्हाळ्यामध्यें मी बाहेर अंगणांत निजत असें. एक दिवस सकाळीं उठलों तेव्हां उठतांना डावी पाठ दुखूं लागली, रात्रीं तो भाग उघडा पडून त्यावर पहाटेस दंव पडलं असेल आणि त्यामुळें पाठ दुखूं लागली असेल किंवा झोपेंत एका कुशीवर अस्ताव्यस्त पडलों असेन म्हणून पाठ दुखत असेल, अशा प्रकारच्या कल्पना मनांत आल्या आणि त्या-वेळेस त्याचं कांहीं वाटलं नाहीं. पण सकाळीं हिंडूं-फिरूं लागलों तेव्हां मधून मधून खोकला यायचा आणि छातींत थोडीशी कळ यायची; हें जेव्हां पाहचलं तेव्हां मनांत मी चरकलों. थोडासा घाबरलोंहि. शंका आली कीं हृदयाचा तर विकार नाहीं ना ? माझे एक चुलतबंधु नुकतेच 'हार्ट डिसीज्'नं वारले होते, त्यामुळें ही शंका मनांत वारंवार डोकावूं लागली. आमचा स्वभाव तुम्हांला ठाऊकच आहे. असल्या नसत्या शंका आल्या कीं त्यांना घालवून

क्रमांक ४५५७९ वि: निबंध
दाखल ..... ७.६.९४ ..... बोर्ड ..... स्मृति

देणं आम्हांला कठीण पडतं. आमचं शरीरशास्त्राचं ज्ञानहि अकटोपासून विकटोपर्यंत. तेव्हां हार्ट डिसीज म्हणजे काय, या रोगामध्यें कुठें कळ येते, त्याचीं लक्षणं काय वगैरे आम्हांला कांहींच माहिती नाहीं. डॉक्टरला दाखवावं आणि निकाल करून घ्यावा हा सरळ मार्ग, पण एवढ्यातेवढ्याकरितां डॉक्टरकडे जाणं मला पसंत नव्हतं. डॉक्टरी फी एकसारखी देण्याचं माझं सामर्थ्यहि नव्हतं. आणि खरं म्हणजे डॉक्टरनं हार्ट डिसीज आहे म्हणून सांगितलं तर काय करतां! सगळाच ग्रंथ आटोपला! आणि मग बायकोचं कसं होणार? आणि मुलाबाळांचं कसं व्हायचं? (त्या वेळेस दोन मुलं होतीं मला, आमची इन्दुताई ७-८ वर्षांची होती आणि छोटू ४-५ वर्षांचा होता.) मनांत असल्या कुशंका येऊं लागल्या, पण बायकोपासून त्या लपवूं लागलों. पाठ दुखते आहे एवढंच तिला सांगितलं. तिनं बिचारीनं तेल लावावं, चोळावं, शेकावं, परंतु पाठ दुखणं कांहीं कमी होईना. माझी चर्या दिवसेंदिवस चिंताग्रस्त होऊं लागली. वृत्तींत भलताच गंभीरपणा आला. बायकोची थट्टामस्करी, तिला चिडवणं, तिच्या अंगावर ओरडणं, तिला एवढ्यातेवढ्यावरून रागावणं, सगळं एकदम थंडावलं. तिला पहिल्या प्रथम हें चत्मकारिक वाटूं लागलं, पण माझ्या चुकून गेलेल्या कांहीं उद्‌गारांवरून तिला हळूहळू मी कांहीं तरी गंभीर स्वरूपाचं लपवून ठेवीत आहें अशी शंका येऊं लागली. "कांहीं नाहीं ग, उगाच कांहीं तरी तुला शंका येते आहे. मला कांहीं झालं नाहीं, लवकरच पाठ दुखायची बरी होईल; नाहीं झाली तर दोन-चार दिवसांनीं डॉक्टरला दाखवूं." असं कांहीं तरी म्हणून मी तिची शंका आणि चिंता निवारण्याचा वारंवार प्रयत्न करीत असें आणि तीहि बाहेरून "उगाच काय घाबरायचं? दोनचार दिवसांत पाठ बरी होईल, नाहीं तर डॉक्टरला दाखवावी म्हणजे झालं," असं म्हणत असे, पण मनांत समजत असें कीं, 'खोकला आहे आणि खोकतांना विव्हळतात तेव्हां कांहीं तरी छातींत दुखत असलं पाहिजे आणि दुसरा कांहीं तरी चिंता करण्यासारखा रोग आहे म्हणून हे घाबरले आहेत. एरवीं असे हे बागायचे नाहींत.' अखेर अखेर छातींत दुखूं लागल्यावर विव्हळतांना एखादे वेळस मी स्वतःशींच जें बडबडत असें तें कानांवर पडून, मुलांना एखादे वेळेस जवळ घेऊन त्यांना कांहीं वेड्यासारखे प्रश्न विचारीत असें त्यावरून, तसंच मुलांशीं लडिवाळपणें बोलतां बोलतां किंवा ती पाठ

शेकीत असे त्या वेळीं तिच्याशीं बोलतां बोलतां डोळ्यांत अश्रु येत असत त्यावरून, तिनं मनांत पक्कं ताडलं कीं नुसतं पाठ दुखण्याचं हें कांहीं दुखणं नाहीं. आणि हें ताडलं असून देखील ती बाहेरून मला धीर द्यायची आणि म्हणायची कीं, उगीच धास्ती घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं! 'धास्ती कोणीं घेतली आहे? तूंच उगाच घाबरल्यासारखं करीत आहेस' असं मीहि बाहेरून म्हणत असें. पण हा दोघांचा लपंडाव फार दिवस टिकला नाहीं. मनांतल्या धास्तीमुळें ती आणि मी दोघंहि एकमेकांच्या भावनांना जपूं लागलों. तिची चेष्टा करण्याचं मीं सोडून दिलं. तिच्या शब्दाबाहेर जाईनासा झालों. कडू काढा तिनं दिला तरी मी मुकाट्यानं घेऊं लागलों. माझा नेहमींचा स्वभाव असा कीं कडू औषध घ्यायचं म्हणजे लहान मुलासारखा मी तिच्या-जवळ खळखळ करायचा. पण आतां तें सगळं गेलं. चहांत साखर कमीजास्त झाली असली तर पूर्वीं मीं तिची हसत हसत चेष्टा तरी करायचा, किंवा एखादे वेळस रागाची लहर आली कीं मी म्हणजे जमदग्नीचा अवतार व्हायचा. पण आतां मी म्हणजे गोगलगाय झालों. कडू चहा गोड लागूं लागला, म्हणजे गोड आहे असं म्हणूं लागलों,—'एवढ्या-तेवढ्याकरितां कशाला तिचं मन दुखवा? तिच्या नशिबीं पुढें दुःखं आहेतच; आतां थोड्या दिवसांचे आपण धनी, आपण कशाला बिचारीचं मन दुखवा!' असे विचार माझ्या मनांत येत. तिच्या वर्तनांतहि असाच फरक झाला. आंघोळीला उठण्याची सूचना एकदां दोनदां देऊनहि मीं हातांतलं पुस्तक सोडलं नाहीं म्हणजे पूर्वीं ती सैंपाकघरांतून मला ऐकूं जाईल अशा तऱ्हेची स्वगत बडबड करायची किंवा मुलांपैकीं कोणाला रागवायची, किंवा मुलं जवळ नसलीं तर भांड्यांवर तिचा राग निघायचा! हातरुमाल हरवले म्हणजे पूर्वीं ती माझ्या बी. ए., एम्. ए. ची किंमत करायची, विड्यांचीं थोटकं खोलींत अस्ताव्यस्त पडलीं तर कधीं हसत हसत बोलूनच, तर कधीं कधीं तीं थोटकं उचलून केराच्या टोपलींत टाकतांना केलेल्या अभिनयाच्या द्वारें, माझी चूक, आदर आणि कौतुक ज्यांत मिश्रित झालेलीं आहेत अशा सौम्य कोपानं माझ्या पदरांत घालायची. पूर्वीं ती मुलांना कौतुकानं मारायची आणि माझ्याकडे धाडून द्यायची, पण आतां मुलांना मारणं नाहीं, भांड्यांची आदळआपट नाहीं, पुटपुटणं-बडबडणं नाहीं; सूर्यास्ताच्या वेळच्या ढगाळलेल्या आकाशाप्रमाणें सगळा सौम्य अंधुक शान्ततेचा कारभार.

सूर्यास्ताच्या या देखाव्यांत दिवाबत्ती लावून आपण अंधकार कमी करण्याचा प्रयत्न करतों; पण दिवाबत्ती लावून घरामध्यें थोडाबहुत प्रकाश पडेल,बाहेरचा सर्वव्यापी अंधार कसा कमी होणार ? त्याप्रमाणेंच तीहि मधून मधून जुन्या आठवणी काढून कृत्रिमतेनं माझं मन उल्हसित करण्याचा प्रयत्न करी;पण मनाला व्यापून राहिलेली उदासीनतेची छाया या प्रयत्नांनीं कितीशी कमी होणार ?

अशा या चमत्कारिक स्थितींत चारपांच दिवस गेल्यावर एकदां ती विटकुरानं पाठ शेकीत असतां मला खोकल्याची उबळ आली आणि छातींत मोठी कळ आली. ती थांबल्यावर माझ्याकडे ती चिन्तातुर मुद्रेनं पाहूं लागली, तेव्हां मीं कांहीं तरी निमित्त करून तोंड फिरवलं. पण या योगें तिची चिन्ता अधिकच वाढेल असं वाटून तिच्याकडे कृत्रिमतेनं हसून, ' आज पोरं कुठं दिसत नाहींत ? शाळेंतून नाहीं का आलीं ?' असं विचारलं. ' आलींत तर काय झालं ? अंगणांत खेळताहेत.' तिनं स्मित केल्यासारखं दाखवून बेफिकीरीच्या आविर्भावानं म्हटलं. इतक्यांत आमचा छोटा पोरगा तिथें आला आणि कांहीं तरी हट्टानं मागूं लागला. लगेच ती उठली आणि त्याचा हट्ट पुरवून खालीं पाय सोडून पलंगावर माझ्या शेजारीं बसली. " आज न रागवतां छोटूचा हट्ट पुरवलास ? अलीकडे 'राघोबा' पाहुणे म्हणून घरीं फारसे येत नाहींत, हें कसं काय ?" मीं विनोद करण्याच्या आविर्भावानं म्हटलं.

तिनंहि विनोद करण्याचं सोंग आणून म्हटलं, " आपलीच वृत्ति बदलली आहे. मी आहें तशीच आहें आणि ' राघोबा ' हे माझ्याकडे ' पाहुणे ' म्हणून आले आहेत. ' आनंदीबाई ' आमच्या गांवची आणि घरोब्याची म्हणून ते आपले इकडे मधून मधून तिला भेटायला येत असतात. "

" आनंदीबाई तुझ्या गांवची खरी, पण अलीकडेच तिचं वास्तव्य तुझ्याकडे बरंच झालेलं दिसतं आहे. तिच्या आगमनामुळेंच आतांशा रागावणं-जाजावणं नाहीं, आदळ-आपट नाहीं, कांहीं नाहीं. "

"ही थट्टेची भाषा आतां राहूं द्यावी. मी मनापासून एक प्रश्न विचारूं का? अलीकडे ' मनांत ' कांहीं तरी विकल्प आला आहे. धास्ती म्हणा, किंवा कांहीं म्हणा, कांहीं तरी माझ्यापासून लपवणं चाललं आहे. "

" लपवणं नाहीं आणि छपवणं नाहीं. लपवणं-छपवणं असलं तर तें तूंच करीत आहेस. तुझं वर्तन अगदीं पार बदललं आहे अशी माझी तुझ्याविरुद्ध तक्रार आहे. "

"माझीहि तीच तक्रार आहे." तिनं उत्तर दिलं आणि एक-दोन मिनिटं आम्हीं एकमेकांविरुद्ध मघांशीं सांगितलेल्या चमत्कारिक तक्रारी केल्या. 'तूं कोणावर रागावत नाहींस, मुलांच्या अंगावर ओरडत नाहींस, त्यांना धपाटे मारीत नाहींस, माझ्यावरहि रुसत-रागवत नाहींस, म्हणून तूं कांहीं तरी छपवा-छपवी करीत आहेस' अशी माझी तक्रार. तिचीहि अशीच. संध्याकाळच्या वेळेला वळिवाचा मुसळधार पाऊस पडण्याच्या पूर्वी एखादे वेळेस आभाळांतील ढगांनीं रंगीबेरंगी रूप घेऊन आनंदाचे दिखाऊ खेळ चालवले असतात तसं आमचं कांहीं वेळ चाललं होतं. पण अखेर आनंदाचं हें सोंग मला पुरतेपणीं करतां येईना आणि भावनेच्या आवेगांत मीं तिच्या मांडीवर डोकं ठेवलं आणि हुंदके देऊन मनसोक्त रडलों आणि "मला हार्ट डिसीज् झाला आहे असं वाटतं. तुमचं आतां कसं होणार? माझ्या ताईला कोण सांभाळील? माझ्या छोटूचे लाड आतां कोण करणार?" असं बायकांसारखं आक्रंदन करूं लागलों. पण हें आक्रंदन क्षणभरच असेल. मी आपलं मन सांवरलं आणि तिच्या मांडीवरच डोकं ठेवून दीर्घश्वासपूर्वक अश्रुसिंचन करूं लागलों. तिनं त्या वेळीं मला लहान मुलाला थोपटतात तसं थोपटून जणूं कांही मातेप्रमाणें माझं सांत्वन केलं. त्या दहा-पंधरा मिनिटांमध्यें आमच्या हृदयांतल्या आंतल्या कप्प्यांत जी भीति दडलेली होती आणि जी एकमेकांना जरी ठाऊक होती तरी जी आम्ही एकमेकांपासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होतों ती भीति आम्हीं एकमेकांजवळ कबूल केली. आणि यामुळें दोघांनाहि मोकळं मोकळं वाटूं लागून त्या भयग्रस्त अवस्थेंतहि मन थोडंसं उल्हसित झालं. डॉक्टरला प्रकृति दाखवण्याला मी कांकूं करीत होतों, पण आतां तिच्या आग्रहानं मी तयार झालों. डॉक्टरनं छातीवर टिचक्या मारून स्टेथास्कोप लावून, छातीचे आवाज तपासले. 'क्ष' किरणांच्या साहाय्यानं आंतील भागाचीं छायाचित्रं घेतलीं आणि सांगितलं कीं, "तुम्हांला कांहीं एक झालेलं नाहीं; झालेलं आहे असं मानून कुढत बसलेत तर मात्र कांहीं तरी होईल." डॉक्टरनं हें सांगितल्यामुळें म्हणा किंवा कशामुळें म्हणा, मी १५ दिवसांत चांगला मात्र झालों, आणि छातींत दुखण्याची पुसट छटाहि राहिली नाहीं. पण आमच्या त्या एकमेकांच्या विरुद्ध केलेल्या तक्रारींची आठवण मात्र जन्मभर राहील! आमच्या काळच्या स्त्रीपुरुषांचे प्रेमप्रसंग हे असल्या प्रकारचे होते. आमच्या काळच्या त्या बायका निराळ्या. त्यांचं प्रेम निराळें. त्यांचे प्रमालाप निराळे."

• • •

[हें बोलून झाल्यावर धोंडोपंतांनीं एक निःश्वास सोडला आणि ते क्षणभर स्वस्थ बसले. नंतर पुनः एकदां दीर्घ श्वास आंत घेऊन पुनः तो निःश्वासून ते उद्‌गारले, " ते हि नो दिवसा गताः । " त्यानंतर त्यांना कांहीं तरी बोलावंसं वाटत होतं; पण शब्द बाहेर पडत नव्हते. पूर्वीचे कांहीं दिवस व कांहीं प्रसंग त्यांना जणूं कांहीं पुनः प्रत्यक्षवत् दिसूं लागले आणि ते आपल्या विचाराच्या अर्धवट तंद्रींतच गादीला टेकून पडले. माणसांच्या निरनिराळ्या तऱ्हांचें प्रथमतः शान्त तात्त्विक अलिप्ततेनं आणि कलात्मक 'आश्चर्यवत्' दृष्टीनं वर्णन करणारे धोंडोपंत आता इतके भावनाविवश झालेले पाहून आम्हांला मागाहून आश्चर्य वाटलं, पण त्या वेळीं सहानुभूतीनं आम्हींहि एक प्रकारच्या औदासीन्यानं व्याप्त झालों. एरव्हीं सहसा न दिसणारा त्यांच्या मनाचा कप्पा आम्हांला त्या वेळीं दिसला म्हणून आतां मात्र आनंद होत आहे !

——संपादक]

• • •

१५

हें प्रेम वेडं का शहाणं ?

पुष्कळ वर्षांपूर्वीची गोष्ट :

" मी आहें म्हणून यांचा संसार चालला आहे. नाहींतर यांचं काय झालं असतं कुणाला ठाऊक ! " वहिनी म्हणाल्या.

मी (संपादक) म्हणालों : "धोंडोपंतांना सगळे लोक विद्वान् म्हणतात आणि त्यांनीं एवढी कीर्ति मिळविली आहे ती उगीचच म्हणायची ! भगवद्गीतेवर पुस्तक लिहिलं, शांकरभाष्याचा स्वतंत्र अर्थ केला, ' चटकचांदणी ' सारखी कादंबरी लिहिली. त्यांना कांहींच समजत नाहीं ? "

" त्यांचं हें विद्वत्त्व व्यवहारांत काय उपयोगाचं ? सगळे प्रकाशक त्यांना फसवताहेत ! "

वहिनींच्या मनांत धोंडोपंतांच्या विद्वत्तेबद्दल फार आदर होता, पण बाह्यतः आपलं उगीच त्या त्यांच्या पांडित्याबद्दल असं बोलत असत हें उघडच आहे. धोंडोपंतांच्या स्वभावाबद्दलहि त्यांना फार आदर वाटे. आपल्या इंद्रवर आणि छोटूवर आपल्यावर जेवढं आहे त्यापेक्षां त्यांचं अधिक प्रेम आहे याबद्दल त्या तक्रार करीत असत. पण तेंहि बाह्यतःच. मनांतून त्यांना तें आवडत असे. धोंडोपंत जेवढे विद्वान् आहेत तेवढे प्रेमळ आहेत, उदार आहेत, दिलदार आहेत, हें त्या ओळखून होत्या आणि ते त्यांना देवाप्रमाणें पूज्य होते, पण हे भोळे सांब आहेत, यांना व्यवहार कशाशीं खातात हें समजत नाहीं; आपण आहोंत म्हणूनच यांचा संसार चालला आहे, नाहीं तर या कलियुगांत यांचं देवपण मातीमोल झालं असतं, असं त्यांना आपलं वाटायचं !

आज तर त्यांना असं बोलण्याला चांगलाच आधार मिळाला होता.

बी. ए. ला नेमलेल्या एका संस्कृत काव्यावर त्यांनीं एक परीक्षोपयोगी टिप्पण्यांचं पुस्तक केवळ द्रव्यप्राप्तीच्या इच्छेनं लिहिलं होतं. लग्न झाल्यापासून

बायकोची दागिन्यांची हौस त्यांना कधीं पुरवितां आली नव्हती तें त्यांच्या मनाला लागलं होतं आणि अलीकडे दोन मुलं असल्यामुळं बायकोची हौस पुरवणं फारच मागं पडलं होतं. थोडीबहुत हौस कुणाची पुरवतां आली तर ती मुलांची पुरवावी असं त्यांचं होत असे आणि वहिनीहि मुलांच्या हौशी पुरवण्याबद्दलच आग्रह करावयाच्या. आपली दागिन्यांची हौस फिटली नाहीं असं त्या अलीकडे बोलत नसत आणि म्हणून तर तें धोंडोपंतांना मनाला लागून राहिलं होतं ! टिप्पण्यांचं पुस्तक मुंबईच्या प्रकाशकाला उक्तं देऊन टाकून त्या पैशांत तिच्या हौसेची मोहनमाळ मुंबईहून घेऊन यायची आणि तिला आनंद-स्मित करायचं, हा त्यांचा डाव होता. पत्नीला हें त्यांनीं सांगितलं नव्हतं; पण फक्त 'तूं सांगितलेलं सामान घेऊन रविवारीं सकाळच्या गाडीनं परत यतों' हें तिला सांगितलं होतं, मलाहि त्यांनीं रविवारीं दुपारीं १२ वाजतां येतों म्हणून सांगितलं होतं. म्हणून मी दुपारीं पांचाच्या सुमारास त्यांच्या घरीं गेलो होतों. हेतु असा कीं, सकाळच्या गाडीनं नाहीं आले तर दुपारच्या बाराच्या गाडीनं पुण्याला ४।।-४।।। पर्यंत आले असतीलच आणि त्यांची गांठ खात्रीनं पडेलच. सव्वापांच वाजले तरी स्वारी आली नव्हती. तेव्हां 'यांचं हें असंच आहे; पत्र लिहिल्याप्रमाणें कधीं यायचे नाहींत,आपल्याला जमत नाहीं तर दुसऱ्याला काळजी लागायला अमक्या गाडीनं येतों म्हणून कळवावं कशाला ?' इत्यादि गोष्टी मला मुकाट्यानं ऐकाव्या लागल्या. 'येतील, अजून यायची वाट आहे' असं कांहीं तरी म्हणून मी वेळ काढीत होतों, आणि 'धोंडोपंतांचं संसारांत लक्ष आहे, पण त्यांचं विद्येकडे अधिक लक्ष असल्यामुळें संसारांतल्या बारीक सारीक गोष्टींकडे दुर्लक्ष होतं' असं दुबळं समर्थन करीत होतों.

दुपारच्या बारा वाजल्यापासून वाट पाहून पाहून त्या थकल्या होत्या आणि वैतागल्या होत्या आणि धोंडोपंतांच्या खऱ्या चाहत्यांजवळ कौतुकानं त्यांच्याविरुद्ध बोलण्याचा मोह त्यांना आतां कांहीं आवरतां येईना.

" संसारांत यांचं अगदीं लक्ष नाहीं. आतां मुंबईस गेले आहेत ते येतांना तिथं स्वस्त कापड मिळतं तें घेऊन यायचे नाहींत. फिरकीचा पितळी तांब्या तिथें स्वस्त मिळतो म्हणून तुमच्या 'यांनीं' सांगितलं तो येतांना आणायला सांगितला आहे तो देखील आणणं व्हायचं नाहीं. चार रुपये सहा आण्यांना मिळतो म्हणून मला तुमच्या 'यांनीं' सांगितलं. तुमचं लक्ष आहे, तसं यांचं कुठं आहे ?"

माझी ही स्तुति कितपत यथार्थ होती हें माझं मला ठाऊक ! मी तो तांब्या चार रुपये बारा आण्यांना घेऊन पत्नीला चार रुपये सहा आण्यांना आणला म्हणून सांगितलं होतं ! माझी ती स्तुति ऐकल्यावर माझ्या तोंडावर थोडंसं स्मित दिसूं लागलं तेव्हां वहिनी म्हणाल्या,–

" तुम्ही हसा, पण माझं म्हणणं खरं आहे. यांना बाजारहाट कांहीं समजत नाहीं. खिशांत पत्रं आणि कागदाचे कपटे कोंबतात, त्याबरोबर पांच-दहा रुपयांच्या नोटाहि कोंबतात आणि कागदाबरोबर कुठें गेल्या म्हणजे माझ्यावर कातावतात ! बाकी नोटा गेल्या आहेत हें सुद्धां पुष्कळ वेळां कळत नाहीं. "

" असं कसं होईल ?" मीं म्हटलं. " नोटा गेलेल्या ध्यानांत येणार नाहींत इतके का ते श्रीमंत आहेत ? "

" मग सांगत्यें काय ?" त्या म्हणाल्या. " अहो, मी मधून मधून खिशांतून एखादी नोट काढून घेत्यें तें स्वारीच्या ध्यानांत कुठं येतंय् ! यांच्याजवळ पैसा राह्यचा नाहीं, म्हणून मी आपली अडीअडचणीच्या वेळेला उपयोगी पडावेत म्हणून असं करत्यें ! "

" चांगलं करतां ! " मी उद्‌गारलों आणि स्मित केलं.

" हो. चांगलंच करत्यें. असल्या पुरुषांना असंच फसवलं पाहिजे. त्यांत कांहीं पाप नाहीं. यांच्याशीं सरळ वागून माणसाचं निभायचं नाहीं. तुम्हांला सांगत्यें एक मजा यांची. यांचं टेबल मी लावून ठेवत्यें त्याचे यांना उपकार नाहींत; टेबल लावून ठेवतांना एखाद् वेळेस त्यांच्या टिपणांचं एखादं चिठोरं इकडचं तिकडे झालं तर अंगांत जणूं कांहीं भूत शिरतं आणि मला खायला उठतात. अशा वेळीं मी त्यांच्या लाडक्या इन्दूचं नांव पुढं करत्यें आणि तिनंच कांहीं कुठें तरी टेबलावरून हलवलं असेल असं म्हणत्यें, मग मात्र सगळा राग शांत होतो ! "

" इन्दू चांगली उपयोगी पडते म्हणायची !" मी उद्‌गारलों.

" अहो असं करावं लागतं संसारांत; माझ्यावर रागवायचं झालं कीं मी इन्दूला बाह्यात्कारी रागावूं लागतें आणि मग ते तिची कड घेऊन माझ्याशीं वाद घालूं लागतात आणि मूळचा राग कोठल्या कोठें निघून जातो ! "

" तुमची युक्ति त्यांच्या ध्यानांत येत नाहीं म्हणून बरं आहे. नाहींतर..."

" कसली ध्यानांत येते यांच्या ! यांनीं माया नि ब्रह्म यांचा काथ्याकूट करावा, नाहीं तर कालिदास आणि भवभूतींचीं नांवं घेऊन एकसारखी रसचर्चा

करावी, नाहीं तर टिळक, गोखले, गांधी, कम्युनिझम् यांच्याबद्दल तुमच्यासारख्यांशीं वादावादी करावी, नाहीं तर पुस्तकं लिहावींत ! बाकी व्यवहाराचं ज्ञान शून्यच. बाजारांतली भाजी आणायला गेले तर पैसे हरवून येतील, नाहीं तर भलतीच भाजी आणतील, नाहीं तर ओझेवालीला भलतीच हमाली ठरवतील !"

"पुरुषांची दृष्टि जरा उदार असते !" मीं धोंडोपंतांची बाजू घेऊन म्हटलं, "आणि त्यांना क्षुल्लक गोष्टीबद्दल घासाघीस करावीशी वाटत नाहीं."

वहिनींना तें पटलं असावं, पण पतीविरुद्ध बोलून दुसऱ्याकडून त्याची स्तुति ऐकण्यांत त्यांना एक प्रकारचं भूषण वाटत असावं असं मला वाटतं, आणि म्हणून मोठ्या कौतुकानं त्या आणखी म्हणूं लागल्या: "आणि यांना खाण्यापिण्यांतली चव तरी कुठें समजते आहे ? 'स्वदेशी साखरच खायची' अशी शपथ घेतली आहे वेड्यासारखी आणि स्वदेशी साखर घरांत नसली म्हणजे मग गुळाचाच चहा पितात ! कसा आवडतो कोणास ठाऊक !"

"अहो, यांत तत्त्वाचा प्रश्न असतो वहिनी, चवीचा नाहीं !" मीं म्हटलं आणि त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ मध्येंच थांबविला, तेव्हां त्या म्हणाल्या,—

"कसलं आलं आहे तत्त्व ! चांगली—वाईट चव समजत असेल तर ना ? कोणत्या पदार्थांत काय घातलं आहे, काय नाहीं, हें समजत नाहीं, याची तुम्हांला मजा सांगत्यें. अलीकडे अनीमियासारखं यांना झालं होतं म्हणून डॉक्टरांनीं अंडीं खायला सांगितलीं. मला म्हणाले, 'अंडीं मला नाहीं आवडत; मी खायचा नाहीं, मला ओकारी येते.' मीं काय केलं ठाऊक आहे ? अंडीं घातलेलीं चांगलीं चवदार धिरडीं त्यांना करून देऊं लागलें, आणि अंड्याचं नांवहि काढलं नाहीं ! आज महिनाभर देत आहें, त्यामुळें प्रकृति पुष्कळ सुधारली आहे; पण स्वारीला अजून मी काय करत्यें याचा पत्ता नाहीं ! अशा माणसांना असंच फसवलं पाहिजे. स्वदेशी साखर घरांत आणलेली नसली तरी खुशाल विलायती साखरेचा चहा करत्यें आणि स्वदेशी साखरेचा म्हणून सांगत्यें. इकडे कांहीं कळत नाहीं."

"असं फसवणं चांगलं का ?" मीं म्हटलं, तेव्हां माझ्यावरच उसळून त्या म्हणाल्या, "पुरे झाला तुमचा वेदान्त ! ते आले म्हणजे त्यांच्याशीं करा हें नीतीचं आणि हें अनीतीचं असा काथ्याकूट ! यांत नीति कसली नि अनीति कसली ?"

धोंडोपंत येण्याची वेळ आतां पार टळल्यासारखी झाली होती त्यामुळें काळजी वाटूं लागून त्या चिडल्यासारख्या झाल्या होत्या, म्हणून त्या माझ्यावर उसळल्या असाव्यात. इतक्यांत इंदू तेथें आली आणि 'बाबा आले का, बाबा आले का' म्हणून आईला विचारून सतावूं लागली. आपण इथें वाट पाहात बसावं का नाहीं असा मी विचार करूं लागलों, तेव्हां वहिनींनींच मागच्या बोलण्याचा पश्चात्ताप वाटून म्हणा किंवा खऱ्या सात्त्विक भावानं म्हणा, "आणखी १०-१५ मिनिटं थांबा, मी चहा ठेवतें, तोंपर्यंत आले तर येतील" वगैरे बोलून मला ठेवून घेतलं आणि इंदूची समजूत काढण्याकरितां आणि चहा स्टोव्हवर ठेवण्याकरितां घरांत गेल्या.

त्या घरांत गेल्यावर धोंडोपंतांचा टांगा येतो कीं काय हें पाहण्याकरितां मी रस्त्यावर लक्ष देऊं लागलों. मनांत हरत-हेचे विचार येऊन प्रेमाच्या खेळांचा चमत्कार वाटूं लागला. धोंडोपंत मुंबईस गेले तेव्हां त्यांना पोंचविण्याकरितां मी सहज त्यांच्या टांग्यांतून स्टेशनवर गेलों होतों. टांग्यांत आणि प्लॅटफॉर्मवर आमच्या गप्पा झाल्या त्यांत ते मला म्हणाले होते : " तुम्ही चार रुपये बारा आण्यांना फिरकीचा तांब्या घेऊन बायकोला चार रुपये सहा आण्यांना आणला म्हणून सांगितलंत त्याचं प्रायश्चित्त मला भोगावं लागतं आहे ! आमच्या हिनं तसला तांब्या मला आणायला सांगितला आहे ! मला चार रुपये सहा आण्यांना कसा मिळणार ? पण मी तिला चार रुपये पांच आण्यांना आणला म्हणून सांगणार आहें ! या बायकांना असं फसविल्याशिवाय गत्यंतर नाहीं ! " धोंडोपंतांचं स्टेशनवरचं हें वाक्य,आणि वहिनींचं 'या पुरुषांना असंच फसवलं पाहिजे' हें वाक्य,मनांत येऊन कोण कोणाला फसवीत आहे आणि कशाकरितां, आणि हें चांगलं का वाईट, हा विचार मोठा चमत्कृतिजनक वाटला आणि मीं मनांत हसलों. वहिनींनीं म्हटलं होतं कीं, 'यांना प्रकाशक फसवितात' पण धोंडोपंत मला स्टेशनवर म्हणाले होते कीं, " प्रकाशक मला या पुस्तकाबद्दल कमी पैसे देतील हें मला ठाऊक आहे, पण मीं निश्चच केला आहे कीं, जें काय येईल तें घेऊन तिची मोहनमाळेची हौस या खेपेला पुरवायचीच ! येतांना घेऊन येईन आणि तिला चकित करून सोडीन. पैशांचं काय, कमी मिळाले आणि जास्ती मिळाले तरी माझ्याजवळ थोडेच राहणार आहेत ते ! आम्ही नेहमींच कफल्लक असणार ! लग्न झाल्यापासून तिला कांहींच केलं नाहीं म्हणून

या खेपेला निश्चयच केला आहे कीं मोहनमाळ आणायचीच ! प्रकाशक मला फसवतील हें मला काय समजत नाहीं ? तरी पण जी रक्कम येईल ती घ्यायची आणि मोहनमाळ आणायची असा निश्चय केल्यावर फसण्याचा न फसण्याचा प्रश्न येतोय् कुठें ! तिला वाटतं मला व्यवहार समजत नाहीं, पण प्रकाशकाकडून पैसे हबकून घेण्यापेक्षां मुलांची आणि बायकोची हौस पुरवणं हें या वेळीं अधिक महत्त्वाचं आहे, हा अधिक व्यापक विचार मी मनांत आणतों आणि खरा सांसारिक व्यवहार हा असाच आहे आणि तो मला अधिक कळतो. ––" आतां कोणाचं मत खरं समजायचं, पत्नीचं का पतीचं, याचा विचार मनांत चालला होता, इतक्यांत धोंडोपंतांचा टांगा रस्त्यावर दिसला. लगेच अंगणांत खेळणारी इंदू आणि वाड्यांतील दुसरीं मुलं त्या टांग्याजवळ जमलीं, वहिनींनीं सैंपाकघराच्या दाराशीं येऊन 'आले वाटतं' असे उद्गार काढले आणि आमची स्वारी टांग्याजवळ जाऊन त्यांची वळकटी उचलूं लागली.

घरांत आल्यावर धोंडोपंतांनीं कपडे वगैरे काढल्यावर प्रथम इंदूकरितां आणलेला खाऊ, तसंच मुंबईहून आणावेत म्हणून सांगितलेले हिंग वगैरे पदार्थ ट्रंकेंतून बाहेर काढले. आणि वहिनी तिथें नाहींत अशी खात्री करून घेऊन (काय बोलतों तें इंदूला समजूं नये म्हणून इंग्रजींत) मला म्हणाले : "या फिरकीच्या तांब्याशिवाय सगळे पदार्थ मी पुणें स्टेशनवरून घराकडे येतांना वाटेंत दुकानांत घेतले आहेत आणि 'तिला' सांगणार कीं मुंबईहून आणले आणि स्वस्तांत आणले ! तांब्या चार रुपये पांच आण्यांना मिळाला हें सांगायचं ठरलंच आहे. या बायकांना असं फसवल्याशिवाय गत्यंतर नाहीं." त्यांचं बोलणं ऐकून मीं त्यांना दुजोरा दिला आणि पुढें कांहीं बोलणार इतक्यांत वहिनी आमच्या खोलींत आल्या आणि 'धिरडं होत आलं आहे' असं म्हणून धोंडोपंतांना 'हातपाय धुण्यास उठावं' अशी सूचना दिली.

धिरडं खातांना धोंडोपंत म्हणाले : "मला अंडीं खायला पुष्कळ सांगतात, पण आपल्याला कांहीं तें जमायचं नाहीं. मी हें धिरडं, लोणी वगैरे खातों आणि माझी प्रकृति चांगली सुधारत आहे. आमच्या हिच्या हातचं धिरडं म्हणजे एक मेजवानी आहे."

"अहो, बायकोच्या हातचं आधींच गोड लागतं, त्यांतून वहिनींसारख्या सुग्रणीच्या हातचं, मग काय ?" असं म्हणून अंड्याचं गुपित मीं कसं लपवलं

आहे असं सुचवण्याकरितां वहिनींकडे पाहून मीं थोडंसं साभिप्राय स्मित केलं.

"गोड बोलून चहा उकळायचा बेत दिसतोय!" धोंडोपंत माझ्याकडे पाहून म्हणाले.

"चहा घेईन मी" मीं म्हटलं, "पण 'गुळा' चा नको. आम्हांला आपली विदेशी साखर चालते. मीं देखील स्वदेशी साखरेचं असंच व्रत घेतलं होतं. पण अलीकडे सोडलं आहे, हें तुम्हांला ठाऊक आहे."

"आपल्याला विदेशी साखरेचा चहा नाहीं चालायचा." धोंडोपंत म्हणाले. "स्वदेशी साखर घरांत नसली तर माझ्यापुरता गुळाचा चहा कर."

"आहे, स्वदेशी साखर आहे; नुकतीच आणली आहे मीं" असं म्हणून वहिनींनीं माझ्याकडे साभिप्राय पाहिलं आणि मीं प्रत्युत्तरादाखल म्हटलं, "अहो सुगृहिणी म्हटलं मघांशीं तें उगीच का?"

वहिनी हें ऐकून खूष झाल्या आणि घरांत गेल्या तेव्हां धोंडोपंत म्हणाले, "तत्त्व म्हणजे तत्त्व. मीहि स्वदेशीचं व्रत सोडावं म्हणतों, पण सोडीपर्यंत आम्ही गुळाचा देखील चहा पिऊं." बोलतां बोलतां त्यांना एकदम ते छापीत असलेल्या एका पुस्तकाच्या प्रुफांची आठवण झाली आणि एकदम त्यांनीं घरांत मोठ्यानं विचारलं, "काय ग, तपासलेलीं प्रुफं 'सरस्वती-भूषण' छापखान्यांत पाठवायला सांगितलीं होतीं तीं पाठविलीस का?"

वहिनी प्रुफं पाठवायला विसरल्या होत्या तेव्हां 'नाहीं पाठवलीं' हें कबूल करावं लागलंच. धोंडोपंत हे पत्नीनं दूध सांडलं, भाजी तिखट झाली, कप फोडले, कपडे फाडले, पैसे कमीअधिक खर्च केले तरी रागवायचे नाहींत, पण प्रुफं पाठविलीं नाहींत हें ऐकल्याबरोबर ते एकदम भडकले आणि कांहीं तरी रागानं बोलूं लागले. तेव्हां वहिनींनीं आपली अमोघ युक्ति काढली आणि म्हणाल्या, "या इंदूनं टेबलाशीं खेळून टेबलावरच्या ढिगांत प्रुफं कुठं टाकलींत तीं दोन दिवस मला सांपडत नव्हतीं; आज सकाळीं सांपडलीं. या कार्टीला झोडपून काढलं पाहिजं."

इन्दूचं नांव काढल्याबरोबर धोंडोपंत नरम पडले आणि "जाऊं दे ग, तिला कां उगाच बोलतेस! पोरं अशीं खेळायचींच!"

हें ऐकल्यावर वहिनींना जोर चढला आणि म्हणाल्या, "लाडावून ठेवली आहे पोरीला. उद्यां डोकीवर मिरीं वाटील तेव्हां समजेल!"

"माझ्यापेक्षां तूंच लाडावून ठेवली आहेस तिला." धोंडोपंत म्हणूं लागले. तेव्हां मीं म्हटलं, "जाऊं द्या हो, दोघांनीं लाडावून ठेवली आहे असं म्हणूं या. नाहींतर कोणीच नाहीं लाडावून ठेवली असं म्हटलं तर सगळ्यांत उत्तम." आणि विषयच बदलण्याकरितां लगेच म्हटलं: "हा फिरकीचा तांब्या केवढ्याला आणलांत? कुठें मिळाला?"

"तुम्हीं घेतलांत तिथें तो प्रथम ४-१२-० सांगूं लागला, पण अखेर चार रुपये सहा आण्यांना द्यायला तयार झाला, पण मी कसला वस्ताद! शेजारच्या दुकानांत जाऊन पाहिलं तिथें तसलाच आणि तेवढ्याच वजनाचा हा तांब्या चार रुपये पांच आण्यांना मिळाला! इतकं मी करतों तरी ही म्हणते कीं यांचं पैशाकडं लक्ष नाहीं, व्यवहार कांहीं समजत नाहीं!"

मोठा विजय मिळविल्याच्या ऐटीनं हें बोलून त्यांनीं माझ्याकडे पाहून डोळे मिचकावले ते इन्दूनं पाहिले, पण तिला त्यांतला कांहीं भावार्थ समजला नाहीं. वहिनींनीं पाहिले नाहींत तेव्हां वादांत जणूं कांहीं पराभव झाला असं समजून (आणि एका दृष्टीनं आनंदून!) त्या म्हणाल्या, "एखादे वेळेस लक्ष घातलं म्हणजे संसारांत लक्ष आहे असं होत नाहीं कांहीं!" वगैरे वगैरे. त्या असं उत्तर देत होत्या खऱ्या, पण आपला पराभव झाला असं त्यांच्या मनालाच वाटत असल्यामुळें त्यांच्या बोलण्यांत दम नव्हता!

आनंदात्मक पराभवाच्या या वृत्तींत भर घातली धोंडोपंतांनीं आणलेल्या मोहनमाळेनं! धोंडोपंतांनीं चहापाणी झाल्यावर ट्रंकेंतून हळूच एक लहान पेटी काढली आणि इन्दूला विचारलं, "काय आहे यांत? ओळख." आईला कांहीं तरी दागिना आणला असेल!" ती म्हणाली.

"हो मला आणताहेत दागिना!" वहिनी उद्गारल्या. "आतां बाई दागिने, बिगिने सगळे तुला!" असं म्हणून त्यांनीं इंदूच्या हातांतून पेटी अर्धवट हिसकावूनच घेतली आणि उघडून पाहिलं तों ज्या दागिन्याची त्यांची हौस फिटली नव्हती तो दागिना – त्यांना ज्या घाटाची मोहनमाळ पाहिजे होती त्या घाटाची–मोहनमाळ!

वहिनींनीं आनंदानं स्मित करून आणि मोहनमाळेकडे निरनिराळ्या कोनांतून पाहून किंमत विचारली. धोंडोपंतांनीं पंधरा रुपये जास्तीच सांगितले, तेव्हां 'इतके रुपये कशाला उगाच खर्च केले?' वगैरे वरवरच्या गोष्टी बोलून

त्यांनीं ती मोहनमाळ इन्दूच्या गळ्यांत घातली. तिला ती फारच शोभून दिसत होती, हें पाहून त्या प्रेमळ मातेनं लगेच म्हटलं, "मला आणली खरी, पण इंदू, तूंच घालीत जा. माझं आतां दागिने घालायचं का वय आहे? जा, इन्दू, शेजारच्या काकूंना नमस्कार कर आणि मला मुंबईहून ही आणली आहे असं सांग.'

इन्दू शेजारच्या घराकडे गेल्यावर वहिनीहि घरांत गेल्या आणि आमचं दोघांचं बायकांच्या दागिन्यांबद्दलच्या हौशीबद्दल वगैरे बोलणं सुरू होऊन, बायकांच्या कोत्या समजुती वगैरेवर तें थोडेंसं रेंगाळून, अखेरीला त्यांचा सोशिकपणा, त्यांचं अपत्यप्रेम, पतिप्रेम वगैरे गुणांची सर कोणाला यायची नाहीं, इथपर्यंत आल्यावर मग धोंडोपंतांनीं 'मायावादा' वर जो एक निबंध लिहिण्यास घेतला होता त्या पांडित्यात्मक विषयाकडे संभाषणाचा ओघ वळला.

"वेदामध्यें माया म्हणजे 'शक्ति' असा अर्थ आहे, पुढें त्याला मिथ्या हा अर्थ आला; पण शंकराचार्यांच्या 'मायावादा' चा अर्थ जग हें मिथ्या आहे असा मात्र नाहीं. जगाकडे पाहण्याची आपली दृष्टि म्हणा, वृत्ति म्हणा, चुकीची असते, या अर्थानं जग हें मिथ्या आहे. आपलीं मूल्यं चुकीचीं असतात, आपण आपल्याच दृष्टीनं विचार करतों. इतर लोकांच्या दृष्टीचा विचारहि ज्यांत आहे असं साकल्यज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान." इत्यादि इत्यादि गोष्टी धोंडोपंत सांगूं लागले. तें मीं मधून मधून शंका विचारून किंवा रुकार दर्शवून ऐकून घेतलं आणि शेवटीं म्हटलं :

"मायावादाचा अर्थ मी प्रेम-वाद करतों. म्हणजे प्रेमाशिवाय जगांत कांहीं नाहीं असा माझा अर्थ. जगांत द्वेष, असूया, मूर्खपणा, लबाडी आपत्ति, दुःख, हलकटपणा या सगळ्या गोष्टी असतील, पण माणसाचं कुठें ना कुठें तरी प्रेम असतं आणि या प्रेमामुळेंच जगांत जगावंसं वाटतं. जगांत प्रेम नसतं तर जगायचं कोणासाठीं, कशासाठीं? अपत्यप्रेम, मातृप्रेम, बंधु-प्रेम, देशप्रेम विद्याप्रेम, ध्येयप्रेम,—प्रेम कशावर का असेना, या प्रेमामुळेंच जगांत माणसाला जगावंसं वाटतं. या प्रेमानं कोठलंहि रूप घेतलं तरी त्यांत एक प्रकारचं सौंदर्य, मांगल्य, आनंददायकत्व येतं. ज्या खोटेपणाच्या किंवा कपटाच्या मुळाशीं प्रेम आहे तेंहि माझ्या मतानं सुंदर आहे, मंगल आहे, आनंददायक आहे, सच्चिदानन्दस्वरूप आहे."

मीं आपलं वक्तृत्व पुढें चालवलं असतं, पण धोंडोपंतांनीं मला अडवलं आणि म्हटलं, "आपण शंकराचार्यांच्या मायावादाचा अर्थ करीत आहोंत, मायावादाचा 'वामनी' अर्थ नाहीं. पूर्वीच्या वामन कवीनं 'यथार्थ-दीपिका' लिहिली तशी तुम्हीं 'यथार्थालापिका' आतां लिहा!"

मी कांहीं उत्तर देणार होतों इतक्यांत इंदू तेथें आली आणि "मोहनमाळ मला द्यायची ना? मी रोज घालूं ना?" वगैरे वगैरे लाडिकपणाचं तिनं बोलून आमच्या मायावादाला आमच्या संभाषणांतून पार हुसकावून लावलं आणि मग मी घरच्या 'मायेनं' ओढला जाऊन घराकडे निघालों!

ही आठवण मीं लिहून छापण्यास दिली खरी, पण प्रुफं वाचतांना वाटूं लागलं कीं ही छापूं नये. या पुस्तकांतल्या सगळ्या आठवणींत मीं नांवंगांवं जरी बरींचशीं बदललीं असलीं तरी धोंडोपंतांना छापील एक प्रत मी देणार आहें आणि ते मीं दिलेल्या या आठवणी स्वतः वाचतील आणि पत्नीलाहि वाचून दाखवतील आणि मग त्यांना काय वाटेल याबद्दल माझं मन साशंक आहे. त्या दोघांच्या प्रेमकपटांचीं गुहयं या आठवणीच्या द्वारें उभयतांना कळतील आणि गुपित फोडल्याबद्दल मला तीं उभयतां रागावतील अशी मला भीति वाटत नाहीं; कारण या गोष्टीला किती तरी वर्षं होऊन गेलीं आहेत. आतां तीं उभयतां म्हातारीं होऊन गेलीं आहेत, आणि त्यांना हीं गुपितं अगोदरच आतां ठाऊक झालीं असतील! मला जी भीति वाटते ती निराळीच. ही आठवण धोंडोपंत वाचीत असतां प्रथम त्यांना मौज वाटेल, पण पुढें पुढें इंदूचं नांव जिथें आलं आहे तिथें आपल्या लाडक्या (पण आतां दुर्दैवानं देवाज्ञा झालेल्या) मुलीची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहून उभयतांच्या डोळ्यांत अश्रु येऊं लागतील. आठवण कशीबशी वाचून झाल्यावर धोंडोपंत बहुधा एक दीर्घ सुस्कारा टाकतील आणि डोळ्यांत आलेले दोन-चार अश्रुबिंदु पुसून पदरानं आपला अश्रुप्रवाह पुसणाऱ्या आपल्या पत्नीला ते म्हणतील, "अग, आपण इन्दू 'आपली' समजतों, हीच माया आहे! या जगांतलं तिचं अवतारकृत्य संपल्यावर देवानं तिला स्वर्गांत नेली हें त्याच्या दृष्टीनं बरोबरच नाहीं का?"

"तुमच्या वेदान्त सगळा खरा आहे, पण माया वेडी आहे ना?" असं

म्हणून वहिनी बहुधा अधिकच रडूं लागतील. पण धोंडोपंत आतां पत्नीचं समाधान करण्याच्या भानगडींत न पडतां 'It is better to have loved and lost, than never to have loved at all' असं पुटपुटतील अशी माझी कल्पना आहे! त्यांचा शोक थोडा वेळ का होईना मीं जागृत केला याबद्दल उभयतांनीं क्षमा करावी. पण हें वाक्य पुस्तकी वाटतं, खरा भावार्थ त्यांनीं व्यक्त होत नाहीं. उभयतां मला क्षमा करतील हें मला ठाऊक आहे, किंबहुना तीं रागावणार नाहींत हेंहि मला ठाऊक आहे; मग मी माझा अर्थ कसा व्यक्त करूं? प्रयत्नच करीत नाहीं. मनोमन साक्ष आहे.

• • •

अभ्यास

१

(१) 'स्मृतिलहरी' हें पुस्तक कोणकोणत्या वाङ्मयप्रकारांत समाविष्ट होणें शक्य आहे? तें कसें?

(२) 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' (रमाबाई रानडे) अथवा 'स्मृतिचित्रें' (लक्ष्मीबाई टिळक) या पुस्तकांशीं 'स्मृतिलहरी' ची तुलना करतां येईल काय?

(३) हें पुस्तक वाचून संपविल्यावर मनावर कोणत्या प्रकारचा संस्कार कायम राहतो? कादंबरी, आत्मचरित्र, लघुकथा, लघुनिबंध यांच्यापैकीं कोणता वाङ्मयप्रकार आपण वाचला असें तुम्हांला वाटतें?

(४) 'जिव्हाळा हा लेखनाचा आत्मा, तंत्र हें त्याचें शरीर' असें अनेक टीकाकार प्रतिपादन करतात. 'स्मृतिलहरीं'तल्या लेखांच्या आधारें हें विधान तुम्हांला कितपत पटतें तें सांगा.

(५) या ललित लेखांतल्या विविध पात्रांत लेखकानें स्वतःचाहीं समावेश करून घेतला आहे. तो कां? असें केल्यानें लेखनाची रंगत वाढली आहे कीं कमी झाली आहे?

•

२

(१) वामनरावांना शाब्दिक कोट्या करण्याची हौस फार होती हें या पुस्तकांतलीं तीन उदाहरणें देऊन सिद्ध करा.

(२) सौम्य व नाजुक विनोद हा वामनरावांच्या लिखाणाचा एक विशेष आहे. अशा विनोदाचीं या पुस्तकांतलीं तुम्हांला आवडलेलीं तीन स्थळें सांगा.

(३) 'प्रेम कशावर का असेना, या प्रेमामुळंच माणसाला जगांत जगावेंसें वाटतें' अशासारखीं 'स्मृतिलहरीं' तलीं पांच सिद्धांतरूप वचनें शोधून

काढा. त्या प्रत्येक वचनाला कांहीं अपवाद असूं शकतील कीं काय आणि असल्यास ते कोणते, याचा विचार करा.

(४) खालील गोष्टींवर टीपा लिहा :—

प्लॅन्शेट, यादवी, पिवळी पगडी, अरिस्टायडीज, उपार्जित गुण, It is better to have loved and lost than never to have loved at all.

(५) आठव्या प्रकरणांतील 'खरी गोष्ट अशी कीं' या शब्दांनीं प्रारंभ होणारा परिच्छेद (पृ. ५०) पाहा. या परिच्छेदासारखे या पुस्तकांतले पांच परिणामकारक परिच्छेद शोधून काढा.

●

३

(१) धोंडोपंतांचा स्वभाव वीस ओळींत वर्णन करा.

(२) धोंडोपंतांच्या पत्नीचें चि त्र त्यांच्या मानानें फार अस्पष्ट वाटतें. असें होण्याचीं कारणें काय ?

(३) धोंडोपंत संस्कृत विषयाचे प्राध्यापक आहेत ही गोष्ट गृहीत धरल्यावर तिचा लेखकानें कसा कलात्मक उपयोग केला आहे याचीं तीन उदाहरणें द्या.

(४) 'स्मृतिलहरीं'त लेखकानें अनेक व्यक्तींचें ओझरतें स्वभावदर्शन घडविलें आहे. त्यांपैकीं तुम्हांला कोणती व्यक्ति संस्मरणीय वाटते ? कां ?

(५) धोंडोपंतांच्या कोणकोणत्या आवडीनिवडी या आठवणींत उघड झाल्या आहेत ? त्यांपैकीं कोणत्या प्रत्यक्ष लेखकाच्याच असाव्यात असें तुम्हांला वाटतें ? कशावरून ?

●

४

(१) वामनरावांना कोणकोणते सामाजिक प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटत होते ? 'स्मृतिलहरीं' तील लेखांच्या आधारें विवेचन करा.

(२) गेल्या तपांत या प्रश्नांचें स्वरूप तसेंच राहिलें आहे कीं तें बदललें आहे ? बदललें असल्यास कोणते फरक झाले आहेत ? ते कशामुळें ?

(३) आज वामनराव असते तर असे ललित लेख लिहून त्यांनीं कोणत्या प्रश्नांवर प्रकाश टाकावा असें तुम्हांला वाटलें असतें ?

(४) 'काळी बायको' व 'कॉम्युनिझम' या दोन्ही विषयांविषयीं लेख

काला सारखेंच प्रेम आहे असें या पुस्तकावरून वाटतें. त्याची ही वृत्ति तुम्हांला आवडते कीं नाहीं? कारणें देऊन आपल्या मताचें मंडन करा.

(५) या पुस्तकांतून व्यक्त होणाऱ्या वामनरावांच्या व्यक्तित्वाचे विशेष सांगा. त्यांपैकीं कोणते तुम्हांला विलोभनीय वाटतात?

•

५

(१) या पुस्तकांत जातां जातां लेखकानें मनुष्य स्वभावांतल्या कोण-कोणत्या वैगुण्यांवर बोट ठेवलें आहे?

(२) हीं वैगुण्यें नाहींशीं व्हावींत म्हणून त्यानें कोणते उपाय सुचविले आहेत?

(३) त्या उपायांवरून लेखकाविषयीं तुमचें काय मत होतें? त्याचा ध्येयवाद स्वप्नाळू आहे कीं वास्तवावर आधारलेला आहे?

(४) दहाव्या प्रकरणांत 'एका खुनी पण सज्जन' अशा पठाणाची माहिती आली आहे. तो आपली हकीकत सांगत आहे अशी कल्पना करून ती पंचवीस ओळींत लिहा.

(५) या पुस्तकांतून सूचित झालेलें लेखकाचें जीवनविषयक तत्त्वज्ञान थोडक्यांत सांगा.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर ९०२८३
मराठा ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थापना
अनुक्रम.... ४९५७९ दि: ....निवेदन
दिनांक.... १५८४ को दि. ७।९।६८
REFBK-0010283

किंमत दीड रुपया

डा. म. जोशी यांचीं
देशमुख आणि कंपनीनें
प्रकाशित केलेलीं पुस्तकें

१ विचार-लहरी
२ विचार-विहार
३ सुशिलेचा देव (संक्षिप्त)
४ रागिणी (संक्षिप्त)